CMYK

सोलापूर

प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

https://dainiktarunbharat.com / https://epaper.dainiktarunbharat.com

सातारा

शनिवार, ४ मे २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३८ वे अंक १८३ | पाने १२ | किंमत रु. ६/-

## मोदींची विकासाची तर राहुलजींची चायना गॅरंटी : अमित शहा

### विटा येथील सभेत काँग्रेसवर घणाघातील टिकास्त्र


**वृत्तसंस्था,**
**सांगली, ३ मे-**

राहुल गांधी यांची चायना गॅरंटी आहे, तर नरेंद्र मोदी यांची विकासाची गॅरंटी आहे. यामुळे विकासाला प्राधान्य देणारे मतदार नरेंद्र मोदी यांना तिसर्यांदा पंतप्रधान करतील असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शुक्रवारी विटा येथे झालेल्या प्रचार सभेत व्यक्त केला.

भाजपचे उमेदवार खासदार संजयकाका पाटील यांच्या प्रचारार्थ आज विटा येथे भाजपच्यावतीने महाविजय सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय मंत्री भागवत कराड, रामदास आठवले, पालकमंत्री सुरेश खाडे, आमदार सुधीर गाडगीळ, आमदार गोपीचंद पडळकर, पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे, नीता केळकर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी बोलताना केंद्रीय मंत्री शहा म्हणाले, मोदींनी देश विकासाची गॅरंटी देत देशाच्या कल्याणासाठी साथ मागितली आहे, विरोधक मात्र, परिवार कल्याण समोर ठेवून सत्तेसाठी एकत्र आले आहेत. एनडीएकडे पंतप्रधान पदासाठी केवळ मोदी यांचा एकमेव चेहरा आहे. विरोधकाकडे मात्र एक चेहरा नसून अनेक चेहरे आहेत. यदाकदाचित इंडियाच्या हाती सत्ता गेलीच तर बारी-बारीने पंतप्रधान पद देण्याचे ठरविले जाईल. पंतप्रधान म्हणजे काय दुकान आहे का? असा सवाल करत त्यांनी देश सुरक्षित आणि समृद्ध करण्यासाठी कणखर नेतृत्वाची गरज असल्याचे सांगितले.

अमित शहा पुढे म्हणाले, नकली शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांचे लक्ष आता नव्या मतपेढीकडे लागले असून त्यांना देशाची अस्मिता, धर्म याबद्दल काहीच वाटत नाही. पाचशे वर्ष रखडलेला राममंदिर जन्मभूमीचा प्रश्न निकाली काढत त्या ठिकाणी भव्य मंदिराची उभारणी मोदींच्या काळात झाली. देशाची अस्मिता जोपासण्याबरोबरच देशविकासाचे मोठे काम गेल्या दहा वर्षात केले असून यामध्ये महामार्गाचे जाळे असो व गरीब कल्याण कार्यक्रम असो. येत्या काही दिवसात देशाची अर्थव्यवस्था जगात तिसर्या स्थानी पोहोचविण्याचे काम मोदींच्या नेतृत्वाखाली होणार असून महिलांनाही संसद व विधी मंडळात ३३ टक्के आरक्षण देण्यात येणार आहे. सुरक्षित व समृद्ध देश घडविण्यासाठी मोदींना पर्याय होऊच शकत नाही असेही शहा यांनी यावेळी सांगितले. जिल्ह्यात पाच महामार्ग उभारण्यात आले असून लवकरच पुणे- बंगळुरू हरित महामार्गही कार्यान्वित होईल. यापुढील काळात सांगली जिल्ह्यात एक हजार कोटी रुपये खर्चाचा प्रकल्प उभा करण्यात येणार असून यासाठी भाजपला संधी मिळणे गरजेचे आहे असेही शहा म्हणाले.






### महत्त्वाचे...

#### एअर इंडियाची १६ जूनपासून दिल्ली-झ्युरिच विमानसेवा

**नवी दिल्ली :** एअर इंडिया १६ जूनपासून दिल्ली ते झ्युरिचसाठी थेट उड्डाणे सुरू करणार आहे आणि स्विस शहर हे सातवे युरोपियन स्थान असेल, जे अखंडित सेवेसह एअरलाइनद्वारे जोडले जाईल. आठवड्यातून चार वेळा सेवा बोईंग ७८७ विमानाद्वारे इकॉनॉमी आणि व्यवसाय या दोन श्रेणीत चालविली जाईल. शुक्रवारी जारी केलेल्या निवेदनानुसार, सोमवार, बुधवार, शुक्रवार आणि रविवारी उड्डाणे असतील. भारतात कार्यरत असलेल्या २५० हून अधिक स्विस कंपन्या, स्वित्झर्लंडमधील शेकडो भारतीय कंपन्या आणि सुमारे १८,००० वाढत्या भारतीय डायस्पोरासह, ही उड्डाणे दोन्ही दिशांना व्यवसाय आणि आरामदायी प्रवासाची मागणी पूर्ण करतील, असे एअर इंडियाचे सीईओ आणि एमडी कॅम्पबेल विल्सन यांनी सांगितले.

#### जिल्हाधिकाऱ्यांच्या नावे बनावट व्हॉट्सअॅप अकाऊंट

**अकोला :** डिजिटल तंत्रज्ञानामुळे जितकी सुविधा मिळत आहे, तितकाच त्रास आणि मनस्ताप नागरिकांना होत आहे. आता तर चक्क जिल्हाधिकारी अजित कुंभार यांना या मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. याचे कारण त्यांच्या नावाने काही भामट्यांनी बनावट व्हॉट्सअॅप अकाऊंट तयार केले आहे. हे भामटे येथेच थांबले नाहीत तर त्यांनी, जिल्हाधिकारी लोकांना पैसे मागत असल्याचे टाकले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या गंभीर घटनेची तत्काळ दखल घेऊन चौकशीचे आदेश सायबर सेलला दिले आहेत. आधार केंद्रचालक योगेश भाटी यांना जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या नावे असा मेसेज प्राप्त झाला. तो बनावट असल्याचे लक्षात येताच त्यांनी याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना अवगत केले. जिल्हाधिकारी कुंभार यांचे छायाचित्र वापरून व्हॉट्सअॅपवरील बनावट अकाऊंटद्वारे परिचित व नागरिकांकडे पैशांची मागणी होत असल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आली आहे. हा प्रकार +८५६ २०९८३९२७४० तसेच +९१ ९३३२९ ३९१२८ या भ्रमणध्वनी क्रमांकांहून घडत आहे. अशा मॅसेजवर कुणीही विश्वास ठेवू नये व अशा अकाऊंटवरून संदेश येताच तत्काळ पोलिसात तक्रार करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कुंभार यांनी केले आहे.

#### अनिल अंबानींच्या तीन कंपन्या विकणार

**मुंबई :** एकेकाळी आशियातील अब्जाधीशांच्या यादीत असणारे अनिल अंबानी गेल्या काही वर्षांपासून मोठ्या अडचणीत सापडले आहेत. त्यांच्या कंपन्यांवर मोठे कर्ज असून याच कर्जामुळे त्यांच्यावर कंपन्या विकण्याची वेळ आली आहे. एकीकडे मुकेश अंबानी एकापाठोपाठ एक कंपन्या विकत घेत असताना अनिल अंबानी मात्र एकेक कंपनी विकत आहेत. आता त्यांच्या आणखी तीन कंपन्या विकल्या जाणार आहेत. आयआरडीएआयच्या मंजुरीनंतर रिलायन्स कॅपिटलच्या तीन कंपन्यांची विक्री केली जाणार आहे.

## आयएएस अधिकाऱ्यांची २०५ कोटींची संपत्ती जप्त

### छत्तीसगड मद्य घोटाळ्यात ईडीची कारवाई

**वृत्तसंस्था,**
**नवी दिल्ली, ३ मे**

छत्तीसगडमधील मद्य घोटाळ्याशी संबंधित बेकायदेशीर सावकारी प्रकरणात अंमलबजावणी संचालनालय अर्थात ईडीने माजी आयएएस अधिकारी अनिल टुटेजा, रायपूर येथील महापौराचा भाऊ आणि इतरांची २०५ कोटींची संपत्ती जप्त केली.

ईडीने शुक्रवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, या घोटाळ्यात छत्तीसगडचे माजी उद्योग सचिव अनिल टुटेजा, काँग्रेस नेता अनवर ढेबर, अबकारी विभागाचे माजी आयुक्त निरंजन दास, अबकारी विभागाचे माजी विशेष सचिव अरुणपती त्रिपाठी व नोएडा येथील व्यवसायी विधू गुप्ता यांना आरोपी केले होते. चौकशीमध्ये या प्रकरणात या आरोपींचा मद्य घोटाळ्यात सहभाग आढळून आला. त्यानंतर टुटेजा यांची १५.८२ कोटी, महापौराचे बंधू व काँग्रेस नेते अनवर ढेबर यांची ११६.१६ कोटी, विकास अग्रवाल ऊर्फ सुब्बु यांची १.५४ कोटी तर अरविंद सिंह यांची १२.९९ कोटींची संपत्ती जप्त केली. याशिवाय आयएएस अधिकारी अरुणपती त्रिपाठी यांची १.३५ कोटी, त्रिलोक सिंह ढिल्लन यांची २८.१३ कोटी, नवीन केडिया यांची २७.९६ कोटी व आशिष केडिया यांची १.२ कोटी किमतीच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या.

#### काँग्रेस नेत्याचे हॉटेल सील

काँग्रेस नेते अनवर ढेबर यांच्या जप्त केलेल्या मालमत्तेत त्यांचे रायपूर येथील हॉटेल वेनिंग्टन कोर्ट व ढेबर बिल्डकॉन नामक कंपनीच्या कार्यालयाचा समावेश आहे. ईडीने टुटेजा यांना यापूर्वी अटक केली आहे. त्यांच्यावर आरोप आहे की, मद्याच्या अवैध विक्रीतून त्यांनी मोठ्या प्रमाणात संपत्ती गोळा केली होती.

## पंतप्रधान मोदींच्या 'मायक्रोप्लॅनिंग'मुळेच देश प्रगतीपथावर

### माजी शिक्षण मंत्री विनोद तावडे यांची स्पष्टोक्ती

### विश्वमित्र होण्यासाठी मतदानाचा टक्का वाढवा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रत्येक निवडणुकीतच नाहीतर संपूर्ण देशाचा कारभार हाकण्यात अत्यंत सुक्ष्म असे नियोजन असते म्हणूनच आपला देश अवघ्या विश्वात प्रगतीपथावर जात असल्याची स्पष्टोक्ती माजी शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी आज (दि. ४) दिली. दरम्यान, आपले पंतप्रधानच नाहीतर अवघा देश विश्वमित्र होण्यासाठी या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढवावा, असेही आवाहन तावडे यांनी केले.

माजी मंत्री तावडे सोलापूर दौऱ्यावर आल्यावर त्यांनी शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर नागरिकांशी संवाद साधला; त्यावेळी त्यांनी आपले वरील मत मांडले. यावेळी माजी मंत्री तथा आ. सुभाष देशमुख व इतर मान्यवर उपस्थित होते. तावडे पुढे म्हणाले की, पंतप्रधान मोदींनी जनसामान्य नागरिकांसाठी राबविलेल्या विविध कल्याणकारी योजना, विविध विकासकामांमुळे आपल्या देशाचे नाव अवघ्या जगात गाजत आहे. यामुळे आपला पॅटर्न इतरही काही देश राबवित आहेत. या लोकसभा निवडणुकीतही 'अब की बार, चारशे पार' हे ध्येय ठेवून भारतीय जनता पार्टी उतरली आहे. पहिल्या एक दोन टप्प्यातील मतदानातून भाजपाला यश मिळणार असल्याचे अंदाज येत आहेत. कारण २०१९ साली ज्या जागांवर अपयश आले होते; त्या जागांच्या अपयशाची कारणे शोधून आम्ही त्या-त्या मतदारसंघात अनेक सुधारणा, दुरूस्त्या केल्या आहेत.

ओरिसा, उत्तरप्रदेश, तेलंगणा, आंध्र, केरळ, कर्नाटक, महाराष्ट्रासह इतरही राज्यात मोदीजींची थॉटप्रोसेस आम्ही राबविल्याने भाजपाला यंदाच्या निवडणुकीतही चांगले यश येण्याचे संकेत मिळत आहेत. २०४७ सालापर्यंत आपला भारत देश संपूर्ण स्वावलंबी, विकसित करून संपूर्ण जगात पहिल्या स्थानावर आणण्याचे मोदींचे स्वप्न आहे, त्या दृष्टीने भाजपाचे वरिष्ठ पदाधिकारी आतापासूनच काम करीत आहेत. गेल्या १० वर्षात आपल्या देशाचा मोठा कायापालट झाला असून, देशातील रस्ते, उद्योग, विमानसेवा, रेल्वेसेवा, आयटी क्षेत्रात कमालीचा बदल झाल्याने संपूर्ण देशाचा चेहरा-मोहरा बदलला आहे. ४ कोटी जनतेला घरे दिली आहेत, राशन व्यवस्था विनामुल्य केली आहे. इतकेच नाहीतर शेतकरी, शेतमजूर, कामगार व इतर घटकांसाठीही मोदींनी सुक्ष्म नियोजन केले आहे. येत्या ५ वर्षातही यामध्ये मोठा बदल घडवून आणायचा आहे. यामुळे सर्वच क्षेत्रातील नागरिकांनी, युवा वर्गाने, विद्यार्थ्यांनी या लोकसभा निवडणुकीत आपले पवित्र मतदान उत्स्फूर्तपणे करावे आणि मताचा मोठा टक्का वाढवावा, अशी अपेक्षा तावडे यांनी शेवटी व्यक्त केली.



#### सोलापूरकरांचे प्रेम पाहून भारावलो

सोलापूर शहरातील उपस्थित राहिलेल्या विविध क्षेत्रातील मान्यवरांनीही आपापली मते यावेळी मांडली. प्रत्येकजणांनी आपला परिसर, आपले कुटुंब, नातेवाईकांना, आपल्या कंपनीतील कामगारांना, कॉलनीतील नागरिकांना मतदानात सहभाग घेण्यासाठी जनजागृती केली आहे आणि करीत आहेत. काही उद्योजक तर मतदान केलेल्या कामगारांना डबल वेतन देणार आहेत. काहीजण रॅलीद्वारे तर काहीजण मतदान टक्का वाढविण्यासाठी मोबाईलद्वारे जनजागृती करीत आहेत. विविध महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा मतदान केल्यावर सत्कार समारंभ होणार आहे. या लोकसभा निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेत सहभागी होवून जनजागृती करीत असलेल्या सोलापूरकरांचे प्रेम पाहून मी अक्षरशः भारावलो आहे.

**- आमदार सुभाष देशमुख, दक्षिण सोलापूर**


## पंतप्रधानांमुळे भारत विश्वगुरु

### केंद्रीय रस्ते, वाहतूक मंत्री नितीन गडकरी

### महायुतीच्या प्रचारार्थ जाहीर सभा

**तभा वृत्तसेवा,**
**सातारा, ३ मे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी गत १० वर्षांत सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती केली आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे देश विश्वगुरु बनला आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे देशाचा प्रगतीचा मार्ग प्रशस्त झाल्याचे प्रतिपादन केंद्रीय रस्ते, वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केले.



सातारा जिल्ह्यातील माण-खटाव, दहिवडी येथे माढा लोकसभा मतदारसंघाचे भाजप-महायुतीचे उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. मागील १० वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजप-महायुती सरकारने तरुण, महिला यांच्यासह शेतकरी, गरीब अशा सर्वस्तरांतील प्रत्येकांच्या प्रगतीचा आणि सक्षमीकरणाचा मार्ग प्रशस्त केला आहे, हे सांगून माढा लोकसभा मतदारसंघातील जनता यावेळीही गतिशील विकासाला प्राधान्य देत भाजप-महायुतीला विजयी करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## केजरीवालांच्या अंतरिम जामिनावर विचार करू

**नवी दिल्ली :** दिल्ली मद्य धोरणप्रकरणी अरविंद केजरीवाल यांची अटक आणि रिमांडवर शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात दोन तास चर्चा झाली. न्या. संजीव खन्ना आणि न्या. दीपांकर दत्ता यांच्या न्यायासनाने सांगितले की, लोकसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर केजरीवाल यांच्या अंतरिम जामिनाचा विचार केला जाऊ शकतो. मुख्य म्हणजे, ज्यात केजरीवाल यांनी त्यांच्या अटकेला आणि रिमांडला आव्हान दिले आहे, त्यासाठी वेळ लागू शकतो. त्यामुळे निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर त्यांच्या अंतरिम जामीन अर्जावर सुनावणी घेण्याबाबत विचार करता येईल. यावर ७ मे रोजी सुनावणी होणार आहे. ३० एप्रिल रोजी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने केजरीवाल यांच्या अटकेच्या वेळेवर प्रश्न उपस्थित केले होते.

## राहुल गांधी, लालू यादव नाव ठेवण्यापासून कुणाला कसे रोखणार?

### 'नामसाधर्म्य' याचिकेवर सुनावणीस सुप्रीम कोर्टाचा नकार

**वृत्तसंस्था,**
**नवी दिल्ली, ३ मे**

निवडणुकीच्या रिंगणात एकाच नावाचे अनेक उमेदवार रिंगणात उतरत असतात. या नामसाधर्म्यामुळे मतदारांचा गोंधळ उडत असतो. ही समस्या हाताळण्यासाठी प्रभावी यंत्रणा स्थापन करण्याच्या दिशेने तातडीने पावले उचलण्याचा आदेश निवडणूक आयोगाला दिला जावा, अशी विनंती करणाऱ्या याचिकेवर सुनावणीस सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी नकार दिला. आपल्या मुलांचे नाव राहुल गांधी किंवा लालू यादव ठेवू नका, असे आम्ही कुणाला कसे सांगू शकतो, अशी विचारणा न्यायालयाने केली.

आम्ही तुमच्या याचिकेवर सुनावणी करू शकत नाही, असे न्या. भूषण गवई, न्या. सतीश चंद्र शर्मा आणि न्या. संदीप मेहता यांच्या न्यायासनाने स्पष्ट केले. यानंतर याचिकाकर्त्याने आपली याचिका मागे घेतली. कुणाचे नाव जन्मापासूनच राहुल गांधी किंवा लालूप्रसाद यादव असेल तर आम्ही त्यांना निवडणूक लढण्यापासून कसे रोखू शकतो. यामुळे त्यांचे अधिकार प्रभावित होणार नाहीत का, असा सवालही न्यायालयाने केला. यावेळी याचिकाकर्त्याचे वकील व्ही. के. बिजू यांनी निवडणूक अधिनियम १९६१ मधील कलम २२(३) कडे लक्ष वेधले, ज्यात एकाच नावाचे दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात ही अतिशय गंभीर बाब असल्याचे नमूद आहे. यावर न्यायालय म्हणाले की, कुणी आई-वडील जर त्यांच्या मुलांची नावे अशाच प्रकारे ठेवत असतील, तर त्यांना आम्ही निवडणूक लढण्यापासून रोखू शकतो का? तुमच्या याचिकेचे भवितव्य आता कळलेच असेल. यानंतर वकिलाने याचिका मागे घेण्याची परवानगी मागितली.



## डीपफेक तयार करणाऱ्यांवर कडक कारवाई करा

### राज्य शासनाचा पोलिस विभागाला आदेश

**मुंबई, ३ मे**

महाराष्ट्र सरकारने शुक्रवारी राज्य पोलिसांना डीपफेक तयार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा निर्देश दिला असून, निवडणुकीच्या हंगामात अशी सामग्री निर्माण होत असल्याबाबत सरकारने चिंता व्यक्त केली आहे.

सध्या सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीदरम्यान समाजमाध्यम व डिजिटल माध्यमावर प्रसारित केल्या जाणाऱ्या डीपफेक फोटोंची संख्या वाढली आहे. डीपफेक हा एका व्यक्तीचा व्हिडीओ आहे, यात त्या व्यक्तीचे स्वरूप डिजिटली बदलण्यात येते; जेणेकरून ते दुसऱ्यासारखे दिसतील. मशीन लर्निंग (एमएल) किंवा आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) वापरून अशा प्रकारची फेरफार सामग्री तयार केली जात आहे. निवडणुकीदरम्यान या यंत्राचा वापर चिंतेचे कारण आहे. डीपफेक सामग्री गैरसमज निर्माण करते व बदनामीकारक आहे, असे सरकारने म्हटले आहे. अशा पद्धतींना आळा घालण्यासाठी व स्वच्छ-पारदर्शक निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित करण्याची सूचना सरकारने पोलिस महासंचालकांना केली आहे. असामाजिक घटक अशा प्रकारचा मजकूर तयार करणाऱ्या व प्रसारित करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा आदेश सरकारने राज्य पोलिसांना दिला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे डीपफेक शेअर केल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी युवक काँग्रेसच्या समाजमाध्यम हॅण्डल व अन्य १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केल्यानंतर काही दिवसांनी हा आदेश आला आहे.



www.tarunbharat.net
तरुण भारत
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




# लोकशाहीचा महाकुंभ





## निवडणुकायन

### चांदी फक्त 'त्याची'च...!



**राजकारणात** पैसा खूप आहे, असे म्हणतात. त्यामुळेच सत्ता आणि पैसा यासाठी राजकीय क्षेत्रात वावरणाऱ्यांना नगरसेवक, आमदार, खासदार म्हणून निवडून यायचे असते. एवढेच नाही तर, वेगवेगळ्या मंडळ, समित्यांसाठीही जुगाड लावले जाते. आपल्या कार्यकाळात जास्तीत जास्त पैसा कसा कमावता (?) येईल, याच जुळवणीत नेतेमंडळी असतात. हा पैसा स्वतःच्या चरितार्थासोबतच पुढच्या निवडणुकीची तरतूद म्हणूनही गोळा केला जातो.

मोठमोठ्या पक्षांना निवडणूक खर्चासाठीच जुगाडाची चिंता असते. निवडणूक आली की हा पैसा मग जिंकण्यासाठी ओतला जातो. (तो कुठे कुठे खर्च केला जातो हे आता सूज्ञ नागरिकांना सांगायची गरज नाही) म्हणजे आधी पैसा कमावण्यासाठी जिंकायचे आणि नंतर जिंकण्यासाठी पुन्हा तोच कमावलेला पैसा वापरायचा, अशी विचित्र विवंचना खरे तर नेते मंडळींची असते. या चक्रातून थोडाफार पैसा वाचला तर बिच्चारे कुटुंबासाठी काही करतील ना...! मग कोणाकोणाला 'पाच वर्षांत पाचच कोटींनी संपत्ती वाढली' असा तुटपुंजा अहवाल द्यावा लागतो. (तो अहवाल प्रतिज्ञापत्र असले तरी त्यावर उतरणारे आकडे किती खरे असतात, हे त्या नेत्यांच्या सीए आणि पीए यांनाच माहिती असावे) या प्रतिज्ञापत्रात अतिशय हुशारीने नमूद केलेली बाब म्हणजे नेत्यांवरील कर्ज. ज्यांची संपत्ती इतकी कुबेरासारखी असते, त्यांना कर्ज घेण्याची गरजच का पडते, हा भाबडा प्रश्न कोणत्याही मध्यमवर्गीय नागरिकाला कायमच पडतो. मग जर तुझ्यावर कर्ज आहे, तर असलेल्या पैशातून तू ते फेडत का नाही रे बाबा, असेही त्या नेत्याला सांगावेसे वाटते. पण, आपले ऐकणार कोण? कारण दाखवलेल्या आकड्यांमध्ये हरिश्चंद्राचा सत्यवादीपणा असणे शक्यच नाही, हेही आता जनतेला पुरते माहिती झाले आहे.

असो, पण नेत्यांच्या या निवडणुकीच्या धामधुमीत कार्यकर्ते एक वेगळाच स्वतंत्र लेखाचा विषय ठरावा, अशा गडबडीत असतात. निवडणुकीच्या या लगीनघाईत सर्वाधिक तोऱ्यात (त्या नेत्यापेक्षाही) कोणी वावर असेल, तर तो प्राणी म्हणजे पीए. नेत्यांना कार्यकर्ते कमी आणि पीए जास्त असतात आणि त्यांचा सीएदेखील सर्वांत जास्त पगारदार घटक असतो. कारण, पैशांची सगळी 'ॲडजस्टमेंट' त्यालाच करायची असते. तो तरी कागदोपत्री करीत असल्याने बिच्चारा पगारातच समाधानी असावा. पण पीए नावाचा प्राणी कधीही संतुष्ट किंवा अल्पसंतुष्ट गटातील नसतो. मुळात त्याचे 'बेसिक क्वॉलिफिकेशन' आणि 'एलिजिबिलिटी क्रायटेरिया'च हा असतो की, त्याने जुगाडाच राहावे, मग ते आपल्या बॉस नेत्याच्या असो किंवा स्वतःच्या असो...

नेत्यांच्या वर्षभरातील कामांचे नियोजन पीए करतोच, पण निवडणुकीचा काळ त्याच्यासाठी सुगीचा असतो. कारण, या काळात नेत्याला आपले ठेवणीतील पैसे बाहेर काढणे भागच असते. अर्थात, ती सोय आधीच करून ठेवलेली असल्याने त्यांना चिंता नसते. तरीही नेत्यांचे काळजीवाहू लोकदेखील या काळात आपल्या तिजोऱ्या मोकळे करून बसलेले असतात. नेत्याचा माणूस आला की त्याला पैसे द्यायचे, एवढेच या काळजीवाहूंना माहिती असते. मग ती रक्कम किती असते, हे फक्त मधल्या पीएसदृश्य दूतालाच माहिती असते. अर्थात, हे काळजीवाहू उगाचच तिजोऱ्या उघडत नाहीत. त्यांना एरवी कोणतीही समस्या आली की, नेते त्यांच्यासाठी तारणहार होण्यास बांधिल असतात. अशा 'एकमेका साह्य करू' तत्त्वावर सारा व्यवहार चालतो. असे असले तरी. नेता हरला किंवा जिंकला, कोणत्याही परिस्थितीत 'लाल-गुलाबी' होणार तो 'मधला माणूस'च. नेत्याची जमानत जप्त का होईना, आपले 'अमूक' टार्गेट पूर्ण व्हायला हवे, असे ठरवून तो मधला माणूस निवडणूक साजरी करतो. म्हणजे हा उत्सव खऱ्या अर्थाने त्याचाच असतो. बाकी नेते, उमेदवार, कार्यकर्ते, सरकारी यंत्रणा हा सारा आभासी जगातील भाग आहे. त्यात फारसे काही तथ्य नाही, हे तितकेच खरे. ■

# अमेठीतील पराभवाच्या धास्तीने राहुल गांधी रायबरेलीतून लढणार

◆ **नवी दिल्ली, ३ मे**

काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी आपला अमेठी मतदारसंघ सोडत आई सोनिया गांधींच्या रायबरेली मतदारसंघाची निवड का केली, अशी चर्चा सुरू झाली आहे.

अमेठीत विजयाची खात्री नसल्यामुळे म्हणजे सलग दुसऱ्यांदा पराभव होईल, अशी भीती वाटत असल्यामुळे राहुल गांधी यांनी रायबरेली मतदारसंघाची निवड केली, असे मानले जात आहे.

राहुल गांधी अमेठीतून तर प्रियांका वढेरा रायबरेलीतून निवडणूक लढवतील, अशी चर्चा काही दिवसांपासून सुरू होती. पण, राहुल गांधी यांनी अमेठीतून, तर प्रियांका वढेरा यांनी रायबरेलीतून निवडणूक लढण्यास नकार दिला.

रायबरेली हा सोनिया गांधींचा मतदारसंघ आहे. २००४ पासून २००९, २०१४ आणि २०१९ अशा सलग चार निवडणुका सोनिया गांधींनी रायबरेलीतून लढवल्या आणि जिंकल्या. यावेळी प्रकृतीच्या कारणावरून सोनिया गांधींनी रायबरेलीतून निवडणूक लढण्यास नकार दिला. मात्र, रायबरेलीशी गांधी घराण्याच्या असलेल्या संबंधाचा हवाला देत, गांधी घराण्यातील पुढील पिढीलाही रायबरेलीच्या जनतेचे प्रेम असेच मिळत राहील, अशी अपेक्षाही त्यांनी एका पत्रातून व्यक्त केली होती. त्यामुळे या मतदारसंघातून प्रियांका वढेरा निवडणूक लढवतील, अशा चर्चेने जोर पकडला होता.

राहुल गांधी यांनी रायबरेली मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला असला, तरी येथील निवडणूक त्यांना वाटते तितकी सोपी नाही. राहुल गांधी केरळच्या वायनाड मतदारसंघातूनही निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यामुळेच वायनाड मतदारसंघात पराभवाची शक्यता वाटत असल्यामुळे राहुल गांधी यांनी रायबरेलीची निवड केली, असा आरोप करण्याची आयती संधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मिळाली. रायबरेलीत राहुल गांधी यांचा पराभव होणार असल्याचा दावाही मोदी यांनी केला.

रायबरेलीतील निवडणूक ज्या लोकांच्या भरोशावर सोनिया गांधी जिंकत होत्या, ते नेते २०१४ नंतर काँग्रेसपासून दूर गेले. त्यामुळे २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे मताधिक्य घटले. २०१४ मध्ये साडेतीन लाख मतांनी निवडणूक जिंकणाऱ्या सोनिया गांधींना २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत १ लाख ६७ हजार मतांनी विजय मिळाला होता. मताधिक्य घटत असल्यामुळेच सोनिया गांधींनी यावेळी रायबरेलीतून लोकसभा



निवडणूक लढण्यास नकार देत राज्यसभेत जाणे पसंत केले, असा जखमेवर मीठ चोळणारा आरोप मोदी यांनी केला होता.

रायबरेलीत राहुल गांधी यांचा मुकाबला भाजपाचे दिनेश प्रतापसिंह यांच्याशी आहे. दिनेश प्रतापसिंह योगी आदित्यनाथ यांच्या मंत्रिमंडळात आहेत. त्यामुळे यावेळची निवडणूक राहुल गांधी यांना वाटते तितकी सोपी नाही. २०१९ मधील आपल्या पराभवाचा बदला घेण्याची संधी दिनेश प्रतापसिंह यांना चालून आली आहे. त्यावेळी सोनिया गांधी यांनी त्यांचा पराभव केला होता. अमेठी मतदारसंघाशी असलेला गांधी घराण्याचा संबंध संपला आहे, यावेळी रायबरेलीत राहुल गांधी यांचा पराभव झाला, तर या मतदारसंघाशी असलेला गांधी घराण्याचा संबंध संपणार आहे.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, वायनाड आणि रायबरेली या दोन्ही मतदारसंघात राहुल गांधी यांचा पराभव झाला, तर त्यांच्या राजकीय भविष्याचे काय, असा प्रश्नही उपस्थित होऊ शकतो. अशा परिस्थितीत यावेळी प्रथमच लोकसभेत गांधी घराण्यातील कोणीच राहणार नाही. ◀ *(तभा वृत्तसेवा)*

# संजय गांधी लढले होते पहिली निवडणूक

◆ **नवी दिल्ली, ३ मे**

१९७७ मध्ये अमेठीत पहिल्यांदा संजय गांधी यांनी निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत जनता पक्षाचे रवींद्र प्रतापसिंह यांनी त्यांचा पराभव केला. १९८० च्या लोकसभा निवडणुकीत मात्र संजय गांधी या मतदारसंघातून जिंकले. विमानदुर्घटनेत संजय गांधी यांचा मृत्यू झाल्यानंतर राजीव गांधी यांनी १९८१ मध्ये अमेठीत झालेली पोटनिवडणूक लढवली. १९८४ आणि १९८९ मध्ये राजीव गांधी पुन्हा या मतदारसंघातून विजयी झाले. १९९१ ची निवडणूकही राजीव गांधी यांनी अमेठीतून लढवली. मात्र, निवडणुकीच्या प्रचारादरम्यान श्रीपेराम्बुदूर येथे बॉम्बस्फोटात त्यांचा मृत्यू झाला.

१९९१ ची पोटनिवडणूक आणि १९९६ च्या लोकसभा निवडणुकीत गांधी घराण्याचे विश्वासू कॅप्टन सतीश शर्मा अमेठीतून विजयी झाले. १९९८ मध्ये भाजपाचे संजयसिंह यांनी विजय मिळवला. १९९९ मध्ये सोनिया गांधी यांनी या मतदारसंघातून पहिल्यांदा निवडणूक लढवली आणि जिंकली. म्हणजे १९९१ नंतर आठ वर्षांनी गांधी घराणे या मतदारसंघात परत आले. त्यानंतर २००४ मध्ये सोनिया गांधी यांनी हा मतदारसंघ आपल्या मुलासाठी म्हणजे राहुल गांधींसाठी सोडला. २००४, २००९ आणि २०१४ अशा सलग तीन निवडणुकीत राहुल गांधी या मतदारसंघात जिंकले. २०१४ मध्ये पराभूत झाल्यानंतर यावेळी अमेठीतून निवडणूक लढवण्याची राहुल गांधी यांची हिंमत झाली नाही. ते आपल्या आईच्या मतदारसंघात रायबरेलीत गेले. आईने आपला मतदारसंघ मुलासाठी सोडला आणि मुलगा परत आईच्या मतदारसंघातच गेला. ◀ *(तभा वृत्तसेवा)*

## ठाकरे गटात बंडखोरी, करंजकर अपक्ष रिंगणात

◆ **नाशिक, ३ मे**



नाशिक लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचा घटकपक्ष असलेल्या ठाकरे गटातील नेते विजय करंजकर यांनी बंडखोरी करीत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. ठाकरे गटाने त्यांची उमेदवारी डावलून राजाभाऊ वाजे यांना उमेदवारी दिल्याने करंजकर यांनी बंडाचा झेंडा उचलला आहे. त्यामुळे आता नाशिकमध्ये आघाडीच्या अडचणी वाढल्या आहेत. महायुतीकडून हेमंत गोडसेंना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांची लढत ठाकरे गटाचे उमेदवार राजाभाऊ वाजे यांच्याशी होणार आहे. अशातच वाजे यांना उमेदवारी दिल्यामुळे करंजकर नाराज होते. आता त्यांनी पक्षाच्या आदेशाला आव्हान देत अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे. नाशिकमध्ये उमेदवारी देण्याचा शब्द पक्षाने दिला होता. मात्र आपल्याला डावलून वाजे यांना उमेदवारी दिली. त्यामुळे मी स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला असल्याचे करंजकर म्हणाले. ◀ *(वृत्तसंस्था)*

## भाजपा प्रवेशाआधीच खडसे प्रचाराच्या मैदानात

### सूनबाई रक्षा खडसेंसाठी सभांचा धडाका

◆ **जळगाव, ३ मे**

एकनाथ खडसे यांनी शरद पवार यांची साथ सोडत भाजपामध्ये घरवापसी करत असल्याची घोषणा केली. मात्र त्यांचा पक्षप्रवेशाचा मुहूर्त काही अद्याप ठरलेला नाही. अशातच त्यांनी भाजपाच्या उमेदवार व त्यांच्या सूनबाई रक्षा खडसे यांच्यासाठी प्रचाराचा धडाका सुरू केला आहे.

पक्षाच्या वरिष्ठांनी आपल्याला भाजपा उमेदवाराचा प्रचार करण्याच्या सूचना दिल्याचे खडसे यांनी शुक्रवारी सांगितले. त्यांनी रावेर लोकसभेच्या भाजपा उमेदवार रक्षा खडसे यांच्या प्रचारास सुरुवात केली. तसेच त्यांनी यावल येथील भाजपा प्रचार कार्यालयाला भेट देत कार्यकर्त्यांना सूचना देत आढावा घेतला. भाजपामध्ये प्रवेश करीत असल्याचे आमदार एकनाथ खडसे यांनी जाहीर केल्यानंतर अद्याप प्रचारात सक्रिय झाले नव्हते. मात्र दोन दिवसांपासून त्यांनी भाजपा उमेदवाराचा प्रचार सुरू केला आहे. माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, भाजपाचे वरिष्ठ नेते विनोद तावडे यांनी बैठका घेण्यासह प्रचार करण्याच्या सूचना दिल्या आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरील विश्वास व कार्यकर्त्यांचा उत्साह पाहता रक्षा खडसे प्रचंड बहुमताने निवडून येतील. ◀ *(वृत्तसंस्था)*

# निवडणुकीत विरोधक चारीमुंड्या चीत होतील : मुख्यमंत्री

### महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांचा अर्ज दाखल



कार्यकर्त्यांना संबोधित करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

◆ **मुंबई, ३ मे**

बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांवर चालणारा ठाणे जिल्हा असून, तो धर्मवीर आनंद दिघेंचाही जिल्हा आहे. धर्मवीरांना साजेसे काम आपल्याला करायचे आहे. बाळासाहेबांचे आशीर्वाद पाठीशी आहेत. त्यामुळे महायुतीचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते एकजुटीने काम करतील आणि विरोधक चारीमुंड्या चीत होतील, असा विश्वस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

ठाणे लोकसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी निघालेल्या विराट प्रचार रॅलीला मुख्यमंत्र्यांनी संबोधित केले.

नरेंद्र मोदींना पुन्हा पंतप्रधान करण्याचा संकल्प लोकांनी केला आहे. तुमचा ठाणेकर या राज्याचा मुख्यमंत्री आहे. केवळ ठाण्यातच नाही, तर संपूर्ण राज्यात कधी नव्हे इतकी विकास कामे केली आहेत. आपले सरकार येण्यापूर्वी सणांवर बंदी होती. घरात बसून सरकार चालवता येत नाही. फेसबुक लाईव्हने सरकार चालत नाही, अशी टीका मुख्यमंत्र्यांनी उबाठावर केली. अहंकारामुळे राज्य अधोगतीला चालले होते. याविरोधात आपण उठाव केला. बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघेंच्या विचारांचे सरकार आपण स्थापन केले, असे शिंदे म्हणाले. ◀ *(तभा वृत्तसेवा)*


### यामिनी जाधव, रवींद्र वायकरांचा अर्ज दाखल

मुंबई दक्षिण लोकसभा मतदार संघातून महायुतीच्या उमेदवार यामिनी जाधव यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला. मुंबई उत्तर-पश्चिम लोकसभा मतदार संघातून रवींद्र वायकर यांनी अर्ज दाखल केला. ■

**काँग्रेसकडून शुक्रवारी बहुप्रतीक्षित घोषणा करण्यात आली. कधी नव्हे ते अनपेक्षितरीत्या काँग्रेसने रायबरेलीतून राहुल गांधी यांच्यासाठी उमेदवारी जाहीर केली. या रायबरेली मतदार संघाचे आतापर्यंत काँग्रेसनेच सर्वाधिक वेळा प्रतिनिधित्व केले आहे.**

### रायबरेलीमधील लोकसभेचे आतापर्यंतचे सदस्य

| वर्ष | सदस्य | पक्ष |
|---|---|---|
| १९५२-५७ | फिरोज गांधी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| १९५७-६२ | फिरोज गांधी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| १९६२-६७ | आर. पी. सिंह | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| १९६७-७१ | इंदिरा गांधी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| १९७१-७७ | इंदिरा गांधी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| १९७७-८० | राज नारायण | जनता पार्टी |
| १९८०-८४ | इंदिरा गांधी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| १९८४-८९ | अरुण कुमार नेहरू | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| १९८९-९१ | शीला कौल | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| १९९१-९६ | शीला कौल | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| १९९६-९८ | अशोक सिंह | भारतीय जनता पार्टी |
| १९९८-९९ | अशोक सिंह | भारतीय जनता पार्टी |
| १९९९-२००४ | सतीश शर्मा | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| २००४-०९ | सोनिया गांधी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| २००९-१४ | सोनिया गांधी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| २०१४-१९ | सोनिया गांधी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| २०१९-२४ | सोनिया गांधी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |






**लोकसभा निवडणूक २०२४**
**रायबरेलीचे प्रमुख उमेदवार**

| पक्ष | उमेदवार |
|---|---|
| काँग्रेस | राहुल गांधी |
| भाजपा | दिनेश प्रताप सिंह |
| बसपा | ठाकुर प्रसाद यादव |

| मतदार संघ | सदस्य | पक्ष |
|---|---|---|
| बछरावां (एससी) | श्याम सुंदर | समाजवादी पार्टी |
| हरचंदपूर | राहुल राजपूत | समाजवादी पार्टी |
| रायबरेली | अदिति सिंह | भारतीय जनता पार्टी |
| सरेनी | देवेंद्र प्रताप सिंह | समाजवादी पार्टी |
| ऊंचाहार | मनोज पांडे | समाजवादी पार्टी |

**विद्यमान परिस्थितीत रायबरेली लोकसभा मतदार संघात विधानसभेचे चार मतदार संघ येतात. यापैकी एकाही मतदार संघात काँग्रेसचा आमदार नाही. मात्र, चार मतदार संघांत समाजवादी पार्टीचे आमदार आहेत. काँग्रेसने समाजवादी पार्टीसोबत हातमिळवणी केली असल्यामुळे त्याचा कदाचित फायदा राहुल गांधी यांना मिळण्याची शक्यता आहे. भाजपाचा एकच आमदार असला, तरी उत्तरप्रदेशातील भाजपाचे काम आणि देशात असलेली मोदी लाट यामुळे भाजपा उमेदवार जिंकणार की नाही, हे बघावे लागणार आहे. ही एकूणच परिस्थिती पाहता काँग्रेसने कदाचित राहुल गांधी यांना सुरक्षित मतदार संघ म्हणून रायबरेलीतून उमेदवारी दिली असावी, असे वाटते. वायनाडमध्ये मात्र राहुल गांधी यांचे काही खरे नाही, हेही तेवढेच सत्य आहे. म्हणूनच कदाचित त्यांना सुरक्षित मतदार संघाचा शोध घ्यावा लागला आहे.**

संकलन : महेंद्र आकांत

## पुणे तिथे 'प्रचार' उणे

◆ **पुणे, ३ मे**

ना भोंगा फिरवणारी रिक्षा, ना पथनाट्य कलावंतांचा टेम्पो... ना रॅली ना पदयात्रा... एवढेच नाही तर, बॅनर नाही अन् झेंडेही नाही. अपवाद वगळता पुण्यात निवडणूक असल्यासारखे कुठेच वाटत नाही. लोकशाहीचा महाउत्सव साजरा होत असताना पुणे जणू शांत आहे. एखाद-दुसऱ्या भागात उमेदवार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांची लगबग दिसते. मात्र, संपूर्ण शहरात म्हणावे तसे वातावरण अजून तयार झालेले नाही. पुण्याच्या उमेदवारांना झाले तरी काय, असा प्रश्न विचारला जातो आहे.

नाही म्हणायला पुण्यात झालेल्या पंतप्रधानांच्या सभेला मोठी गर्दी झाली. तरीही सर्वसामान्य पुणेकर स्वतःला काहीसे दूरच ठेवून आहेत. निवडणुकीची म्हणावी तशी हवा कुठेच नाही. त्याचा परिणाम प्रचार साहित्याच्या व्यवसायावर झाला. गल्ली-बोळात किंवा रस्त्यांवर निवडणुकीचे वातावरण दिसत नसले, तरी सोशल मीडियावर वातावरण तापत असल्याचे चित्र आहे. सध्या तरी 'पुणे तिथे प्रचार उणे' अशी स्थिती आहे. मतदानाच्या टक्केवारीवर त्याचा विपरीत परिणाम व्हायला नको, याची काळजी घेतली जाणे आवश्यक आहे. ◀ *(वृत्तसंस्था)*

# भरीत करण्यापेक्षाही मतदान करणे सोप्पे!

◆ **जळगाव, ३ मे**

राज्यातीलच नव्हे तर देशातील प्रत्येक भागाच्या खाद्य संस्कृतीची एक ओळख असते. तशी भरीत हे खान्देशच्या खाद्यसंस्कृतीची आद्य ओळख... मग हीच खाद्य संस्कृती पोटातून बोटात आणण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी आयुष प्रसाद यांनी खान्देशच्या किचनमध्ये जाऊन मतदान जागृतीचे केलेले आवाहन हा लोकांमध्ये चर्चेचा विषय ठरला.

स्त्रियांना एखादा आवडीचा पदार्थ घरच्यांना खाऊ घालायचा असेल, तर निवांतवेळ हवा असतो. अन् तो निवांत वेळ सुटीचा असतो. यावर्षी मतदानाला लागून शनिवार, रविवार आहे. त्यामुळे निवांतपणा मिळू शकतो. पण मतदान विसरू नये यासाठी निवडणूक अधिकारी प्रसाद यांनी महिलांच्या किचनमध्ये जाऊन,



कशी असते भरीत रेसिपी हे जाणून घेतले. ते जाणून घेताना वांगे जसे भाजावे लागते, नंतर साल काढावी लागते तसेच मतदान केंद्रावर जाऊन तुम्हाला मतदार यादीत तुमचे नाव बघून, तुमचे ओळखपत्र दाखवून, बोटाला शाई लावली जाते. तुम्ही साल काढलेल्या वांग्याची पेस्ट करून कांदा, जिरे, लसूण इतर मसाल्यांबरोबर तडका देता; मग ते भरीत चवदार होते तसेच बोटाला शाई लावल्यानंतर मतदान करायला मतदान बॉक्समध्ये जाऊन तुमच्या मनात क्षणभर विचार येतो, त्यावेळी तुम्ही पूर्ण स्वतंत्र असता, तुमच्यावर कोणाचाही दबाव नसतो आणि तुमच्याकडून बटण दाबले जाते... त्यात तुमचे मत ज्याला असते, त्याला लोकशाहीत अमूल्य असे महत्त्व असते. मग तुम्ही एवढे अमूल्य मतदान करायलाच हवे. त्यासाठी कोणतेही कारण न सांगता मतदान करायचे आणि मतदान करणे हे भरीत करण्यापेक्षा सोपे आहे, असे आयुष प्रसाद सांगतात. त्यावेळी महिलांच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास दिसतो, तेच या व्हिडीओचे बलस्थान आहे. ◀ *(वृत्तसंस्था)*

# संभाजीनगरमध्ये लागणार तीन मशिन्स!

◆ **छ. संभाजीनगर, ३ मे**

लोकसभा मतदारसंघ निवडणुकीच्या रिंगणातील ३७ उमेदवारांपैकी पहिल्याच ईव्हीएममध्ये प्रमुख पक्षांचे उमेदवार आहेत. चंद्रकांत खैरे (ठाकरे गट), संदीपान भुमरे (शिवसेना), संजय जगताप (बसपा), अफसर खान यासीन खान (वंचित बहुजन आघाडी) व खा. इम्तियाज जलील (एमआयएम) हे प्रमुख पक्षांचे उमेदवार आहेत. प्रमुख पक्षांसह ३७ उमेदवार रिंगणात असल्याने तीन ईव्हीएम निवडणुकीसाठी लागणार आहेत.

अपक्ष उमेदवारांना सोमवारी सायंकाळी ५ वाजता निवडणूक चिन्हांचे वाटप झाले. मात्र, निवडणूक आयोगाकडून त्या चिन्हांना मंजुरी मिळण्यासाठी मंगळवारची पहाट उजाडली. पहाटे ३:३० वाजेपर्यंत सर्व अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालयात बसून होते. चिन्हांना मंजुरी दिल्याचा ई-मेल आल्यानंतर पहाटे ४ वाजता अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय सोडले. निवडणूक रिंगणातील ३७ उमेदवारांना चिन्हांचे वाटप केले. नोंदणीकृत राजकीय पक्षांना चिन्हवाटप केल्यानंतर अपक्ष उमेदवारांना पसंतीनुसार तसेच चिन्हांसाठी स्पर्धा लागल्यामुळे सोडतीनुसार चिन्ह देण्यास सायंकाळचे ५ वाजले. सर्व चिन्हांची यादी मंजुरीसाठी रात्री ७ वाजेच्या समारास निवडणक आयोगाला दिली. ◀ *(वृत्तसंस्था)*

### प्रचारात असतील मजेशीर चिन्हे

गॅस सिलेंडर, जहाज, नागरिक, अंगठी, पेनाची निब, फळाची टोपली, शिलाई मशीन, ट्रक, तुतारी, ऊस शेतकरी, हिरा, कपाट, ऑटो रिक्षा, कढई, कूलर, टीव्ही रिमोट, सफरचंद, नारळाची बाग, विजेचा खांब, लिफाफा, शाळेचे दप्तर, शिट्टी, प्रेशर कूकर, इस्त्री, बासरी, संगणक, रोड रोलर, काचेचा पेला, स्पॅनर, हिरवी मिरची, दूरचित्रवाणी संच, बॅट अशी मजेशीर चिन्हे अपक्ष उमेदवारांना मिळाली आहेत. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# ‘डीप फेक’ रोखण्यासाठी कारवाई करण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३ मे-**

लोकसभा निवडणुकीदरम्यान डीप फेक व्हिडिओज, क्लिप्स, फोटो किंवा इतर प्रकारचा कंटेंट तयार करून तो समाजमाध्यमे / डिजिटल माध्यमांवरून प्रसारित करण्यात येत आहे. या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी संबंधितांवर कडक कारवाई शासनामार्फत करण्यात येणार आहे.

फोटोशॉप, मशीन लर्निंग (एमएल) किंवा आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) यांसारख्या विविध तंत्रांचा गैरवापर करून डीप फेक व्हिडिओज, क्लिप्स, फोटो किंवा इतर प्रकारचा कंटेंट तयार करण्यात येतो. निवडणुकीदरम्यान या तंत्राचा गैरवापर हा चिंतेचा विषय आहे. एखादा उमेदवार, राजकीय पक्ष किंवा निवडणुकीच्या मुद्द्याविषयी चुकीचे व्हिडिओ, ऑडिओ, फोटो तयार करण्यात येतात किंवा खऱ्या फोटो, ऑडिओ, व्हिडिओमध्ये फेरफार करून ते चुकीच्या पद्धतीने प्रसारित करण्यात येतात. असे गैरपद्धतीने तयार केलेले डीप फेक व्हिडिओज, क्लिप्स किंवा फोटो खरे असल्यासारखे भासतात आणि त्यामुळे संबंधिताविषयी गैरसमज किंवा बदनामी होते. निवडणूक काळात अशा प्रकरणांमध्ये वाढ होत असून यावर आळा घालण्यासाठी तसेच स्वच्छ आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रिया होण्याच्या दृष्टीने ‘डीप फेक’ कंटेंट तयार करणाऱ्या आणि प्रसारित करणाऱ्या समाजकंटकांवर कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात यावी, अशा सूचना शासनाने दिल्या आहेत. राज्य शासनामार्फत पोलीस महासंचालकांना यासंदर्भात सूचना देण्यात आल्या असून पोलीस खात्यामार्फत यासंदर्भात कार्यवाही करण्यात येणार आहे. निवडणूक आयोगानेही विपर्यस्त माहिती रोखण्यासंदर्भात त्यांच्या मार्गदर्शिकेमध्ये सूचना दिल्या आहेत.

# केंद्रांच्या दबावामुळे तर मतदानाचा टक्का वाढला नाही ना?

## अनिल देशमुख यांचा सवाल

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.३ मे-**

लोकसभेच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्पात मतदानाच्या दिवशी निवडणुक आयोगाने जाहीर केलेल्या टक्केवारीत तब्बल ११ दिवसांनी वाढ करण्यात आली. डिजीटल भारतात निवडणुक आयोगाकडुन ही चुक झाली की मतदानाच्या टक्केवारीत वाढ करुन सरकारच्या दबावाखाली निवडणुक आयोग काही घोळ तर करीत नाही ना? डिजीटल युगात मतदानाचा टक्का वाढलाच कसा? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी उपस्थित केला आहे.



निवडणुक आयोगाने ११ दिवसानंतर जाहीर केलेल्या टक्केवारीवर शंका उपस्थित होत आहे. यापुर्वी आयोगाकडुन मतदानाच्या दिवशीच रात्री उशिरापर्यत एकुण टक्केवारी किती झाली याची माहिती प्रसिद्ध करीत होते. यात प्रामुख्याने किती मतदार होते आणि किती मतदारांनी मतदान केले यासह टक्केवारी जाहीर करीत होते. लोकसभेच्या महाराष्ट्रात झालेल्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात मिळुन १३ मतदारसंघामध्ये मतदान झाले आहे. त्यावेळी सायंकाळी ७ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार सरासरी ५९.५६ टक्के मतदान झाल्याचे निवडणुक आयोगानेच आपल्या अधिकृत वेबसाईटवर जाहीर केले होते. परंतु आता यात वाढ करुन या १३ ही मतदार संघातील अंतीम आकडेवारी ही ६२.७१ टक्के जाहीर करण्यात आली. साधारणता ३.०८ टक्के यात वाढ दाखविण्यात आली.

नागपूर वगळता सर्वच ठिकाणी टक्केवारीत वाढ दाखविण्यात आली आहे. चंद्रपुर येथे तर सुरुवातीला ६०.३५ असलेली टक्केवारी ही ७.२० टक्याने वाढवून ती ६७.५५ दाखविण्यात आली आहे. असाच प्रकार महाराष्ट्रात पहिल्या व दुसऱ्या टप्यात झालेल्या १३ ही मतदार संघात दिसुन येत आहे. एवढया मोठया प्रमाणात वाढलेल्या या टक्केवारीमुळे निवडणुक आयोगाच्या कार्यप्रणालीवर प्रश्न चिन्ह उपस्थीत होत आहे. निवडणुक आयोगावर केंद्रातील सरकारचा दबाव असल्याचे अनेक उदाहरण समोर आले आहेत. यात आता हा टक्केवारीचा घोळ समोर आला आहे. निवडणुक आयोगाने भाजपाचे उमेदवार विजयी करण्यासाठी तर हा घोळ तर केला नाही ना?

# तिसऱ्या टप्प्यातील ७ मे रोजीच्या मतदानासाठी २३ हजार ३६ मतदान केंद्रे

## दुसऱ्या टप्प्यात राज्यात सरासरी ६२.७१ टक्के मतदान

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३ मे -**

राज्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील अकरा मतदार संघासाठी ७ मे रोजी मतदान होत असून त्यासाठी यंत्रणा सज्ज असून उष्णतेच्या पार्श्वभूमीवर सर्व मतदान केंद्रांवर पुरेसे पिण्याचे पाणी, ओआरएस पॅकेट तसेच मतदारांच्या संख्येनुसार पुरेशा प्रमाणात मंडप व्यवस्था, प्रतिक्षा कक्षाची सुविधा उपलब्ध ठेवण्याच्या सूचना जिल्हा यंत्रणांना देण्यात आल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रधान सचिव एस. चोक्कलिंगम यांनी पत्रकार परिषदेत दिली.

११ मतदार संघात एकूण २३ हजार ३६ मतदान केंद्रांची सुविधा उपलब्ध करुन केली असून या निवडणुकीत २ कोटी ९ लाख ९२ हजार ६१६ मतदार असल्याचे त्यानी सांगितले. ते म्हणाले की, दुसऱ्या टप्प्यात बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळवाशिम, हिंगोली, नांदेड, परभणी या ८ लोकसभा मतदारसंघात २६ एप्रिलला मतदान घेण्यात आले. दुसऱ्या टप्पात एकूण सरासरी ६२.७१ टक्के मतदान झाले.

तिसऱ्या टप्प्यात कोकण विभागातील २, पुणे विभागातील ७ व औरंगाबाद विभागातील २ अशा एकूण ११ मतदारसंघामध्ये एकूण २३ हजार ३६ मतदान केंद्रांची सुविधा उपलब्ध



करुन देण्यात आली असून या निवडणुकीत २ कोटी ०९ लाख ९२ हजार ६१६ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहे. या अकरा मतदार संघासाठी बॅलेट युनिट (बीयु) ४६,४९१ तर कंट्रोल युनिट (सीयु) २३,०३६ आणि २३,०३६ व्हीव्हीपॅट उपलब्ध असून तिसऱ्या टप्प्यात एकूण २५८ उमेदवार निवडणूक लढविणार असल्याची माहिती त्यांनी दिली. तिसऱ्या टप्प्यातील सर्व मतदारसंघासाठी मतदानाची सर्वसाधारण वेळ सकाळी ७ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत आहे. मात्र मतदान केंद्रावर सायंकाळी ६ वाजेपर्यंत जेवढे मतदार उपस्थित असतील त्या सर्वांची मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत हे मतदान केंद्र सुरु राहील. मतदान संपण्याच्या वेळेच्या ४८ तास आधी अकराही लोकसभा मतदार संघामध्ये सायलन्स पिरियड आहे. या लोकसभा क्षेत्रामध्ये ४८ तास आधी प्रचार करता येत नाही. पाचव्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या आजच्या शेवटच्या दिवसापर्यंत ३९७ उमेदवारांचे ५१२ अर्ज दाखल झाले आहेत.

### ३३,४६१ तक्रारी निकाली

१६ मार्च ते २ मे २०२४ या कालावधीत राज्यभरात सी व्हिजील ॲपवर आचारसंहिता भंगाबाबतच्या ४३४२ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यातील ४३३३ तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत. तसेच याकालावधीत एनजीएसपी पोर्टलवरील ३४,१६८ तक्रारीपैकी ३३,४६१ निकाली काढल्या आहेत.

### ५३१ कोटी रक्कमेचा मुद्देमाल जप्त

कायदा व सुव्यवस्थांतर्गत १ मे पर्यंत ५०,३९७ शस्त्रास्त्रे जमा करण्यात आलेली आहे. तर परवाने रद्द करून १,११० शस्त्रे जप्त करण्यात आलेली आहेत. जप्त करण्यात आलेली अवैध शस्त्रास्त्रे १,५९५ इतकी आहेत. राज्यात आचारसंहिता लागू झाल्यापासून सीआरपीसी कायद्यांतर्गत १,११,८७८ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. राज्यामध्ये दि. १ मार्च ते २ मे २०२४ या कालावधीत राज्यातील केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे ४९.९५ कोटी रोख रक्कम तर ३६.८० कोटी रुपयांची दारु जप्त करण्यात आली. मौल्यवान धातू १२९.८९ कोटी रुपये, ड्रग्ज २२०.६५ कोटी, फ्रिबीज ०.४७ कोटी आणि इतर बाब अंतर्गत ९२.९२ कोटी रुपये अशा एकूण ५३०.६९ कोटी रक्कमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# मनसेच्या जिल्हाध्यक्षावर पाच कोटी खंडणी मागितल्याचा गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई,दि.३ मे-**

लोकसभा निवडणूकीची धामधूम सुरू असतानाच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते आणि ठाणे-पालघर जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांच्यासह दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. येथील एल.टी मार्ग पोलिसांनी खंडणी, मारहाण व कट रचल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.५ कोटीची खंडणी मागितली असल्याची फिर्याद सराफ व्यावसायिक शैलेश जैन (वय ५५) यांनी दिली आहे.



जाधव यांचे मित्र वैभव ठक्कर यांना हिशोबासाठी जैन यांनी बोलावले असताना अविनाश जाधव यांनी तिथे सराफाच्या मुलाला मारहाण केली. तसेच जाधव यांनी उचलून नेण्याची व नुकसान करण्याची धमकी देऊन जैन यांना पाच कोटी रुपयांसाठी धमकावल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

सोन्याच्या दागिन्यांचे व्यापारी शैलेश जैन यांच्या तक्रारीवरुन अविनाश जाधव आणि वैभव ठक्कर यांच्याविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केलाय. तक्रारीनुसार, शैलेश जैन यांनी वैभव ठक्करला झवेरी बाजार येथील जे. के. ज्वेलर्स या कार्यालयात हिशोबासाठी बोलावलं होते. यावेळी अविनाश जाधव यांनी त्यांचे सहकारी, अंगरक्षक आणि सहा ते सात जणांसह पोलिसांसमक्ष जैन यांचा मुलगा स्वामिल याला मारहाण केली. तसंच अविनाश जाधव यांनी तक्रारदार शैलेश जैन यांना उचलून नेण्याची आणि नुकसान करण्याची धमकी देऊन त्यांना पाच कोटी रुपयांसाठी धमकावलं वैभव ठक्कर व अविनाश जाधव यांच्याविरोधात भादंवि कलम ३८५, १४३, १४७, ३२३, १२० ब अंतर्गत पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### आरोप ख़ोटे- जाधव

अविनाश जाधव यांनी हे आरोप फेटाळून लावत आपल्या विरोधात सूडबुद्धीने तक्रार केल्याचा खुलासा केला आहे, एका व्यक्तीनं दूरध्वनी करुन मला आणि माझ्या पत्नीला डांबून ठेवले, असे सांगितलं होतं. त्यानंतर मी मदतीसाठी पोलिसांसह तेथे गेलो होतो.

# महायुतीच्या सहा उमेदवारांचे अखेरच्या दिवशी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई,दि.३ मे-**

महाराष्ट्रातील अखेरच्या पाचव्या टप्प्यात होणाऱ्या मतदाना साठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या आजच्या अखेरच्या दिवशी महायुतीच्या मुंबई महानगरातील ५ उमेदवारांनी अर्ज दाखल केले. पदाधिकारी व कार्यकर्त्यांसमवेत मिरवणुका काढत शक्ती प्रदर्शन करीत त्यांनी अर्ज दाखल केले.



शुक्रवारी ठाणे, कल्याण, मुंबई शहर व उपनगरातील जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज दाखल करण्यासाठी इच्छुक उमेदवारांची झुंबड उडाली होती. महायुतीतील विविध पक्षांचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी हे आपल्या पक्षाच्या उमेदवाराचा अर्ज दाखल करण्यासाठी करण्यासाठी उपस्थित होते.

दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या शिवसेनेच्या उमेदवार यामिनी जाधव यांनी ओल्ड कस्टम येथील जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणूक अर्ज दाखल केला

यावेळी खासदार मिलिंद देवरा, कौशल्यविकास मंत्री मंगलप्रभात लोढा, विभागप्रमुख यशवंत जाधव उपस्थित होते. ठाणे लोकसभा मतदारसंघांतील उमेदवार नरेश मस्के यांनी निवडणूक निर्णय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये यांच्याकडे दुपारी चार उमेदवारी अर्ज दाखल केले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ श्रीकांत शिंदे, लता एकनाथ शिंदे, मिनाक्षी शिंदे,गणेश नाईक, संजीव नाईक, मंदा म्हात्रे, आमदार प्रताप सरनाईक, आमदार संजय केळकर, रविंद्र फाटक आनंद परांजपे, अभिजीत पानसे, हरी माळी आदी उपस्थित होते.

भिवंडी लोकसभा मतदारसंघातील उमेदवार भाजपाचे उमेदवार कपिल पाटील यांनी शक्ती प्रदर्शन करीत आज अर्ज दाखल केला तर मुंबईत उत्तर मध्य लोकसभा मतदारसंघाचे भाजपाचे उमेदवार ॲड. उज्वल निकम यांनी वांद्रे येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यापूर्वी रॅली काढून शक्ती प्रदर्शन करण्यात आले. मिरवणुकीत मुंबई भाजपाचे अध्यक्ष आमदार, पदाधिकारी उपस्थित होते.

उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातील शिवसेनेचे उमेदवार आ. रवींद्र वायकर यांनी या कार्यालयात अर्ज दाखल केला.

# श्रीकांत शिंदेंनी दिले मुख्यमंत्र्यांना ५० लाख, तर आईकडे ५० लाखांचे कर्ज

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि.३ मे-**

कल्याण लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार श्रीकांत शिंदे यांनी गुरुवारी उमेदवारी अर्ज भरला. हा अर्ज भरताना त्यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात वडील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ४.८४ लाख तर आई लता शिंदे यांना ४९ लाख ८१ हजार रुपये कर्ज दिले असल्याचे नमूद केले आहे.



निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवर संपत्तीचं विवरण देण्यात आले आहे. त्यामधून कर्जाबाबतची ही रंजक माहिती समोर आली आहे. श्रीकांत शिंदेंकडे असणाऱ्या दोन घडाळ्यांची किंमत १ लाख १० हजार आहे. त्यांच्याकडे एक हिऱ्याची आंगठी असून त्याची किंमत ४ लाख ९७ हजार आहे. त्यांच्या पत्नीच्या हिऱ्याची अंगठी ७ लाख ५६ हजार रुपये किंमतीची आहे. श्रींकांत शिंदेंकडे ११ लाख ३४ हजारांचं सोनं आहे. तर त्यांच्यावर १ कोटी ७७ लाखांचं कर्ज आहे. श्रीकांत शिंदेंच्या पत्नीकडे १ लाख ४१ हजार रुपये रोख रक्कम आहे. त्यांच्यावर ४ कोटी ८५ लाख, ८३ हजार ८९३ रुपयांचं कर्ज आहे. त्यांच्याकडे एकही वाहन नाही. त्यांच्या नावार सातारा जिल्ह्यातील दरे गावात २ कोटी ७१ लाख रुपये बाजारमुल्य असलेली शेतजमीन आहे. तर पत्नींच्या नावावर सिंधुदुर्ग जिल्ह्यात ४ कोटी ६ लाख रुपये बाजारमुल्य असलेली शेत जमीन आहे. श्रीकांत शिंदे आणि त्यांच्या पत्नींची एकत्र १४ कोटी ९२ लाख ८ हजार ८१२ रुपये संपत्ती आहे. त्याचबरोबर त्यांच्या नावावर एकाही गुन्ह्याची नोंद नाही, अशी माहिती या प्रतित्रापत्रात देण्यात आली आहे. शिंदे कल्याण लोकसभा मतदारसंघातून सलग तिसऱ्यांदा लोकसभा निवडणूक लढवत आहेत. आता विजयाची हॅट्रिक करण्यासाठी त्यांच्यासमोर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वैशाली दरेकर-राणे यांचे आव्हान आहे.

# कोकणात आजी-माजी शिवसैनिकांमध्ये आरपारची लढाई

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**सिंधुदुर्ग, दि.३ मे :**

केवळ कोकणातच नव्हे तर अवघ्या राज्याचे लक्ष लागून राहिलेला रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात यंदा दोन कट्टर आजी-माजी शिवसैनिकांमध्ये आरपारची लढाई होत आहे. विशेष म्हणजे सेनेच्या स्थापनेनंतर कोकणात प्रथमच धनुष्यबाण चिन्हाशिवाय निवडणुक होत असून उद्धव ठाकरे गटाचे खा.विनायक राऊत हे कधीकाळचे सहकारी व दीड दशकापासूनचे कट्टर विरोधक केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचा त्यांच्या मुलाप्रमाणेच चितपट करीत हॅटट्रिक विजयाची हॅटट्रिक करणार की राणे आपल्या मुलाच्या दोन वेळेच्या पराभवाचा वचपा काढणार? याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

महाविकास आघाडीकडून राऊत यांची उमेदवारी पहिल्यापासूनच निश्चित होती. त्यांनी प्रचाराला सुरुवात केली होती. मात्र महायुतीमधील जागा वाटपाचा तिढा शेवटच्या क्षणापर्यंत रखडली होता. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने प्रयत्नाची पराकष्टा करूनही भाजपा श्रेष्ठींनी ही जागा नारायण राणेसाठी आपल्याकडे खेचून घेतली. त्यामुळे गेल्या दोन वर्षापासून निवडणुकीची तयारीला लागलेल्या उद्योग मंत्री उदय सामंत यांचे मोठे बंधू किरण सामंत व त्यांचे समर्थकात नाराजी आहे. राणे यांच्या प्रचारात ते दिसत असलेतरी मतदानावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते काय भूमिका घेणार? यावर येथील महायुतीच्या विजयाचे गणित अवलंबून आहे.

नारायण राणे यांनीही १५ दिवसांपासून मतदारसंघात तळ ठोकत सभा-बैठका, भेटीगाठींचा धडाका लावला आहे. ठाकरे गटासाठी ही लढाई अस्तित्वाची असून महायुतीसाठी ती प्रतिष्ठेची ठरली आहे. राणे यांच्या विजयासाठी मंत्री सामंत व किरण सामंत यांच्यावरही मोठी जबाबदारी आहे.







**रणसंग्राम लोकसभेचा; लक्षवेधी लढत**

**रत्नागिरी- सिंधुदुर्ग मतदारसंघ**

### खा. विनायक राऊत यांच्या सकारात्मक बाजू

✻ निष्ठावंत शिवसैनिक, काँग्रेस व शरद पवार गटाची साथ

✻ ठाकरे गटाकडे अल्पसंख्यांक समाजाचा वाढता कल

**नकारात्मक बाजू:**

✻ केंद्र व राज्यातील सत्ता केंद्राचा विरोध व राणे यांना मानणारा वर्ग

✻ शिवसेनेतील फुटीमुळे मतांची विभागणी

### नारायण राणे यांच्या सकारात्मक बाजू

✻ भाजपा बरोबरच शिवसेना शिंदे गट व अजित पवार गटांची साथ ✻ मतदारांपर्यंत पोहोचणारी तगडी प्रचार यंत्रणा

**नकारात्मक बाजू:**

✻ उमेदवारी न मिळाल्याने महायुतीतील अंतर्गत गटबाजी व नाराजी ✻ दोन्ही पुत्रांकडून वारंवार शिवराळ भाषेतील वादग्रस्त वक्तव्यामुळे सर्वसामान्यांतील नाराजी

पूर्वीचा हा राजापूर मतदारसंघ कधीकाळी समाजवाद्यांचा बालेकिल्ला होता. १९८४ मध्ये राजीव गांधी पंतप्रधान झाले. त्यावेळी काँग्रेसच्या लाटेतही येथून समाजवादी पक्षाचे मधू दंडवते यांनी विजय मिळवला होता. या मतदारसंघाचे त्यांनी पाचवेळा प्रतिनिधित्व केले आहे. बॅरिस्टर नाथ पै व त्यानंतर शिवसेनेतर्फे सुरेश प्रभू हेही प्रत्येकी तीन वेळा निवडून आले होते. १९९६ पासून या मतदारसंघात शिवसेनेचे प्राबल्य राहिले आहे. या मतदारसंघांतर्गत राणेंचे पूत्र नितेश राणे (कणकवली) हे भाजपाचे आमदार आहेत. शिवसेनेतील फुटीनंतर उदय सामंत (रत्नागिरी) आणि दीपक केसरकर (सावंतवाडी) हे शिंदे गटात गेले. तर राजन साळवी (राजापूर) आणि वैभव नाईक ( कुडाळ) हे ठाकरेंसोबत राहिले. चिपळूणचे आमदार शेखर निकम हे अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत आहेत.६ पैकी ४ जागा महायुतीकडे तर २ जागा महाविकास आघाडीकडे असे सध्याचे समीकरण आहे. कोकणातील उद्योग-प्रकल्प, बेरोजगारी, कोकणाचा विकास, पर्यटन या मुद्द्यांवर नारायण राणे यांनी सुरुवातीपासूनच भर दिल्याचे पाहायला मिळत आहे. त्याचवेळी विनायक राऊत यांनी प्रचारसभांमधून विकासाच्या मुद्द्यांव्यतिरिक्त राणे व भाजपला लक्ष्य केले आहे.

कोकणात येऊ घातलेले प्रकल्प, बेरोजगारी तसेच कोकणातील विकास करताना येथील पायाभूत सुविधांची आवश्यकता, येथील पर्यटन उद्योग, कोकणातील पर्यावरण संवर्धन हे विषय कोकणासाठी महत्त्वाचे आहेत. युतीसाठी दीर्घकाळ अनुकूल असलेल्या या मतदारसंघात २००९मध्ये काँग्रेसचे नीलेश राणे निवडून आले होते .त्यानंतर दोनवेळा राऊत यांनी त्यांचा पराभव केला आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत निलेश राणे यांना दोन लाख ७९ हजार मते मिळाली होती. यामध्ये आता भाजप, मनसे व आरपीआय आठवले गट यांच्या मतांची भर पडणार आहे. शिवसेनेतील फुटीनंतर ही निवडणूक होत असल्याने ती लक्षवेधी ठरत आहे.

२०१९ मध्ये निवडणुकीत राऊत यांना सामंतबंधूची भक्कम साथ मिळाली होती. रत्नागिरी जिल्ह्यातून राऊत यांना दोन लाख ६० हजार ७८८ मते मिळाली होती. यामध्ये राऊत यांना सर्वाधिक म्हणजे, एक लाखांचे मतदान हे केवळ रत्नागिरी विधानसभा मतदारसंघातील होते. रत्नागिरी जिल्ह्यात ७,८७,०६४ मतदार आहेत. तर, सिंधुदुर्ग जिल्ह्यात ४,६२,५६६ मतदार आहेत. म्हणजेच रत्नागिरी जिल्ह्याची व पर्यायाने सामंत बंधूंची राणे यांना मिळालेली साथ महत्त्वाची ठरणार आहे.

राणे यांनी २००५ साली उद्धव ठाकरेंना लक्ष्य करत शिवसेनेला जय महाराष्ट्र केले. समर्थक आमदारासह गट घेऊन काँग्रेसमध्ये जाऊन सत्ता व मंत्रीपदही मिळविले. नंतर स्वत:चा महाराष्ट्र स्वाभिमान पक्ष आणि आता भाजपा असा त्यांचा गेल्या दोन दशकांचा प्रवास आहे. त्यामध्ये पक्षनिहाय भुमिका बदलत राहिले तरी उध्दव ठाकरे यांचा प्रचंड द्वेष हाच त्यांच्या राजकारणाचा मुख्य फोकस राहिलेला आहे. भाजपाने तेच हेरून केवळ उद्धव यांना त्यांच्याच भाषेत प्रत्यूत्तर देण्यासाठी राणेंना केंद्रात मंत्रीपद व त्यांच्या दोन्ही मुलांना पक्षात महत्त्वाची पदे दिली आहेत. हे सर्वश्रुत आहे त्यामुळे आता कोकणात कमळ फुलवण्यासाठी राणेंना आरपारची लढाई करावी लागेल, त्यासाठी भाजपाने सर्व शक्ती त्यांच्या पाठीशी लावली आहे.



जनहितार्थ जारी

मतदानाची संधी कधीही चुकवू नका, कारण ते आपल्या देशासाठी आपले योगदान आहे.



## अग्रलेख...

# काँग्रेस पक्षाचा घोळात घोळ

देशभरात गेल्या १० वर्षांपासून काँग्रेस पक्षाची वाताहत सुरू आहे. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे पानिपत झाले. यावेळच्या लोकसभा निवडणुकीतही काँग्रेस पक्षाची स्थिती यापेक्षा वेगळी नाही. तरीपण काँग्रेस पक्षाला शहाणपण येत नाही, याचे आश्चर्य वाटते. काँग्रेस पक्षाने अखेर अमेठी आणि रायबरेलीतील आपल्या उमेदवारांच्या नावांची घोषणा करताना घोळ घातला. अमेठीतून किशोरीलाल शर्मा यांना तर रायबरेलीतून राहुल गांधी यांना उमेदवारी दिली. काँग्रेस पक्षाचा हा निर्णय म्हणजे डोंगर पोखरून उंदीर काढण्यासारखा आहे. यात काहीच नवे नाही. काँग्रेस महासचिव प्रियांका वढेरा यावेळी लोकसभा निवडणूक लढवणार नसल्याचे स्पष्ट झाले आणि राहुल गांधी अमेठी सोडून आपल्या आईच्या म्हणजे सोनिया गांधींच्या रायबरेली मतदारसंघात गेले. काँग्रेस पक्षाने या दोन जागांवरचे आपले उमेदवार घोषित करायला आपल्या नेहमीच्या सवयीनुसार नाटकं केली. काँग्रेस पक्षाला जणू आपला पंतप्रधानपदाचा उमेदवार तसेच पूर्ण मंत्रिमंडळ ठरवायचे होते. एवढा वेळ त्यांनी अमेठी आणि रायबरेलीचा उमेदवार निश्चित करण्यासाठी घेतला. असे करून काँग्रेस पक्षाने स्वतःचे नुकसान करून घेतले आहे. अमेठीतून किशोरीलाल शर्मा यांची उमेदवारी पुरेशी आधी जाहीर केली असती तर त्यांना प्रचार करायला पुरेसा वेळ मिळाला असता. आपल्याला निवडणूक लढवायची आहे की नाही, हे प्रियांका वढेरा यांनी आधीच जाहीर करायला पाहिजे होते. तसेच आपण अमेठीतून नाही तर यावेळी रायबरेलीतून निवडणूक लढणार, हे राहुल गांधींनीही आधीच सांगायला हवे होते. भाजपाने आपल्या पहिल्या यादीत केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांची अमेठीतून उमेदवारी जाहीर केली. गेल्या महिनाभरापासून त्या अमेठीत तळ ठोकून आहेत. त्यांच्या पूर्ण मतदारसंघातील प्रचाराच्या दोन-तीन फेऱ्याही पूर्ण झाल्या आणि काँग्रेस पक्ष कोणाला उमेदवारी द्यायची याचेच चर्वितचर्वण करीत राहिला. आता स्मृती इराणी यांना अमेठीत काँग्रेसचे किशोरीलाल शर्मा यांच्याशी लढायचे आहे. मागील निवडणुकीत अमेठीत राहुल गांधी यांचा स्मृती इराणी यांच्यासमोर टिकाव लागला नाही तर यावेळी किशोरीलाल शर्मा कोण? त्यामुळे अमेठीची निवडणूक यावेळी इराणी यांनी आता न लढताच जिंकली आहे. कारण, अमेठी सोडून राहुल गांधी यांनी तसेच काँग्रेस पक्षाने आपला पराभव मान्य केला आहे. अमेठीतून प्रियांका वढेरा यांचे पती रॉबर्ट वढेरा यांनी निवडणूक लढण्याची इच्छा व्यक्त केली होती. म्हणजे जो निवडणूक लढायची तयारी दाखवतो, त्याला काँग्रेस पक्ष उमेदवारी देत नाही आणि जे निवडणूक लढवायला तयार नाही, त्यांना निवडणूक लढवायची जबरदस्ती करतो.

कधीकाळी उत्तरप्रदेशात काँग्रेसची सत्ता होती, हे आता कोणाला सांगितले तर त्याचा त्यावर विश्वास बसणार नाही, एवढी त्या राज्यात काँग्रेसची दयनीय स्थिती आहे. उत्तरप्रदेशात सर्वाधिक म्हणजे लोकसभेच्या ८० जागा आहेत. विशेष म्हणजे त्यावेळी काँग्रेस पक्ष उत्तरप्रदेशातील लोकसभेची निवडणूक स्वबळावर लढवायचा आणि जिंकायचा. पण आता त्या राज्यात काँग्रेस शोधावी लागत आहे. २०१४ मध्ये काँग्रेस राज्यात अमेठी आणि रायबरेली अशा दोनच जागा जिंकू शकला होता. २०१९ मध्ये तर काँग्रेसला फक्त रायबरेलीची एकमेव जागा जिंकता आली. अमेठीत केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनी राहुल गांधी यांचा पराभव केला होता.

अमेठी आणि रायबरेली हे काँग्रेस पक्षाचे विशेषत: गांधी घराण्याचे गड मानले जात होते. पण या गडाला अमेठीच्या रूपात पहिला हादरा २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत बसला. मागील वेळी राहुल गांधी यांनी अमेठीसोबत केरळच्या वायनाडमधूनही निवडणूक लढवल्यामुळे तसेच तेथे ते जिंकल्यामुळे त्यांची आणि काँग्रेस पक्षाचीही ठाकूरकी राहिली. यावेळी सोनिया गांधी यांनी प्रकृतीच्या कारणावरून रायबरेलीतून लोकसभा निवडणूक लढण्यास नकार दिला आणि मागच्या दाराने म्हणजे राज्यसभेतून त्या राज्यसभेवर पोहोचल्या. त्यामुळे काँग्रेसची पाचावर धारण बसणे स्वाभाविक होते. अमेठीत मागील वेळी राहुल गांधी यांचा पराभव झाल्यामुळे यावेळी ते तेथून निवडणूक लढण्यास फार उत्सुक नव्हते आणि सोनिया गांधींनी तर लोकसभा निवडणूक लढण्यासच नकार दिला. त्यामुळे या दोन मतदारसंघांतून कोणाला उभे करावे, उमेदवारी द्यावी, असे गहन प्रश्न काँग्रेसला पडणे स्वाभाविक होते. रायबरेलीतून प्रियांका वढेरा निवडणूक लढवतील, अशी चर्चा होती. पण त्यांचीही लोकसभा निवडणूक लढवण्याची हिंमत झाली नाही. त्यांनीही निवडणुकीच्या मैदानातून पळ काढला. प्रियांका गांधी आतापर्यंत काँग्रेस महासचिव म्हणून उत्तरप्रदेशच्या प्रभारी होत्या. २०२२ ची राज्यातील विधानसभा निवडणूक काँग्रेसने त्यांच्या नेतृत्वात लढवली होती. ४०३ सदस्यांच्या विधानसभेत काँग्रेसला फक्त दोन जागा जिंकता आल्या. म्हणजे उत्तरप्रदेशातून लोकसभेत एक आणि विधानसभेत दोन अशी काँग्रेसची कामगिरी होती. त्यामुळे यावेळच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस काय दिवे लावणार, हे दिसतच होते. विधानसभा निवडणुकीत 'लडकी हूं लड सकती हूं...' म्हणत महिलांमध्ये जोश निर्माण करणाऱ्या प्रियांका वढेरा यांची मात्र यावेळी निवडणूक लढण्याची हिंमतच झाली नाही. आपल्या पराभवाची चाहूल लागल्यामुळे प्रियांका वढेरा यांनी रायबरेलीतून लोकसभा निवडणूक लढण्यास नकार दिला असू शकतो.

राहुल गांधी यांचीही यावेळी पुन्हा अमेठीतून लोकसभा निवडणूक लढण्याची हिंमत झाली नाही. एखादा लहान मुलगा आपल्या आईच्या पदरामागे लपतो, तसेच राहुल गांधींनी आपल्या आईच्या रायबरेली मतदारसंघाची निवड करत आईचा पदर पकडला आहे. यावेळची लोकसभा निवडणूक फोकनाड राहुल गांधी वायनाड आणि रायबरेली मतदारसंघातून लढवत आहे. वायनाडमधील मतदान आटोपले असून अमेठीत २० मे ला मतदान होत आहे. खरं म्हणजे कोणत्याही नेत्याने दोन मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढवावी का, असा मोठा प्रश्न आहे. राहुल गांधी वायनाड आणि रायबरेली अशा दोन्ही मतदारसंघांतून जिंकले तर त्यांना एका मतदारसंघाचा राजीनामा द्यावा लागेल. त्यामुळे त्यांनी राजीनामा दिलेल्या मतदारसंघात आयोगाला पुन्हा पोटनिवडणूक घ्यावी लागेल. या पोटनिवडणुकीचा भुर्दंड सामान्य जनतेवर का पडू द्यायचा? समजा राहुल गांधी दोन्ही मतदारसंघात हरले तर प्रश्नच नाही. पण दोनपैकी एका मतदारसंघात ते पराभूत झाले तर फारसा फरक पडणार नाही; पोटनिवडणूक घेण्याची वेळ येणार नाही. मात्र, दोन्ही मतदारसंघांत ते जिंकले, ज्याची दुर्दैवाने शक्यता नाही, तर एका मतदारसंघातील पोटनिवडणूक घ्यावी लागणार आहे. वायनाडमधील मतदान आटोपले आहे. तेथील मतदारांनी काय निर्णय घेतला, हे ४ जूनला मतमोजणीनंतर समजणार आहे. त्यामुळे रायबरेलीच्या मतदारांनी तरी निवडणूक आयोगावर पोटनिवडणूक घेण्याची वेळ येणार नाही, याची काळजी घ्यायला हरकत नाही. अमेठीच्या मतदारांनी आपली राजकीय समज आणि शहाणपण २०१९ च्या निवडणुकीत दाखवला होता; आता वेळ रायबरेलीच्या मतदारांची आहे. त्यांना आता आपली राजकीय समज आणि शहाणपण दाखवायचा आहे. अमेठी आणि रायबरेलीत उमेदवारी अर्ज भरण्याचा काही तास उरले असताना काँग्रेसने आपल्या उमेदवारांची घोषणा करीत आपल्या बौद्धिक दिवाळखोरीचे तसेच पराभूत मानसिकतेचे दर्शन देशाला घडवले आहे. काँग्रेस पक्षाकडून यापेक्षा वेगळी अपेक्षा तरी आपण काय करू शकतो...

## यंगिस्तान

### जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# 'व्होट जिहाद'ला मुस्लिम मतदार बळी पडतील?

भारतीय जनता पक्षाने सत्तेत येऊन १० वर्षे पूर्ण केली आहेत. या १० वर्षांत भारतात आमूलाग्र बदल झाला. पूर्वी हिंदू-मुस्लिम अशा दोन भागांत भारतीय भावविश्वाची विभागणी केली जायची; पण मोदींनी एकात्मतेची हाक दिली. अयोध्येत राम मंदिरात बालकरामाची प्राणप्रतिष्ठा झाली तेव्हा मुसलमान समाजाकडूनही शुभेच्छा आल्या. स्वयंघोषित पुरोगाम्यांना मात्र या गोष्टीचा खूपच त्रास झाला. काश्मीरमधून ३७० हटवले तेव्हा दंगली घडतील, अतिरेकी हल्ला होईल, अशी भीती पुरोगामी विश्वाने दाखवली होती. मात्र, तुम्ही जेव्हा राजधर्म पाळता तेव्हा तुम्ही परिस्थिती व्यवस्थित हाताळू शकता, हे मोदींनी दाखवून दिले. नरेंद्र मोदींनी गुजरात दंगल व्यवस्थित हाताळली होती. म्हणूनच त्यांच्याकडे सुशासन, प्रशासन आणि विकास या सर्व गोष्टींचा अनुभव होता. याचा लाभ भारतीय जनतेला झाला. या १० वर्षांत भारताचा वेगाने विकास झाला, भारताबाहेर भारताचा डंका वाजू लागला, अतिरेकी आणि पाकिस्तान पहिल्यांदा आपल्याला घाबरू लागला, गरिबांना वीज, सिलेंडर, घरे इत्यादी सुविधा मिळाल्या; त्याचबरोबर देशात हिंदुभावविश्व मजबूत झाले.

मोदींकडे त्यांनी केलेल्या कामांची भलीमोठी यादी आहे. मला वाटतं मोदी हे पहिले असे पंतप्रधान आहेत, जे आपण काय काय केलं हे ठामपणे सांगू शकतात. 'ओपिनियन पोल्स'मध्ये मोदी बहुमताने जिंकतील, अशीच भविष्यवाणी करण्यात आली आहे. या सर्व गोष्टींमुळे काँग्रेस चिंतित आहे. मोदींना घालवण्यासाठी ते कोणत्याही थराला जाऊ शकतात. कारण, त्यांना भारताशी काही देणे-घेणे नसून केवळ सत्तेची फळे चाखायची आहेत. म्हणून 'संविधान वाचवा,' असे म्हणणारे राहुल गांधी काश्मीरमध्ये संविधान लागू करू शकले नाहीत. आताची २०२४ ची निवडणूक ही साधीसुधी निवडणूक नसून हे एक युद्ध आहे, हे आपण जाणून घेतलं पाहिजे आणि हे युद्ध आपल्याला कोणासंगे लढायचं आहे? तर माणुसकीच्या शत्रूसंगे... अमित शाह यांना भारतीय पत्रकार विचारतात की, पाकिस्तानात भारताच्या एजेन्सीज अतिरेक्यांना ठार मारत आहेत. हे काय होतंय्? यावर अमित शाह ठामपणे उत्तर देताना विचारणा करतात की, 'अतिरेकी मेल्याचा तुम्हाला का त्रास होतोय्?' हे जे स्वतःला पुरोगामी म्हणवून घेणारे लोक आहेत, ते घातक वृत्तीचे आहेत. म्हणूनच तर मारिया आलम खान यांच्या विधानाबद्दल ही चाय-बिस्कुट मीडिया गप्प बसली.




सलमान खुर्शिद यांची भाची मारिया आलम खान यांनी मोदींना घालवण्यासाठी मुसलमानांना 'व्होट जिहाद' करायला सांगितले आहे. व्होट जिहाद? आधी लव्ह जिहाद, लॅण्ड जिहाद यानंतर आता 'व्होट जिहाद.' हिंदू मुलींच्या शरीराचे तुकडे करून कधी सुटकेसमध्ये, कधी फ्रिजमध्ये टाकून झाले. जम्मू-काश्मीरमध्ये हिंदूंचा नरसंहार करून त्यांच्या जमिनी बळकावून 'लॅण्ड जिहाद' करून झाला. आता 'व्होट जिहाद' करून भारतात १०० पाकिस्तान निर्माण करायचे आहेत का? आजही मुसलमानबहुल भागात हिंदू जायला घाबरतात. हे असं का होतं, हा प्रश्न मुसलमान जनतेने स्वतःला विचारला पाहिजे. 'इस्लामोफोबिया' असं गोंडस नाव देऊन या विषयाकडे डोळेझाक करून चालणार नाही. ही गंभीर समस्या असून सबंध जगाला ही समस्या सतावते आहे आणि या समस्येचा फायदा काँग्रेस उचलण्याचा प्रयत्न करतेय्. म्हणूनच भारतावर पहिला अधिकार मुस्लिमांचा आहे, असे ते म्हणतात. संपत्तीचे समान वाटप, धर्माच्या आधारावर आरक्षण ही काँग्रेसने दिलेली हाक भविष्यात गंभीर परिस्थिती निर्माण करणारी आहे.

मोदींना हरवण्याचे सगळे मार्ग बंद झाल्यामुळे काँग्रेस आता मुस्लिमांना भडकवत आहेत. काही मूठभर उच्चभ्रू मुस्लिम वगळता इतर मुस्लिम समाज मागास राहिला. याला कारण काँग्रेस आणि मुस्लिमांमधील राजकीय नेते आहेत. काश्मीरमध्ये मिसुरडंही न फुटलेल्या मुलांच्या हातात यांनी दगड दिला. त्या पोरांची ओळख काय? तर स्टोन पेल्टर... जणू ही काही खूप मोठी पदवी आहे. ज्या वयात अभ्यास करायचा, स्वतःचं आणि देशाचं नशीब बदलण्याची स्वप्ने पाहायची त्या वयात ही मुलं दगड मारत फिरतात. यांच्या हातात लॅपटॉप दिला असता तर ते मोठ्या हुद्यावर काम करून लाखो रुपये कमावत असते. मात्र, काँग्रेसच्या स्थापनेपासून त्यांना मुसलमान हा विषय हाताळताच आला नाही. मुस्लिम समाजाला धर्मावरून भडकवणं सोपं असतं. याचा फायदा या राजकीय नेत्यांनी घेतला; पण या बदल्यात मुस्लिमांना काय मिळालं? गरिबी, बेरोजगारी आणि अतिरेकी असण्याचा शिक्का? हे चित्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बदलायचं आहे. म्हणूनच 'हिंदूंची साथ हिंदूंचा विकास' असं न म्हणता ते 'सबका साथ, सबका विकास' म्हणतात.

वाचकहो, अरबस्थानदेखील आता बदलत आहे. त्यांना आपल्या जुन्या संस्कृतीची आठवण येत आहे. 'एमबीएस' या नावाने ओळखले जाणारे सौदीचे पंतप्रधान मोहम्मद बीन सलमान हे अतिशय आधुनिक व सुधारणावादी विचारांचे मानले जातात. त्यांनी इस्लामपूर्व काळात पुजल्या जाणाऱ्या तीन देवींच्या मूर्ती म्हणजे आपला इतिहास आहे, असं म्हणत त्यांचं प्रदर्शन ठेवलं आहे. अल्-लत, अल्-उझ्झा आणि मनत अशी या देवींची नावे आहेत. कारण त्यांना माहिती आहे की, जग आता खूप बदललं आहे आणि पुढे गेलं आहे. अशा परिस्थितीत आपण केवळ जुन्या खपल्या काढत राहिलो तर आपण या भव्य स्पर्धेत हरवून जाऊ.

हीच बाब भारतीय मुस्लिमांनी लक्षात ठेवायची आहे. काँग्रेसच्या नादाला लागून पुन्हा १००० वर्षे मागे जायचे आहे की १००० वर्षे पुढचा विचार करत विकास साधायचा आहे व स्वतःचे कल्याण करून घ्यायचे आहे, याचा आता या समाजाने गांभीर्याने विचार करायला हवा. इतर सर्व मुस्लिम देशांचा अभ्यास करायला हवा आणि इतक्या वर्षांत भारतीय म्हणून आपल्या अस्तित्वाचेही मूल्यांकन करायला हवे. हिंदूंचा स्वभाव मुळातच बदल घडवणारा असल्यामुळे या जागतिक स्पर्धेत कसे टिकून राहायचे याची त्यांना चिंता नाही. हिंदू पुढे-पुढेच जाणार आहेत. मात्र, काही मूठभर लोकांच्या ऐशोआरामासाठी आणि स्वार्थासाठी आपण किती काळ मागास राहायचे, यावर विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. हीच ती वेळ, हाच तो क्षण...

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

### विजय कुळकर्णी

# आरटीई अंतर्गत प्रवेश देण्यास शैक्षणिक संस्था उदासीन?

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने राईट ऑफ एज्युकेशन (आरटीई) ही योजना सुरू केली. या योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व मागासवर्गीय घटकातील विद्यार्थ्यांना २५ टक्के आभासी पद्धतीने अर्ज करून इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळांमध्ये सक्तीने प्रवेश देण्यात येतो. केवळ पैशांअभावी राज्यातील गरीब विद्यार्थी इंग्रजी माध्यमांच्या शिक्षणापासून वंचित राहू नये, हा यामागचा शासनाचा शुद्ध उद्देश आहे. मात्र, राज्यातील विविध खाजगी संस्थांकडून या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास टाळाटाळ होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

याबाबत वंचित बहुजन आघाडीचे घाटाखालील बुलढाणा जिल्हाध्यक्ष गणेश चौकसे यांनी थेट राष्ट्रपतींकडेच एका निवेदनातून तक्रार करून आरटीई प्रवेश प्रक्रियेतून वंचितांना दूर ठेवले जात असल्याचे म्हटले आहे. या योजनेंतर्गत प्रवेश अर्ज केलेले राज्यातील ८ लाख ६५ हजार विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहण्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे. राज्य शासनाच्या शिक्षण संचालक प्राथमिक विभाग पुणे यांच्यामार्फत ही योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत आभासी पद्धतीने प्रवेश अर्ज करावा लागतो. मात्र, पालकांनी आपल्या पाल्यांच्या प्रवेशासाठी आरटीई साईटवर नोंदणी करण्याचा प्रयत्न केला असता सर्व खाजगी इंग्रजी शाळांचे आभासी पटल बंद असल्याचे आढळले. केवळ मराठी, हिंदी, उर्दू या शाळांच्या साईट सुरू आहेत. जर राज्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार इंग्रजी माध्यमातून शिक्षण मिळाले नाही तर ते आयएएस, आयपीएस इत्यादी स्पर्धात्मक परीक्षेत यश कसे काय मिळवू शकतील? स्पर्धात्मक परीक्षा देण्याजोगी त्यांची बुद्धिमत्ता तयार होईल का? असे या निमित्ताने विचारावेसे वाटते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असल्याने हे विद्यार्थी भरमसाट शैक्षणिक शुल्क आकारणाऱ्या दर्जेदार इंग्रजी माध्यमांच्या शाळेत प्रवेश घेऊ शकत नाहीत. त्यांच्यावरील हा अन्याय दूर करण्यासाठी शासनाने ही योजना सुरू केली खरी; पण संबंधित शैक्षणिक संस्था त्यांना हवे तेवढे शैक्षणिक शुल्क मिळणार नसल्याने त्यांच्या साईट डिसेबल ठेवत असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच, आरटीई अंतर्गत २५ टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश देणाऱ्या शाळांचे २०१० ते २०२३ या कालावधीतील हजारो कोटी रुपये शासनाकडे थकित आहेत. त्यामुळे या शैक्षणिक संस्था त्यांच्याकडे आरटीई योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास इच्छुक नसल्याचे वास्तव याबाबत काही संस्थाचालकांशी संपर्क साधला असता समोर आले आहे. तसेच, आपल्या पाल्याला प्रवेश मिळावा म्हणून काही पालक दलालांची मदत घेतात. दलालांच्या माध्यमातून काढण्यात आलेले दाखले खोटे असल्याचे आढळले आहे. अशा खोट्या दस्तावेजांद्वारे प्रवेश मिळविले जात असल्यानेदेखील संबंधित शैक्षणिक संस्था या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची जोखीम पत्करण्यास तयार नसल्याचे दिसून येत आहे. खोट्या प्रमाणपत्रांच्या आधारे प्रवेश घेतले जाऊ नये म्हणून शिक्षण संचालनालयाने दस्तावेजांची यादी जाहीर केली आहे. ही कागदपत्रं खोटी आढळल्यास त्या विद्यार्थ्याचा प्रवेश तत्काळ रद्द होईल. आरटीई प्रवेशानंतर कधीही पडताळणी पथक विद्यार्थ्याच्या रहिवासी पत्त्यावर भेट देऊन कागदपत्रांची पडताळणी करणार आहे. तसेच, या योजनेंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सरसकट अनुत्तीर्ण केल्याच्या तक्रारी शिक्षण विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. त्यानंतर शिक्षण विभागाने याबाबत कठोर पावले उचलून या विद्यार्थ्यांना सरसकट अनुत्तीर्ण करणाऱ्या शाळांची चौकशी करण्याचे आदेश शालेय शिक्षण विभागाने संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहेत. शासनाने ५ वी आणि ८ वीच्या विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा घेण्याचे ठरविले आहे. त्यात अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची दोन महिन्यात पुनर्परीक्षा घेतली जाणार आहे. त्यात अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याच वर्गात ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याची किनार पकडून काही मोठ्या शाळा आरटीई अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण करीत असल्याचे प्रकारही समोर आले आहेत. अशा शाळांची तपासणी करण्याचे निर्देश संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

हे सर्व असताना पालक आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमांच्या (कॉन्व्हेंट) शाळा, सीबीएसई पॅटर्नच्या शाळांमध्येच प्रवेश मिळावा, असा हट्ट का धरतात? जिल्हा परिषद, नगर पालिका, महानगर पालिकांच्याही इंग्रजी माध्यमांच्या दर्जेदार शाळा आहेत. त्यात विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश दिला जातो. मग, ते सोडून आरटीईच्या माध्यमातून इंग्रजी माध्यमांच्या मोठ्या शाळांमध्येच आपला पाल्य शिकावा, असा हट्ट कितपत योग्य आहे? सुज्ञ पालकांनी यावर विचार करावा व आपल्या पाल्याची बुद्धिमत्ता पाहून त्यांना झेपेल असे शिक्षण द्यावे, असे या निमित्ताने म्हणावेसे वाटते.

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

### नागेश दाचेवार

# दिव्याखाली अंधार!

देशातल्या सत्तेला तडीपार करायला निघालेल्या महाराष्ट्रातील भग्न पक्षाच्या नेत्याच्या पक्षाचा ज्या एकमेव ठिकाणी प्रभाव असल्याचे बोलले जात होते, ते ठिकाण म्हणजे मुंबई. मुंबईसाठी आम्हीच लढा दिला, आमच्यामुळेच मुंबई वाचली, नाहीतर महाराष्ट्रात राहिली नसती. मराठी माणूस आमच्यामुळे मुंबईत जगला नाहीतर नामशेष झाला असता. आजही मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव आहे, पण तो आम्हीच हाणून पाडत आहोत, असे अनेकानेक दावे करणाऱ्या नेत्याचा भग्न पक्ष हा त्याच मुंबईतील लोकसभेच्या पूर्ण सहा जागादेखील लढत नाही आहे. सहापैकी केवळ चार जागांवर उमेदवार दिले आहेत. त्यातही सर्वात गमतीची बाब म्हणजे स्वतः राहत असलेला मतदारसंघ स्वतः लढवू शकत नाही, काँग्रेस पक्ष लढणार आणि हे 'पंजा'ला मतदान करणार इतकी नामुष्की यांच्यावर ओढवली आहे. महत्त्वाचं म्हणजे यातील एकाही जागेवर यांच्या उमेदवारांच्या विजयाची तसूभरही शक्यता दिसत नाही आहे. त्यामुळे अशा या परिस्थितीला मराठीतील एकमेव म्हण लागू होते ती म्हणजे 'दिव्याखाली अंधार!'

महाराष्ट्रातील २० मे रोजी शेवटच्या अर्थात पाचव्या टप्प्यात होऊ घातलेल्या सर्वाधिक १३ मतदार संघांपैकी सहा मतदारसंघ हे मुंबईतील आहेत. मुंबई दक्षिण, मुंबई दक्षिण-मध्य, मुंबई उत्तर, मुंबई उत्तर-मध्य, मुंबई उत्तर-पूर्व, मुंबई उत्तर-पश्चिम अशी मुंबईतील सहा मतदारसंघ आहेत. या सहा लोकसभा मतदारसंघांत लढाईची रेषा आखण्यात आली असून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील पक्ष, मुंबई दक्षिण, मुंबई दक्षिण-मध्य आणि मुंबई उत्तर-पश्चिम या तीन जागांवर आपसात भिडणार आहेत. तर, मुंबई उत्तर, मुंबई उत्तर-मध्य या दोन जागांवर भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमध्ये लढत होणार आहे. मुंबई उत्तर-पूर्व या एका जागेवर उबाठा आणि भाजपा यांच्यात थेट टक्कर बघायला मिळणार आहे.

दक्षिण मुंबईत उद्धव ठाकरेंचे विद्यमान खासदार अरविंद सावंत यांची लढत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या यामिनी जाधव यांच्याशी होणार आहे. जाधव या मुंबईतील भायखळा विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात. उबाठा गटाचे नेते अनिल देसाई हे शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे विद्यमान खासदार राहुल शेवाळे यांच्या विरोधात दक्षिण-मध्य मुंबईत उभे आहेत.



ठाकरे कॅम्पचे अमोल कीर्तिकर यांची मुंबई उत्तर-पश्चिममध्ये सत्ताधारी शिवसेनेचे जोगेश्वरी पूर्व क्षेत्रातील विद्यमान आमदार रवींद्र वायकर यांच्याशी लढत होणार आहे. मुंबई उत्तर-मध्यमधून भाजपाने रिंगणात उतरवलेले प्रसिद्ध वकील उज्ज्वल निकम यांच्या विरोधात काँग्रेसच्या आमदार वर्षा गायकवाड या दोन हात करणार आहेत तर केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे दिग्गज नेते पीयूष गोयल यांची उत्तर मुंबईत काँग्रेसचे उमेदवार भूषण पाटील यांच्याशी लढत आहे. उत्तर-पूर्व मुंबईत भाजपाचे मिहीर कोटेचा आणि उबाठा गटाचे संजय दिना पाटील यांच्यात लढत आहे. कोटेचा हे मुंबईतील मुलुंड विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत तर संजय पाटील माजी खासदार आहेत. ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे २००९ मध्ये या भागातून लोकसभेवर निवडून गेले होते. २०१९ मध्ये 'घड्याळ' चिन्हावर दारुण पराभव झाला होता. आता उबाठा गटाकडून निवडणूक रिंगणात आहेत.

२०१९ मध्ये उदयास आलेल्या राजकीय पुनर्संरचनेनंतर ही पहिली मोठी निवडणूक चाचणी म्हणावी लागेल. त्यामुळे आता 'किसमे कितना है दम' हे बघण्याची वेळ आली आहे. यावेळी लोकसभा निवडणुकीत मुंबईतील सहा मतदारसंघांमध्ये काय होणार, याची उत्सुकता सर्वांना लागलेली आहे. ठाकरेंचा बालेकिल्ला अर्थात ते म्हणवून घेतात; तो बालेकिल्ला आता ढासळताना दिसत आहे. मुंबई आणि ठाण्यात ठाकरेंना आणि मविआतील अन्य घटक पक्षांना मोठा धक्का बसण्याची चिन्हे आहेत. मुंबईतील सहापैकी सहा जागांवर आणि ठाणे, कल्याण येथे महायुतीचे उमेदवार विजयी होण्याचे संकेत लोकं देत आहेत. यापैकी केवळ दक्षिण मुंबई आणि ईशान्य मुंबईत थोडी चुरस पाहायला मिळू शकते. अन्यथा बाकी जागांवर महायुतीचे उमेदवार सहजपणे विजयाकडे वाटचाल करीत आहेत.

मुंबईतील उत्तर-मुंबई लोकसभा मतदारसंघ हा भाजपाचा बालेकिल्ला मानला जातो. यंदा या मतदारसंघातून भाजपाकडून पीयूष गोयल रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे या मतदारसंघात भाजपाचा विजय जवळपास निश्चित आहे. पण त्याचवेळी दक्षिण मुंबई, वायव्य मुंबई, दक्षिण मध्य मुंबई या तीन मतदारसंघांमध्ये ठाकरे गटाचे पारडे जड मानले जात होते. परंतु, दक्षिण मुंबईतून अरविंद सावंत, दक्षिण मध्य मुंबईतून अनिल देसाई आणि वायव्य मुंबईतून अमोल कीर्तिकर हे पराभवाच्या छायेत आहेत. ईशान्य मुंबईत ठाकरे गटाचे संजय दिना पाटील हे भाजपाच्या मिहीर कोटेचा यांच्याशी संघर्ष करीत आहेत. पण मागील वेळेस संजय पाटलांचा मोठा मताधिक्याने पराभव झाला होता. त्यामुळे तेवढी मोठी तफावत कमी करणे पाटलांसाठी अशक्यप्राय बाब आहे. त्यामुळे मुंबई, ठाणे या सर्व ठिकाणी ठाकरे गटाच्या उमेदवारांचा, मविआच्या उमेदवारांचा टिकाव लागणे कठीण झाले आहे. आजची ही मुंबईतली ठाकरे आणि त्यांच्या सोबत असलेल्या घटक पक्षांची परिस्थिती चिंताजनक आहे. विद्यमान खासदारांच्या जागा, मुंबई आपल्या बापाची असल्याचा समज असणाऱ्यांना मुंबईच्या जागा वाचविण्यात अपयश येत असताना, महाराष्ट्रातील जनता 'माझा परिवार माझी जबाबदारी'पुरतीच जबाबदारी हाती देतात की काय, अशी शंका असताना, याला तडीपार, त्याला तडीपार करण्याची भाषा हास्यास्पदच म्हणावे लागेल. त्यामुळे देशातील सर्व राज्यांत निवडणुका लढणाऱ्या पक्षाला, देशात सर्वाधिक खासदार, आमदार असणाऱ्या, जगात सर्वात मोठ्या असणाऱ्या पक्षाला, एका राज्यात त्यादेखील पूर्ण नव्हे तर अर्ध्याहून कमी जागांवर निवडणूक लढणाऱ्या पक्षाच्या नेत्याने आपली गल्लीतली पत ओळखून सल्ले किंवा आव्हान दिले पाहिजे, अन्यथा जनताच तुमचं हसं करेल यात शंका नाही.

९२७०३३३८८६

## कुटुंब नियोजनावर बोला हो!

सध्या लोकसभा निवडणुकीचा हंगाम चालू आहे. इंडिया व रालोआ अशा दोन प्रमुख आघाड्या, ज्यात घटक पक्षांच्या अंतर्भाव आहे, आमनेसामने उभ्या ठाकल्या आहेत. परंतु खरी लढाई सत्ता प्राप्त करण्यासाठी भाजपा-काँग्रेस या दोन प्रमुख पक्षांत आहे. लढाई, वादविवाद, आरोप-प्रत्यारोप चालू असून निरनिराळी प्रलोभने दिली जात आहेत. त्यात भाजपा सरकारने १० वर्षांत काय केले तर काँग्रेसची ७० वर्षे सत्ता असताना काय नाही केले, यावर जास्त जोर दिला जात आहे. भाजपाने १० वर्षांत जो काही चमत्कार व देश-विदेशामध्ये भारताचे नाव कसे उंचावले व काँग्रेस पक्षाने ७० वर्षांत देश-विदेशात भारताचे नाव कसे बदनाम करण्याचा प्रयत्न केला, यावर दोन्ही पक्षात आगपाखड चालू आहे. भ्रष्टाचार, आतंकवाद, परिवारवाद यावर भाजपा घणाघाती हल्ला करीत आहे. तर, काँग्रेस पक्ष व सहचारी पक्ष बेरोजगारी, महागाई, आरक्षण हे विषय घेऊन वाद उकरीत आहे. १० वर्षांत आर्थिक स्थिती सुरळीत करून शेतकरी, गरीब, महिला सन्मान, शिक्षण यात किती प्रगती केली, यावर भर देऊन भाजपा सत्ता प्राप्त करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असून काँग्रेस मोदींना शिव्याशाप देत आहे. काँग्रेस पक्षातील वरिष्ठ नेते काँग्रेस पक्ष सोडून भाजपात सामील होऊन राहिले तरी काँग्रेस पक्षाला याचे कारण अजून उमगले नाही. सनातन धर्मावर प्रहार करणे हा काँग्रेस व घटक पक्षाचा एक वेगळा कार्यक्रम झाला आहे. लोकशाही व संविधान नष्ट होणार हे आवर्जून सांगत आहेत; पण कोणताही पक्ष कुटुंब नियोजनावर लोकसंख्या स्थिर ठेवणे यावर लक्ष केंद्रित करीत नाही, त्याबद्दल कोणताही पक्ष बोलत नाही. भारताची लोकसंख्या नियंत्रणा पाहिजे असताना काँग्रेस पक्ष या कारणाकडे दुर्लक्ष करीत आहे. एवढी भयानक लोकसंख्या हे त्यांना कळत नाही काय? चीननंतर दुसरा नंबर भारताचा आहे, हे स्पष्ट दिसत असताना त्याकडे दोन्ही पक्ष कानाडोळा करीत आहे असं वाटते. कोणताही पक्ष सत्तेवर आल्यास लोकसंख्या वाढीला आळा घालण्यापासून ज्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. बहुमतासाठी लोकसंख्या जरी जरूरी असली तरी तिचा स्फोट झाल्यास काय परिणाम घडेल हे सांगता येत नाही, असे वाटते.

**मधुसूदन भावे**/इंदूर

## वाचक पत्रे

### आता दुसरे कारण शोधा!

'ईव्हीएम हटनी चाहिये, बॅलेट पेपरही सही था, ये भाजपा वाले मशीनमें सिर्फ कमल ही डालके रखते है. कोई भी बटन दबाओ वोट कमल को ही जाता है...' अशी वक्तव्ये विविध विरोधी नेते करतात. जिथे जिथे हरण्याची कुणकुण लागते तेथे हेच कारण पुढे केले जाते व जिथे जिंकतात तेथे लोकशाहीचा विजय होत असतो. ईव्हीएम नको म्हणून खुपदा आंदोलने, अनेकदा चर्चा, बरेचदा तोडफोड वगैरे झाली; पण शेवटी सुप्रीम निर्णय आला की, मतदान होणार ते ईव्हीएम मशीननेच! आता प्रश्न पडला की, चर्चेतील हा महत्त्वाचा मुद्दा गायब झाला; आता कोणता मुद्दा विरोधक आणतील? राहुल गांधी म्हणतात, मोदी आता रडतील. राहुल बाबा, मोदी हे रडले होते आईची आठवण सांगताना, मोदी हे रडले होते पुलवामा हुतात्म्यांसाठी. आपण आपल्या भाषणात कधीतरी इंदिरा गांधी, राजीव गांधी यांचे नाव घेतले आहे का? कधीतरी काँग्रेसच्या जुन्या खंद्या नेत्याचे आभार मानले आहे का? त्यामुळे अश्रूंची किंमत आपल्याला कळणार नाही. मतदार हा जागृत आहे व राहणारच. तंत्रज्ञानाने उंचीवर भारत गेलेला आहे तो अजून उंच जाणारच. मग कशाला आठवता तो बॅलेट पेपर. ईव्हीएमला स्वीकारा अन्यथा दुसरे कारण लवकर शोधा. कारण खापर फोडण्याची वेळ तुमच्यावर म्हणजे विरोधकांवर येणार आहे, हे नक्की.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

### मतपत्रिकांचा काळ संपला!

ईव्हीएमद्वारे झालेल्या मतदानाची व्हीव्हीपॅटशी संपूर्ण पडताळणी करण्यात यावी यासोबतच पूर्वीप्रमाणेच मतपत्रिकांद्वारे मतदान घेण्यात यावे या सर्व याचिका सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच फेटाळून लावल्या. याशिवाय आता मतपत्रिकांचा काळ परत येणार नाही, असा स्पष्ट संदेशही सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. खरं तर याआधीही अनेकदा ईव्हीएम प्रणालीवर अनेक चर्चा झाल्या, निवडणूक आयोग व न्यायालयानेही यासंदर्भात पुरावे मागितले, पण कुणीही पुरावे सादर करू शकले नाही व ईव्हीएम प्रणाली सदोष आहे हे सिद्ध करू शकले नाही. मतपत्रिकांचा जुना काळ आजही आठवतो. मतपत्रिकांद्वारे अनेक मतं अवैध व्हायची, मतपत्रिका गहाळ व्हायच्या, मतमोजणीत खूप विलंब होत असे. याशिवाय भारतासारख्या अफाट लोकसंख्या असलेल्या देशात ही पद्धत खूप वेळखाऊ होती. एकीकडे संपूर्ण जग भारतातील निवडणूक हाताळण्याच्या कौशल्याचं कौतुक करत असताना दुसरीकडे आपल्याच देशातील काही लोक यावर प्रश्नचिन्ह निर्माण करीत आहेत. या देशातील स्वायत्त संस्थेवर अविश्वास दाखवून लोकशाही बदनाम करण्याच्या प्रवृत्तीस सर्वोच्च न्यायालयाने दिलेली ही मोठी चपराक आहे. घटनात्मक संस्थांवरील विश्वासच आपल्या देशातील लोकशाही अधिक मजबूत करेल तेव्हा विरोधकांनी आता तरी या आधुनिक मतदान पद्धतीचा स्वीकार करावा व येथील लोकशाही अधिक बळकट करावी, हीच अपेक्षा आहे.

**अखिल देशपांडे**/अकोला

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## क्राईम वृत्त

### जावयाने केली सासूला मारहाण

**सोलापूर, दि. ३ मे-**

पत्नीला घेऊन जाण्यासाठी आलेल्या जावयाने सासूला फरशीने मारहाण केल्याची घटना आसरा सोसायटीजवळील स्वामी समर्थ मंदीराजवळ घडली. याबाबत मदिना अब्दुल पटेल (वय ४५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन इकरार इसाक शेख (रा. गैबीपीर झोपडपट्टी, होटगी रोड, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मदिना पटेल यांचा इकरार शेख हा जावई आहे. २ मे रोजी दुपारी इकरार हा सासू मदिना यांच्या घरी आला होता. त्याची पत्नी बेबीआयेशा हिस माझ्यासोबत आपल्या घरी चल असे म्हणून शिवीगाळ करीत असताना सासू मदिना यांनी इकरार यास समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी इकरार याने घराबाहेर पडलेला फरशीचा तुकड्याने मदिना यांना पायावर मारून जखमी केले. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार बर्हीजे पुढील तपास करीत आहेत.

### भारत नगरात मारहाण करणाऱ्याविरुद्ध सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३ मे-**

कुमठा नाका परिसरातील भारत नगरात विनाकारण मारहाण करणाऱ्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत जनार्दन दिनेश गायकवाड (वय ४२) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन निरंजन (रा. फकीर वस्ती, टीव्ही केंद्राजवळ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २ मे रोजी रात्री दहाच्या सुमारास फकीर वस्ती येथे जनार्दन गायकवाड यांनी निरंजन यास तुझ्या घरासमोर गर्दी झाली होती, काय झाले असे विचारले असता निरंजन याने काही कारण नसताना डोलारे तुझे पाहुणे आहेत असे म्हणून खुर्ची भिरकाऊन मारून हातात विटा भिरकावून मारल्या. यामध्ये गायकवाड हे जखमी झाले, म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार नदाफ पुढील तपास करीत आहेत.

# अटलबिहारी वाजपेयी, यशवंतराव चव्हाणांप्रमाणे राजकारण करा

## जेष्ठ वात्रटिकाकार तथा माजी आ. रामदास फुटाणे यांचा सल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

गेल्या ८ ते १५ दिवसांपासून महाराष्ट्रातील राजकारण अत्यंत गढूळ आणि कलुषित झाले असून, उच्च पदस्थही राजकारणी नेते काहीही बरळत आहेत, यामुळे या नेत्यांनी अशा भूमिकेतून बाहेर येवून भाजपाचे जेष्ठ नेते स्व. अटलबिहारी वाजपेयी, माजी मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाणांचा राजकीय आदर्श डोळ्यासमोर ठेवून राजकीय वाटचाल करावी, असा सल्ला जेष्ठ वात्रटिकाकार तथा माजी आमदार रामदास फुटाणे यांनी आज (दि. ४) दिला.



येथील सुर्या हॉटेलमध्ये आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी वरील खंत व्यक्त केली. यावेळी उद्योजक दत्ताअण्णा सुरवसेही उपस्थित होते. पुढे बोलताना फुटाणे म्हणाले की, माझं आणि सोलापूरचं अत्यंत दृढ नातं आहे. या शहरातील काही मोठे पुरस्कारही मला मिळाली आहेत. येथील जेष्ठ राजकारणी तथा माजी केंद्रीय गृहमंत्री यांच्या कन्या आ. प्रणिती शिंदे या अभ्यासू राजकारणी असल्याने त्यांना सोलापूरकरांनी संधी द्यावी, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. मोदींच्या गॅरंटीवर टिका करताना ते म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारकाचे त्यांनी भूमिपूजन केले मात्र स्मारकाचा मोदी आता चकार शब्दही काढत नाहीत, मराठी भाषेला अभिजात दर्जाही मिळत नाही. तर यांची कसली गॅरंटी घ्यायची. सध्या जीएसटी, महागाईने जनता बेजार आहे. वारंवार पक्ष बदलणारे नेते निर्माण होत असल्याने लोकशाहीच धोक्यात आहे. यावर त्यांनी एक चारोळीही केली. घरटे बदलत पक्षांचे थवे, नव्या नव्या फांदीवर बसतात, अन् घाटावरच्या कावळ्यांचे आजही अतृप्त आत्मे दिसतात. देशाचा विकास आणि प्रगतीवर चारोळी म्हणताना ते म्हणाले, विकास म्हणाला दिवस चांगले नाहीत, गळ्यातलं जपून ठेव, तेव्हा प्रगती म्हणाली आपल्याकडे कोणाचेच लक्ष नाही, कोण आपल्याकडे येईल, जाहीरनाम्याप्रमाणेच सर्व काही खोटे-खोटे आहे, कोण हिरावून घेईल. स्व. यशवंतराव चव्हाण ते मनोहर जोशीपर्यंत आपल्या राज्यात तात्वीक राजकारण होते आता जातीय राजकारणाला ऊत आला आहे. यामुळे भविष्यात हे असेच जात-पात अन् धर्माचे राजकारण सुरू राहिले तर अराजकता माजण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. वारकरी सांप्रदायात ज्या पध्दतीने सर्व जाती-धर्माचे लोक एकत्र नांदतात...त्याच धर्तीवर राजकीय क्षेत्रातील लोकांनी वागावे, असेही त्यांनी शेवटी सांगितले. सांगितले. युवकांना सल्ला देताना ते म्हणाले की, देशातील सर्वांना जरी आरक्षण दिले तरी नोकरीच्या जागा उपलब्ध नाहीत; यामुळे प्रत्येकाने आता नोकरीच्या नादाला न लागता स्वतंत्र व्यवसाय सुरू करावा.

# बेडर पुलावर हाणामारी; परस्परविरोधी गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापर, दि. ३ मे-**

शहरातील बेडरपुलावर दोन गटात झालेल्या हाणामारीप्रकरणी सदर बझार पोलिस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

विनोद बजरंग बाबावाले (वय २५, रा. बापूजी नगर, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन त्यागी उर्फ सागर सुरेश कैय्यावाले (रा. सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर त्यागी कैय्यावाले याच्या फिर्यादीवरुन करण रणजित बोकेवाले व त्याच्या भावकीतील विनाद बाबावाले, दत्ता बोकेवाले यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ मे रोजी रात्री बेडरपुलावरील हॉटेल शुभमजवळ विनोद बाबावाले, दत्ता बोकेवाले, करण बोकेवाले हे लग्नाची वरात बघत थांबले होते. त्यावेळी त्यागी कैय्यावाले हा दुचाकीवरून जात होता. त्यावेळी बाबावाले याने आण्णा गाडी सावकाश चालवा असे सांगितले असता त्यागीने मारहाण करण्यास सुरुवात केली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार इनामदार पुढील तपास करीत आहेत.



तर त्यागीच्या फिर्यादीनुसार तो दुचाकीवरून आईचे औषध आणण्यासाठी जात असताना शुभम हॉटेलसमोर लग्नाची वरात बघत थांबलेल्या करण बोकेवाले यास दुचाकीचा कट लागला. त्यावेळी बोकेवाले व इतरांनी त्यागी यास शिवीगाळ करून मारहाण केली व चावीने डोळ्यावर मारहाण केली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

# ‘ए. जी. पाटील’च्या चर्चासत्रात २५० विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

विजापूर रोडवरील नामांकित शिक्षण संस्था ए.जी.पाटील अभियांत्रिकी मध्ये स्टार्टअप माईंडसेट फॉर इंजिनिअर्स या विषयावर चर्चासत्र संपन्न झाल्याची माहिती संस्थेचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी दिली.

महाविद्यालयाच्या इन्क्युबेशन सेंटर द्वारे अझर शेख (संभाजी नगर) यांचे स्टार्टअप माईंडसेट फॉर इंजिनियर्स या विषयावर सत्र झाले. यामध्ये सुमारे २५० विद्यार्थ्यांनी भाग घेतला अशी माहिती यावेळी त्यांनी दिली.

भारत सरकारच्या एम. एस. एम. इ. मंत्रालयाकडून मान्यता मिळालेले सोलापूर जिल्ह्यातील एकमेव इन्क्युबेशन सेंटर हे ए.जी. पाटील संस्थेत असून त्याद्वारे विद्यार्थ्यांना स्टार्टअप संदर्भात मार्गदर्शन केले जाते. या सेंटरद्वारे वेगवेगळ्या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिकता व



उद्योगशिलता रुजवण्याचे काम केले जाते. सदर इन्क्युबेशन सेंटर द्वारे बौद्धिक संपदा क्षेत्रात उल्लेखनीय काम करण्यात आले असून आठ पेक्षा जास्त डिझाईन पेटंट मिळवण्यासाठी शिक्षक व विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या स्वरूपात मदत दिली गेली आहे.

भारत सरकारच्या न्यू एज्युकेशन पॉलिसीनुसार व्यावसायिक अभ्यासक्रमातून उद्योजक निर्माण व्हावेत म्हणून या चर्चासत्राचे आयोजन केल्याचे त्यांनी सांगितले. सदर चर्चा सत्रात श्री अझर शेख यांनी स्टार्ट अप कोणी करावा?, कसा करावा यासाठी कोणत्या गोष्टीची गरज असते? सरकार यासाठी आपल्याला कशी मदत करते? यासारख्या प्रश्नांवर उत्तरे दिली व विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी इन्क्युबेशन सेंटरचे इन्चार्ज प्रा. एस. एन. उपाध्ये यांनी प्रयत्न केले त्यांना सहकारी प्रा. देशमुख एम. एन. प्रा. पी. सी. ढवळे, प्रा.एस. एम.बिराजदार यांनी सहकार्य केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मेकॅनिकल चे विभाग प्रमुख डॉ एस. बी. गदवाल, कंप्युटर चे विभाग प्रमुख प्रो. एस. व्ही. कुलकर्णी, इलेक्ट्रॉनिक्स चे विभाग प्रमुख डॉ.आर. व्ही. दरेकर, सिव्हिल च्या विभाग प्रमुख प्रो. टी. डी. मसलेकर, प्रथम वर्ष विभाग प्रमुख प्रो. पंतोजी आर. एम., ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. एन. पी. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार,कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए.चौगुले यांनी या प्रसंगी सर्वांना मार्गदर्शन केले. तसेच शांती एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष एस. ए. पाटील, ट्रस्टी एस. एस. पाटील यांनी सर्वांचे कौतुक केले.



# आनंद शिंदे यांच्या गीतांनी भीमसैनिक मंत्रमुग्ध

## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

प्रबुद्ध भारत तरुण मंडळाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या सिने पार्श्वगायक आनंद शिंदे यांच्या भीम गीतांच्या कार्यक्रमांत भीम सैनिक मंत्रमुग्ध होऊन नाचले.

पीबी ग्रुपच्या वतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्ताने २ मे रोजी सायंकाळी प्रबुध्द भारत चौकात महाराष्ट्राचे सिने गायक आनंद शिंदे यांच्या भीम गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला तथागत भगवान गौतम बुद्ध यांना वंदन करून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस उद्योजक तुकाराम गायकवाड व सिने पार्श्वगायक आनंद शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. यानंतर सिने पार्श्वगायक आनंद शिंदे यांचा सत्कार माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे यांच्या वतीने करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार, माजी नगरसेवक गणेश पुजारी, जुबेर बागवान, चंद्रकांत सोनवणे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी गायक आनंद शिंदे यांनी बाबासाहेबांच्या जीवनावरील अनेक गीते सादर करून भीम सैनिकांना गाण्यावर नाचण्यास भाग पाडले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी राजकुमार पुजारी, शशिकांत टाकळीकर, रविकांत कोळेकर, गौतम चंदनशिवे, अविनाश भडकुंबे, चंद्रकांत सोनवणे, भारत बाबरे, सुहास सावंत, नितीन बंदपट्टे, धनंजय कापुरे, उमेश रणदिवे, यशराज डोळसे, आदित्य चंदनशिवे, मनोज थोरात, मोजेस मंडेपोल्लु, धम्मपाल मैंदर्गीकर, ॲड. विशाल मस्के, भीमराव इंगळे यांनी परिश्रम घेतले.

# माझा देश... माझे मतदान...

भारत माझा देश आहे..... अशी प्रतिज्ञा आपण लहानपणापासून घेत आहोत. फक्त देश माझा आहे असे म्हणून चालणार नाही तर आपल्याला वेगवेगळ्या पद्धतीने देशप्रेम अभिव्यक्त करणे आवश्यक आहे. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण, वृक्षारोपण, जल संवर्धन, स्वच्छता अभियान यासोबत दर पाच वर्षांनी होणाऱ्या निवडणुकीत मतदान करत देशातील लोकशाही बळकट करणे सुद्धा आवश्यक आहे.

जगात भारत सर्वात मोठा लोकशाही देश असून आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे नावलौकिक वाढत आहे, आपण विकासकडे वाटचाल करीत आहोत. पण पहिल्या दुसऱ्या टप्प्यात झालेल्या मतदानाची टक्केवारी कमी असणे बळकट लोकशाहीच्या दृष्टीने चिंताजनक आहे. तेव्हा मतदार म्हणून प्रत्येकांनी स्वत:चे महत्त्व ओळखणे आवश्यक आहे. आपण दरवेळी अनेक गोष्टीसाठी तो माझा हक्क आहे, असे म्हणत असताना आपल्याला आपल्या हक्कासोबत आपल्या कर्तव्याची जाणीव सुद्धा असावी. निवडणूक आयोगानी धर्म, जात, पंथ, भाषा-भूषा इत्यादी भेदभाव न करता प्रत्येक मतदाराला एकच मतदान करण्याचा सर्वोच्च अधिकार दिला आहे. मतदानाच्या दिवशी सरकारी कर्मचाऱ्यांना सुट्टी असते, गैरसरकारी व खाजगी कर्मचाऱ्यांना देखील सुट्टी दिली जाते. पण माझ्या एका मताने काय फरक पडणार आहे, सब घोड़े बारा टके, कोणी जिंकून आले तरी मला काय देणार आहे काय, मला काय आर्थिक लाभ मिळणार आहे काय म्हणत प्रत्यक्ष मतदानादिवशी टूरवर किंवा कुटुंबासोबत प्रवास करणे, मित्रांसोबत फिरायला जाणे म्हणजे आपले कर्तव्य विसरणे नव्हे काय ? व्यक्ती पेक्षा कुटुंब, कुटुंबापेक्षा समाज व समाजापेक्षा देश मोठा असतो याचा विचार करत जागतिकीकरणाच्या युगात देशाचे अस्तित्व टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. एवढेच नव्हे तर इतरांना सुद्धा मतदान करण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे. देशात कुठलीही निवडणूक असो त्यासाठी खर्च होतोच, मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी शासकीय कर्मचारी प्रशिक्षण तर घेतातच, याशिवाय निवडणूक आयोगाच्या वतीने जनतेला सुद्धा मतदान प्रक्रिया विषयी माहिती दिली जाते. मतदानासाठी निवडणूक आयोगाचा होणारा खर्च व प्रत्यक्ष पहिल्या टप्प्यात मतदानाची टक्केवारीचा विचार केला तर आपण आपल्या कर्तव्यात कचराई करीत असल्याचे जाणवते. कुठल्याही प्रकारच्या आमिषाला बळी न पडता राष्ट्र व राष्ट्रहित सर्वोपरि मानून मतदान करण्यातच आपले व राष्ट्राचे हित आहे. सत्ता स्थापनेनंतर कुठल्याही पक्षावर चिखलफेक करण्यापेक्षा, कुणीच आमचे हितचिंतक नाही म्हणत मतदान न करता शांत राहणे व सत्ता स्थापनेनंतर पश्चाताप करण्यापेक्षा आयोगाने ठरवून दिलेल्या वेळेत, ठरवून दिलेल्या बूथवर, ठरवून दिलेले ओळखपत्र सोबत घेत राष्ट्रहित साधणाऱ्या व राष्ट्रीय अस्मितेचे रक्षण करणाऱ्या व्यक्ती व पक्षाला मतदान करणे अपेक्षित आहे. कोणीच उमेदवार चांगला नाही म्हणण्यापेक्षा, व्यक्तीपेक्षा राष्ट्रहित समोर ठेवून काम करणाऱ्या उमेदवारांना मतदान करणे योग्य ठरेल, यामुळे नोटा चा उपयोग कमी होईल. नोटा चा अधिक उपयोग राष्ट्राच्या अस्मितेला धक्का लावणारा आहे. म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उभारलेल्या कुठल्याही एका उमेदवारांना मतदान करणेच योग्य ठरेल.

यावेळी तर नवीन मतदार, स्त्री मतदारांची संख्या देखील वाढली आहे. त्यांची भूमिका सुद्धा महत्वाची आहे. अगोदर उत्साहाने मतदान करुनच पुढील दैनंदिन कामे करावीत हीच अपेक्षा आहे. राष्ट्रविरोधी कृत्य थांबवून राष्ट्र बळकट करण्याच्या दृष्टीने शंभर टक्के मतदान होणे अपेक्षित आहे. घरी असलेल्या दिव्यांग किंवा वयोवृद्ध मतदार सुद्धा या देशाचे नागरिक आहेत. त्यांचे मत सुद्धा महत्त्वाचे आहे म्हणून त्यांना मतदानापासून वंचित न ठेवता घरापर्यंत येणाऱ्या मतदान अधिकाऱ्यांच्या मदतीने मतदान करावयास लावणे आवश्यक आहे. माझा देश, माझे मत हा विचार उराशी बाळगुन मतदान केल्यास देशाचा विकास होईल. यासाठी प्रशासनाने देखील शाळा, कालेज व मिडियामध्ये मतदानाचे महत्त्व पटवून देत आहे. घरात राहणाऱ्या विद्यार्थ्यांने देखील आपल्या पाल्यांना मतदानादिवशी मतदान केंद्रावर जाण्याची आठवण करून द्यावी. एवढे जरी केल्यास विद्यार्थ्यांनी देशप्रेम व्यक्त केल्यासारखे होईल. मुलांना उन्हाळी सुट्टी मिळेल, तिकीट रिझर्वेशन म्हणजे आरक्षण करायचे असेल, प्रवासाची लगबग सुरू होईल पण देशाच्या विकासाचा प्रवास लक्षात घेता आपापल्या जिल्ह्यातील मतदानाच्या तारखा पाहून प्रवासाचे नियोजन करणे आवश्यक आहे असे वाटते. मतदार हा राजा आहे. म्हणून या राजाच्या हाती लोकशाही बळकट करण्याची ताकद आहे. मतदारांनी स्वतः जागृत होऊन इतरांना सुद्धा जागृत करत शंभर टक्के मतदान करीत देशाचा भविष्य उन्नत करण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडावी हीच अपेक्षा!

**-प्रा. धन्यकुमार जिनपाल बिराजदार, सोलापूर**
**९४२३३३०७३७**

# मधुकर जवाहरे यांचे निधन




**श्रीपूर, ३ मे-**

बोरगांव (ता. माळशिरस) येथील मधुकर सूर्यकांत जवाहिरे (वय ५५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, तीन भाऊ व दोन बहिणी असा परिवार आहे.

## निधन वृत्त...

### चंद्रकांत कुलकर्णी



**सोलापूर, दि. ३ मे-**

सोलापूर महापालिकेतील परिवहन विभागातील निवृत्त सिटी बस ड्रायव्हर व डोणगाव रोड सलगरवस्ती येथील चंद्रकांत नरसिंह कुलकर्णी (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

### तानाजी जाधव



**सोलापूर, दि. ३ मे-**

सोलापूर महानगरपालिका परिवहन विभागातील निवृत्त सिटी बस ड्रायव्हर व सलगरवाडी येथील तानाजी दिगंबर जाधव (वय ६०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

### सतीश खरात



**पिलीव, दि. ३ मे-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील भोलेनाथ ॲग्रोचे मालक सतीश जयवंत खरात (वय ५५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, आई, वडील असा परिवार आहे.

### गंगाबाई तालीकोटी



**सोलापूर, दि. ३ मे-**

सुशीलनगर विजापूर रोड येथील गंगाबाई सिद्राम तालीकोटी (वय ६९) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यामागे पती, मुले, सूना असा परिवार आहे. पक्षीराज नवरात्र महोत्सव मंडळाचे अधारस्तंभ सिद्राम तालीकोटी यांच्या त्या पत्नी होत.


## जाहिर नोटीस

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, डि. सोलापूर पैकी सब डि. पंढरपूर पैकी मौजे इसबावी येथील बिनशेती खुली प्लॉट मिळकत यासी गट नं. १९/अ/१ पैकी प्लॉट नं २६ यासी क्षेत्र २।७८।८५ आर चौ मी, भोगवटादार वर्ग १ असलेली मिळकत सिकंदर नारायण कदम यांचे खरेदि मालकीची, कब्जे वहिवाटीची असून यातील तदंगभूत वस्तू हक्क अधिकारासह अशी; या मिळकतीचे सध्याचे मालक सिकंदर नारायण कदम यांचे मालकी वहिवाटीची असून त्यांनी आमचे पक्षकार यांचे बरोबर सदर मिळकत कायम खुषखरेदी करुन देणेबाबत बोलणी केली असून सदर मालक यांनी आमचे पक्षकार यांचे कडून इसारापोटी रक्कम हि स्विकारलेली आहे. तसेच त्याबाबत दस्त सुद्धा लिहून दिली आहे. त्याच बरोबर प्रस्तुत मिळकत निर्वेध, निजोखमी असल्याचा भरवसा प्रस्तुत मालक यांनी आमचे पक्षकार यांना दिला आहे.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा गहाण, दान, लीज, बक्षीसपत्र, साठेखत, खरेदीखत, अग्रहक्क, कर्ज बोजा, पोटगी, जप्ती, मृत्युपत्र, वाटप, वहिवाट या स्वरुपाचा वा तत्सम अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, अधिकार वा हितसंबंध असल्यास अशा संबंधित हक्क वा अधिकार सांगणाऱ्या व्यक्तिने हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ (आठ) दिवसाचे आत पुढे दिलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत घ्यावी. अन्यथा प्रस्तुतची मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे प्रामाणिकपणे गृहित धरुन आमचे पक्षकार या मिळकतीबाबतचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीत हरकत आली नाही म्हणून तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार, हक्क, अधिकार, हितसंबंध आमचे पक्षकार यांचे प्रस्तुतचे खरेदी व्यवहारावर बंधनकारक असणार नाहीत. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही नोटीस दिली असे.

दिनांक ०३-०५-२०२४

**आशुतोष अनिलराव बडवे, पाटील**
**अधिवक्ता १६६४, मेंढे गल्ली, पंढरपूर. ४१३३०४**
**९१५८८१०००८, ९७३०१८०६००**

## लवाद अधिकारी ॲड. तनपुरे गोविंद दशरथ

(मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटीज् ॲक्ट २००२ आणि आर्बिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

जा.क्र. ६५६ दि. ०१/०५/२०२४

रेणुका भवन, २ मजला, सर्वे नं. ३५/२अ-२ब, पुष्पक हॉटेलजवळ,
पाईप लाईन रोड, सावेडी, अ.नगर,
अहमदनगर - ४१४ ००१

### जाहीर नोटीस

श्री रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.,
अहमदनगर ----- अर्जदार

**विरुद्ध**

| लवाद अर्ज क्रमांक | सामनेवाला क्रमांक | सामनेवाला यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|
| २४२९/२०२४ | **कर्जदार** | **श्री. काळे किरण मारुती,** रा. उपळाई बुद्रुक, ता. जि. सोलापूर. |
| | **जामीनदार** | **श्रीमती ढगे वैशाली बाबासाहेब ,** रा. s/o लक्ष्याची वाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| | **जामीनदार** | **श्री. काळे विशाल धनाजी,** रा. उपळाई खुर्द, ता. माढा, जि. सोलापूर |

सदर नोटीसद्वारे तुम्ही वरील सर्व सामनेवाले यांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमचेविरुद्ध वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कामी आपण दिनांक १३/०५/२०२४ रोजी ठीक सकाळी ११.०० वा. लवाद कार्यालयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजर न राहिल्यास तुमच्या विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी/एकतर्फी हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
सदर नोटीस माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले असे.

सही/-
(गोल शिक्का) **ॲड. तनपुरे गोविंद दशरथ,**
**लवाद अधिकारी**

## जाहिर पब्लिकेशन

**योजना अर्ज क्र.** ७५५/२०२ कलम ५० अ (३) अन्वये
**सार्वजनिक न्यासाचे नांव** : समस्थ ढोर कक्कय्या मठ संस्था, पंढरपूर,
जि. सोलापूर नोंदणी क्र से ८५४ सोलापूर

**अर्जदार** : श्री. राजाभाऊ रामचंद्र कोकणे
श्री. कृष्णा दिगंबर कटके

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तमाम लोकास आमचे अशिल **१) श्री. राजाभाऊ रामचंद्र कोकणे, २) श्री. कृष्णा दिगंबर कटके यांनी समस्थ ढोर कक्कय्या मठ संस्था, पंढरपूर, जि. सोलापूर नोंदणी क्र से ८५४ सोलापूर** या न्यासाचे योजना अर्ज कलम ५० अ (३) अन्वये मे. धर्मादाय उप युक्त कार्यालय, सोलापूर येथे दाखल केले आहे.

या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, या न्यासाचे योजना दुरुस्त अर्जाबाबत कोणाची कांही हरकत किंवा तक्रार असल्यास आपण स्वतः किंवा वकीलामार्फत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत काही तक्रार अगर हरकत असेल तर या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने हरकत पाठवावीत. अथवा स्वतः अगर वकिलामार्फत मे. धर्मादाय उप आयुक्त कार्यालय, सोलापूर येथे उपस्थित राहून आपली हरकत किंवा तक्रार नोंदवावी अन्यथा कोणाचीही व कसलीही हरकत किंवा तक्रार नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझ्या सहिनिशी व धर्मादाय उपआयुक्त यांच्या शिक्यानिशी दिली तारीख : ०३/०५/२०२४

**सही/-**
**वरिष्ठ लिपीक**

शिक्का

**सही/-**
**(श्री. एस.एस. कुमठेकर)**
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**सोलापूर विभाग, सोलापूर**

## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे यावली, ता. बार्शी, जि. सोलापूर व आसपासचे सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर, सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे यावली येथील गट नं. ६७९ तिचे क्षेत्र ०० हे. ८७ आर + पो.ख. ०० हे. ०८ आर पैकी ०० हे. ८७ आर, तिचा आकार ०१ रु. ६९ पैसे. यासी चतुःसिमा- पूर्वेस- रस्ता, दक्षिणेस- तुकाराम गव्हाणे यांची जमीन, पश्चिमेस- त्याच गटातील अलकाबाई पाडुळे यांची जमीन, उत्तरेस- शिवाजी संतराम गावडे यांची जमीन. येणेप्रमाणे वर्णनाची जमीन त्यामधील दगडमाती, झाडे-झुडूपे तदंगभूत वस्तूसह.

वर नमूद मिळकत ही आमचे अशिल दिलीप सिद्राम भोसले यांचे वडील सिद्राम तात्या भोसले यांच्या खरेदी मालकीची आहे. सदर मिळकत ही हिंदु एकत्र कुटुंबातील आहे. सदर मिळकत विकत घेण्यासाठी आमचे अशिल दिलीप यांनी त्यांचे वडील सिद्राम तात्या भोसले यांना खरेदीसाठी रक्कम दिलेली होती. अशा प्रकारे सदर मिळकत खरेदी करण्यासाठी एकत्र हिंदु कुटुंबातील रक्कम वापरलेली होती. आमचे अशिलाचे वडील हे अनेक वर्षांपासून अंध आहेत. त्याचे वय झालेले आहे. त्यांना कोणतेही उत्पन्नाचे साधन नव्हते व नाही. वर नमूद मिळकतीत सिद्राम तात्या भोसले यांचे ७/१२ उताऱ्यावर नाव आहे. परंतु सद्या सदर मिळकतीमध्ये आमचे अशिल दिलीप सिद्राम भोसले यांचा कब्जा व वहिवाट आहे. सदर मिळकतीत आमचे अशिल यांचा अभिवक्त हिस्सा आहे. अशाप्रकारे वस्तुस्थिती असताना केवळ ७/१२ उताऱ्यावर सिद्राम तात्या भोसले यांची पोकळ नाव असल्यामुळे वर वर्णन केलेली मिळकत विक्री करण्याच्या विचारात आहेत अशी खात्रीलायक माहिती आमचे अशिलांना मिळालेली आहे. आमचे अशिलाचे वडील सिद्राम तात्या भोसले यांचे वय झालेले आहे, त्यांचे वय साधारणपणे ९० वर्षांचे आहे. वय झाल्यामुळे त्यांना जवळचे दिसत नाही. ते अंध आहेत, वय झाल्यामुळे त्यांना आपण काय करतो आहोत याचे भान राहिलेले नाही. त्यामुळे त्यांचेकडून त्यांची इच्छा नसताना कोणी तरी कायदेशीर कागद करणेच्या विचारात आहेत.

सबब या सावधानतेच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमूद मिळकती संदर्भाने सिद्राम तात्या भोसले यांचेशी कोणीही खरेदी, विक्री, साठेखत, गहाण, दान, बक्षिसपत्र, बोजा, कर्ज, साठेखत किंवा त्या संदर्भाचा कोणताही हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. कोणाची फसगत होवू नये. सर्वांना आमचे अशिलाची हक्काची जाणीव व्हावी म्हणून जाहीर नोटीस दिली.
तारीख : ०४/०५/२०२४

सही/-
**ॲड. श्री. अनिल रघुनाथराव पाटील,**
**ॲड. श्री. अभिजीत अनिल पाटील,**
फॉर्च्युन टॉवर, फ्लॅट नं. १५, तिसरा मजला,
श्री भगवंत मंदिराजवळ, बार्शी नगरपरिषदेसमोर,
बार्शी, मु.पो.ता. बार्शी, जि. सोलापूर
मो.नं. ९४२१०२४६९२/९४०५७२७१२०
अशिलातर्फे ॲडव्होकेटस्

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### व्होल्वो चायना गोल्फमध्ये शुभंकर टी-३२ व्या स्थानी




**बीजिंग** : येथे सुरु असलेल्या व्होल्वो चायना ओपन गोल्फ स्पर्धेत शुक्रवारी दुसऱ्या फेरीत भारतीय गोल्फपटू शुभंकर शर्माने एका ओव्हरमध्ये ७३ गुणांची खेळी केली. हिडन ग्रेस गोल्फ क्लबमध्ये दुसऱ्या दिवशी २७ वर्षीय शुभंकरने टी-३२ व्या स्थानावर झेप घेताना केवळ एक बर्डी खेळला. त्याने पहिल्या दिवशी ६-अंडर ६६ अशी बोगी फ्री अशा स्थितीत होता, तो आता ३६ होलसाठी ५-अंडर आहे. अन्य भारतीय गोल्फपटू ओमप्रकाश पहिल्या फेरीतच दूर क्रमांकावर फेकला गेला. तो टी-९४ व्या स्थानी राहिला. अव्वल स्थानी असलेल्या सेबॅस्टियन सोडरबर्गने पहिल्या दिवशी ६३ गुणांची खेळी केली. त्याच्या पाठोपाठ इंग्लंडच्या पॉल वॉरिंगने स्थान मिळविले. सोडरबर्ग वॉरिंग (६६) पेक्षा तीन शॉट्स पुढे होता. इटालीचा गुइडो मिग्लिओझी (६५-६७) १२-अंडरमध्ये तिसऱ्या स्थानावर आहे.

### बोपन्ना-एबडेन जोडी पहिल्याच फेरीत पराभूत

**माद्रिद** : रोहन बोपन्ना व मॅथ्यू एबडेन या अव्वल मानांकित इंडो-ऑस्ट्रेलियन जोडीला एटीपी मुटुआ माद्रिद ओपन टेनिस स्पर्धेत पहिल्या फेरीत सेबॅस्टियन कोर्डा व जॉर्डन थॉम्पसन या जोडीकडून धक्कादायक पराभव पत्करावा लागला. ऑस्ट्रेलियन ओपन पुरुष दुहेरीचे विजेते असलेले बोपन्ना व एबडेन या जोडीला एक तास १७ मिनिटांत ७-६ (४), ७-५ असे पराभूत केले. अमेरिकन-ऑस्ट्रेलियन जोडीने प्रथमच बोपन्ना व एबडेन या जोडीशी दोन हात केले. कोर्डा व थॉम्पसनने जोरदार सर्व्हिस गेम दाखवला आणि सुरुवातीच्या सेटमध्ये त्यांनी एकमेव ब्रेक पॉइंट स्वीकारला. नंतर बोपन्ना व एबडेनने कोर्डा-थॉम्पसनला तीन ब्रेक पॉइंट्सला रूपांतरित करू दिले नाही. मात्र, कोर्डा-थॉम्पसनने टायब्रेकरमध्ये सेट जिंकून आघाडी मिळवली. त्यामुळे कोर्डा-थॉम्पसनचा आत्मविश्वास वाढला व त्यांच्या मार्गावर आलेल्या चार संधींमधून एकदा बोपन्ना व एबडेनवर वर्चस्व गाजवण्यात यश मिळविले. याउलट अव्वल मानांकित इंडो-ऑस्ट्रेलियन जोडी त्यांच्यावर कोणतेही दडपण आणू शकले नाहीत, परिणामी बोपन्ना-एबडेनला स्पर्धेतून लवकर बाहेर पडावे लागले. गत वर्षी इंडियन वेल्स मास्टर्स जिंकून ४३ वर्षीय बोपन्ना एटीपी मास्टर्स १००० विजेता झाला होता.

### वॉर्सिस्टरशायरच्या युवा क्रिकेटपटूचे निधन

**वॉर्सिस्टरशायर** : इंग्लंडच्या एका युवा क्रिकेटपटूचे गुरुवारी निधन झाले. वॉर्सिस्टरशायरकडून प्रथम श्रेणी क्रिकेट खेळणारा जोश बेकर आता या जगात नाही.



तो फक्त २० वर्षांचा होता, अशी माहिती वॉर्सेस्टरशायर क्रिकेट क्लबने माहिती दिली. बेकरने २०२१ मध्येच प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये केले. या खेळाडूने २२ प्रथम श्रेणी सामने खेळले आहेत. याशिवाय बेकरने १७ लिस्ट ए आणि ८ टी-२० सामन्यांमध्येही भाग घेतला. बेकरने व्यावसायिक क्रिकेटमध्ये ७० बळींची नोंद केली होती. या खेळाडूने १९ एप्रिल रोजी शेवटचा प्रथम श्रेणी सामन्यात खेळला होता, मात्र या सामन्यात तो एकही बळी टिपू शकला नाही. पण या खेळाडूने बुधवारी सेकंड एकादशसाठी ३ बळी घेतले होते.

### दक्षिण आफ्रिका महिला संघ जूनमध्ये भारतात

**नवी दिल्ली** : जून ते जुलै दरम्यान नियोजित एक कसोटी, तीन एकदिवसीय आणि तीन टी-२० सामन्यांच्या मालिकेसाठी भारत दक्षिण आफ्रिका महिला संघाचे स्वागत करण्यासाठी सज्ज आहे. कर्नाटक राज्य क्रिकेट संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियममध्ये १६ जूनपासून भारत व दक्षिण आफ्रिका महिला संघादरम्यान एकदिवसीय आणि टी-२० सामने होणार आहे. २८ जून पासून चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर उभय संघादरम्यान एकमेव कसोटी सामना खेळला जाणार आहे. चेन्नईमधील कसोटी सामन्यानंतर, संघ ५, ७ आणि ९ जुलै रोजी होणारे तीन टी-२० सामने खेळण्यासाठी बंगळुरूला परततील. हे सामने सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये बांगलादेशमध्ये होणाऱ्या महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी तयारी म्हणून खेळणार आहेत. ही मालिका २०२३ च्या उत्तरार्धात आयसीसी फ्यूचर टूर्स प्रोग्रामचा एक भाग होते, परंतु गत वर्षी ऑक्टोबर ते नोव्हेंबर दरम्यान भारतात झालेल्या वन-डे आयसीसी पुरुष विश्वचषक क्रिकेट स्पर्धेमुळे हा दौरा पुढे ढकलण्यात आला.

# प्लेऑफसाठी बंगळुरू, गुजरातला विजयाची गरज



**आजचा सामना**

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु वि. गुजरात टायटन्स**
**स्थळ** : एम. चिन्नास्वामी स्टेडियम, बंगळुरू
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

◆ **बंगळुरू, ३ मे**

गणिताच्या दृष्टिकोनातून रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स अजूनही आयपीएल प्लेऑफमध्ये पोहोचू शकतात, परंतु ही आशा जीवंत ठेवण्यासाठी उभय संघांना शनिवारी होणाऱ्या त्यांच्यादरम्यानच्या लढतीत विजय नोंदविणे आवश्यक आहे.

दहा संघांच्या गुणतालिकेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू १० सामन्यांतून ६ गुणांसह तळाच्या स्थानी आहे, तर गुजरात टायटन्स १० सामन्यांतून ८ गुणांसह आठव्या स्थानावर आहेत.

तथापि, चेन्नई सुपर किंग्ज व दिल्ली कॅपिटल्स (प्रत्येकी १० गुण) प्रत्येकी पाच विजय व १० गुणांसह गुणतालिकेच्या मधल्यास्तरावर असून त्यांच्या तेथून बाद फेरीपर्यंतच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. पण आयपीएलची साखळी फेरी संपत असताना बंगळुरू व गुजरातने इतर संघांवर अवलंबून राहण्यापेक्षा स्वतःचे स्थान व्यवस्थित ठेवणे हा एक चांगला पर्याय आहे.

फाफ डु प्लेसिसच्या नेतृत्वाखालील बंगळुरू संघाने गत दोन सामन्यांमध्ये विजय नोंदवल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास थोडा अधिक बळावलेला असेल. त्यांना या गत दोन सामन्यात विल जॅक्स व कॅमेरून ग्रीन हे नवीन स्टार खेळाडूही गवसले आहेत. जॅक्सने गुजरातविरुद्ध विजयी शतकी खेळी केली, तर कॅमेरून ग्रीनने हैदराबादविरुद्ध महत्त्वपूर्ण धावा व बळी घेत आपल्या अष्टपैलू खेळाची चमक दाखविली.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला आता आपल्या घरच्या मैदानावर दमदार विजयाची अपेक्षा असेल. विराट कोहली या हंगामात सर्वाधिक धावा काढणाऱ्या फलंदाजांच्या यादीत दुसऱ्या स्थानावर आहे, तो आयपीएलच्या या आवृत्तीत ५०० धावांचा टप्पा पार करणारा पहिला फलंदाज ठरला आहे. कोहली, विल जॅक्ससह ग्लेन मॅक्सवेल, रजत पाटीदार, दिनेश कार्तिकने उत्तम फलंदाजी करणे आवश्यक आहे, तसेच मोहम्मद सिराज, यश दयाल, स्वप्निल सिंग व कर्ण शर्माने अधिक जबाबदारीने गोलंदाजी करण्याची गरज आहे. सिराजला भारताच्या टी-२० विश्वचषक संघात स्थान मिळाले आहे, तेव्हा त्याने आपली निवड योग्य असल्याचे दाखवून दिले पाहिजे.

गुजरात टायटन्सला गत दोन सामन्यात- दिल्ली कॅपिटल्स व रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून सलग पराभव पत्करावा लागला होता. या पराभवाच्या धक्क्यातून सावरत गुजरात टायटनसचा कर्णधार शुभमन गिलसह डेव्हिड मिलर, ऋद्धिमान साहा, बी. साई सुदर्शन, विजय शंकर, राहुल तेवतिया, शाहरूख खानने आपल्या फलंदाजीची चमक दाखवायला हवी. या खेळाडूंनी या हंगामात २०० चा टप्पा देखील पार केला नाही. गोलंदाजीतही रशीद खानपेक्षा कोणीही प्रभावी कामगिरी केली नाही. या स्टार फिरकीपटूने १० सामन्यांमध्ये एका षटकात आठ धावा देत केवळ ८ बळी टिपले आहेत. आयपीएल २०२३ मध्ये रशीदने १७ सामन्यांत २७ बळींची नोंद केली होती. मोहम्मद शमीच्या अनुपस्थितीत उमेश यादव व मोहित शर्मा या सर्वात अनुभवी जोडीने भरपूर काम केले आहे. मोहितने १० बळी, तर यादवने ७ बळी घेतले आहेत. (वृत्तसंस्था)

# भारत दुसऱ्या स्थानावर घसरला

### आयसीसी कसोटी क्रमवारीत ऑस्ट्रेलिया अव्वल | वन-डे व टी-२० मध्ये भारत प्रथम स्थानी

◆ **दुबई, ३ मे**

ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघाने भारताला मागे टाकत जागतिक कसोटी क्रमवारीत प्रथम क्रमांक गाठला आहे. ऑस्ट्रेलिया आता १२४ रेटिंग गुणांसह कसोटी क्रमवारीत अव्वल आहे. त्याचवेळी भारत १२० गुणांसह दुसऱ्या स्थानावर ४ गुणांनी पिछाडीवर आहे. इंग्लंड (१०३ गुण) तिसरा, तर दक्षिण आफ्रिका संघ (१०० गुण) चौथा क्रमांकावर आहे.

२०२०-२१ मध्ये ऑस्ट्रेलियामध्ये २-१ ने जिंकलेली मालिका रँकिंग सामन्यांमधून वगळल्यामुळे भारताची घसरण झाली. वार्षिक अद्यतनानंतर भारत एकदिवसीय आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रमवारीत अव्वल स्थानावर आहे.

**वन-डे क्रमवारीत भारताला ६ गुणांची आघाडी**

आयसीसी पुरुष क्रिकेट विश्वचषक अंतिम सामन्यात



भारताला ऑस्ट्रेलियाकडून पराभव पत्करावा लागला असेल, परंतु त्यांनी त्यांच्यावरील तीनवरून सहा गुणांपर्यंत वाढवली आहे आणि १२२ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. अव्वल १० मध्ये कोणताही बदल झालेला नाही पण आयर्लंडने झिम्बाब्वेला मागे टाकत ११ वे स्थान पटकावले आहे.

तिसऱ्या क्रमांकावर असलेला दक्षिण आफ्रिका ऑस्ट्रेलियापासून ८ गुण दूर होता, आता हे अंतर ४ गुणांवर आले आहे. तर श्रीलंका पाचव्या असलेल्या इंग्लंडपेक्षा फक्त दोन गुणांनी मागे आहे.

**टी-२० क्रमवारीत ऑस्ट्रेलिया दुसऱ्या स्थानावर आहे**

टी-२० क्रमवारीत ऑस्ट्रेलिया दुसऱ्या स्थानावर आहे. भारत २६४ रेटिंग गुणांसह अव्वल स्थानावर आहे. त्याच वेळी, दक्षिण आफ्रिकेनेही २ स्थानांची वाढ केली आणि इंग्लंडच्या खाली चौथ्या स्थानावर आहे. (वृत्तसंस्था)

### कसोटी क्रमवारीत तिसऱ्या ते नवव्या स्थानावर बदल नाही

तिसऱ्या ते नवव्या क्रमांकावर असलेल्या संघांच्या क्रमात कोणताही बदल झालेला नाही. आयसीसी कसोटी क्रमवारीत केवळ नऊ संघ अव्वल मानले जातात, कारण अफगाणिस्तान आणि आयर्लण्ड हे संघ अद्याप पुरेशा कसोटी न खेळल्यामुळे ११ आणि १२ व्या क्रमांकावर आहेत. झिम्बाब्वे संघ सुद्धा अव्वल ९ क्रमांकातून बाहेर आहे, कारण त्यांनी गत तीन वर्षांत केवळ तीन कसोटी सामने खेळले आहेत.

क्रमवारीत नऊ संघांना तीन वर्षांत किमान आठ कसोटी सामने खेळावे लागतीत. मे २०२३ पूर्वी पूर्ण झालेले ५० टक्के सामने व त्यानंतर पूर्ण झालेल्या सर्व सामन्यांचा क्रमवारीसाठी विचार केला जातो.



# बायर लिव्हरकुसेनची विक्रमी विजयी घोडदौड

◆ **रोम, ३ मे**

अलिकडेच बुंदेसलीग विजेत्या बायर लिव्हरकुसेनने आपली विक्रमी विजयी घोडदौड कायम राखत युरोपा लीग स्पर्धेतील उपांत्य फेरीच्या पहिल्या चरणाच्या सामन्यात २-० ने विजय नोंदविला. बायर लिव्हरकुसेनने सर्व स्पर्धांमधील ४७ सामन्यांपर्यंत अपराजित राहण्याची परंपरा कायम राखली. जर्मनी, इंग्लंड, इटली, स्पेन आणि फ्रान्समधील युरोपमधील पाच सर्वात मोठ्या लीगमधील कोणत्याही क्लबची अपराजित राहण्याची मालिका जास्त काळ टिकलेली नाही, मात्र ही विक्रमी कामगिरी बायर लेव्हकुसेनने केली.

आम्ही आपला नैसर्गिक खेळाचे प्रदर्शन करतो व आम्ही अपराजित राहण्याचा किंवा इतिहास घडविण्याचा विचार करत नाही, असे लिव्हरकुसेन मिडफिल्डर अमिने डली म्हणाला. आमचा संघ मजबूत आहे व आम्हाला केवळ खेळाचा आनंद घ्यायचा आहे, असेही तो म्हणाला. या विजयाबरोबरच लिव्हरकुसेनने रोमाकडून गत हंगामात युरोपमध्ये झालेल्या पराभवाचा वचपा घेतला. (वृत्तसंस्था)

# मुंबई प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर

### कोलकाताने २४ धावांनी हरविले


### व्यंकटेश अय्यरचे अर्धशतक, स्टार्कचे ४ बळी

**मुंबई, दि. ३ मे-**

पाच वेळा चॅम्पियन राहिलेल्या मुंबई इंडियन्सचा संघ इंडियन प्रीमियर लीग-२०२४च्या प्लेऑफ शर्यतीतून बाहेर पडला आहे. कोलकाता नाईट रायडर्सने त्यांना २४ धावांनी पराभूत केले.

वानखेडे स्टेडियमवर १२ वर्षांनंतर कोलकाताने मुंबईचा पराभव केला. या मैदानावर मुंबईविरुद्ध कोलकाता नाइट रायडर्सचा शेवटचा विजय २०१२मध्ये झाला होता. मुंबईने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कोलकाताचा संघ १९.५ षटकांत १६९ धावांत आटोपला. कोलकताकडून व्यंकटेश अय्यरने ५२ चेंडूत ७० धावांची शानदार खेळी केली. मनीष पांडेने ३१ चेंडूत ४२ धावा केल्या. नुवान तुषारा आणि जसप्रीत बुमराहने प्रत्येकी ३ बळी टिपले. हार्दिक पांड्याने २ तर पियुष चावलाने १ गडी बाद केला.

प्रत्युत्तरात मुंबईचा डाव १८.५ षटकांत १४५ धावांत आटोपला. मिचेल स्टार्कने ४ बळी घेतले. वरुण चक्रवर्ती, सुनील नरेन आणि आंद्रे रसेल यांनी प्रत्येकी २ बळी टिपले. मुंबईकडून सूर्यकुमार यादवने ३५ चेंडूत ५६ धावा फटकाविल्या. परंतु त्यांची अर्धशतकी खेळी अपुरी पडली.



# संघाच्या संतुलनासाठी रिंकू सिंगला वगळले : टॉम मूडी

◆ **नवी दिल्ली, ३ मे**

आगामी आयसीसी टी-२० विश्वचषकासाठी भारताच्या १५ सदस्यीय संघातून रिंकू सिंगला वगळण्यात आले, हे मुख्यत्वे संघाच्या संतुलनामुळे घडले असावे, कारण भारताला अक्षर पटेल अष्टपैलू फिरकी गोलंदाज म्हणून आणखी एका खेळाडूची गरज होती, असे मत ऑस्ट्रेलियाचा माजी अष्टपैलू खेळाडू टॉम मूडी यांनी व्यक्त केले.

रिंकू सिंगने गत वर्षी पदार्पण केल्यापासून भारतासाठी १५ टी-२० सामने खेळले आहेत. त्याने १७६.२३ च्या स्ट्राइक रेटने ३५६ धावा करून फिनिशर म्हणून उत्कृष्ट कामगिरी केली आहे. पण आयपीएल २०२४ मध्ये त्याला कोलकाता नाईट रायडर्ससाठी फलंदाजीच्या पुरेशा संधी मिळाली नाही. त्याने १५० च्या स्ट्राइक रेटने खालच्या मधल्या फळीत येत आठ डावात ८२ चेंडूत १२३ धावा केल्या. तथापि, रिंकू सिंगचा टी-२० विश्वचषकासाठी भारताच्या संघात राखीव खेळाडू म्हणून निवडण्यात आले.

रिंकू सिंगने आयपीएलमध्ये किती धावा केल्या, याचा मला काही फरक पडत नाही. हे भारतीय संघाच्या संतुलनाशी संबंधित आहे व अजित आगरकरने ज्या प्रकारे ते स्पष्ट केले त्यामध्ये खरोखर तथ्य आहे. रिंकूसिंगला वगळण्यात आले आहे, (वृत्तसंस्था)

# मेदवेदेवची माघार, लेहेका उपांत्य फेरीत

**माद्रिद ओपन टेनिस**

◆ **माद्रिद, ३ मे**

जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर असलेल्या डॅनिल मेदवेदेवने पहिला सेट गमावल्यानंतर मांडीच्या समस्येमुळे सामना सोडल्यानंतर झेक प्रजासत्ताकच्या जिरी लेहेकाने माद्रिद ओपनच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

तिसरा मानांकित मेदवेदेवने ३-२ ने आघाडी घेत असताना वैद्यकीय वेळ मिळण्यासाठी विनंती केली. वैद्यकीय सेवा घेतल्यानंतर तो कोर्टवर परतला, परंतु संघर्ष करताना दिसला. अंतिम सोळाच्या सामन्यात राफेल नदालवर मात करणाऱ्या लेहेकाने मेदवेदेवविरुद्ध ५-४ अशी आघाडी घेतली आणि हा सेट ६-४ असा घेतला. याचदरम्यान दुखापतग्रस्त मेदवेदेवने पंचांना सांगितले की, तो सामना सुरू ठेवू शकत नाही व सामन्यातून माघार घेतली. आता उपांत्य फेरीत लेहेकाचा सामना कॅनडाच्या फेलिक्स ऑगर-अलियासिमशी होईल. २३ वर्षीय फेलिक्सला उपांत्यपूर्व फेरीत अव्वल मानांकित जॅनिक सिनरचा सामना करावा लागणार होता, परंतु दुखापतीमुळे इटालीच्या सिनरने स्पर्धेतून माघार घेतली. रशियाचा सातवा मानांकित आंद्रे रुबलेव्ह अन्य उपांत्य लढतीत १२ व्या मानांकित टेलर फ्रिट्झशी खेळेल. (वृत्तसंस्था)



टेनिस कोर्टमधून बाहेर पडताना दुखापतग्रस्त डॅनिल मेदवेदेव

### इगा स्वियातेक सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरीत

अव्वल विश्वमानांकित महिला टेनिसपटू पोलंडच्या इगा स्वियातेकने मेडिसन कीजला नमवत अंतिम फेरी गाठली. गतवर्षीच्या उपविजेत्या इगाने कीजवर ६-१, ६-३ असा विजय मिळवून सलग दुसऱ्यांदा माद्रिद ओपनच्या अंतिम फेरीत प्रवेश केला.



वर्चस्व गाजवणाऱ्या इगा स्वियातेकने या सामन्यात २९ वर्षीय अमेरिकन खेळाडूला अक्षरशः कोणतीही संधी न देता केवळ आठ चुका केल्या.

चार वेळच्या ग्रॅण्ड स्लॅम विजेत्या २२ वर्षीय इगा स्वियातेकने जागतिक क्रमवारीत २० व्या क्रमांकावर असलेल्या कीजविरुद्धच्या सामन्यात आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केला. अन्य उपांत्य सामन्यात विद्यमान विजेता व द्वितीय मानांकित आर्यना सबालेन्काचा सामना एलेना रायबाकिनाशी होईल.

# बाऊन्सर्स व कांगारूज संघाची विजयी सलामी

### सोलापूर जिल्हा वेटरन्स द हंड्रेड बॉल क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मे -**

सोलापूर जिल्हा वेटरन्स द हंड्रेड बॉल क्रिकेट स्पर्धेत बाऊन्सर्स व कांगारूज संघाने विजयी सलामी दिली.

येथील रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेतील सलामीच्या सामन्यात बाऊन्सर्स संघाने मर्फी संघावर ४३ धावांनी मात केली. प्रीतीश कुलकर्णी याने ४४ चेंडूत ११ चौकार व ७ षटकारासंह ११० धावांची शानदार शतकी खेळी केली. तो सामन्याचा मानकरी ठरला. दुसऱ्या सामन्यात कांगारुज् संघाने निंजा संघाचा २३ धावांनी पराभव केला. सुगंधराज कुलकर्णी (४६ धावा) हा सामनावीर ठरला. पंच म्हणून नंदकुमार टेळे, सर्फराज सय्यद व सुहैल शेख यांनी तर गूनलेखक म्हणून प्रसाद शावनतुल व नितीन गायकवाड यांनी काम पाहिले.

वेटरन्स असोसिएशनने आयोजिलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय डायव्हिंग खेळाडू श्रावणी सुर्यवंशी हिने केले. यावेळी मध्य रेल्वे इन्स्टिटयुटचे सचिव किशोर पिल्ले व वेटरन्स असोसिएशनचे चेअरमन जयंत दळवी, अध्यक्ष ॲड सुभाष देशपांडे, उपाध्यक्ष अतुल देशपांडे,



नबी शेख, खजिनदार सचिन हबीब, सेक्रेटरी मधुसुदन करवा, सहसचिव मकरंद बसवंती, राजकिरण वडनाल, अनिल यरगल, शिरीष जगताप, राघवेंद्र जोशी, दिपक यलगुलवार, मंगेश राऊत, प्रसन्न मेहता आदी उपस्थित होते.


**संक्षिप्त धावफलक** : बाऊन्सर्स संघ : १०० चेंडूत ०५ बाद १७९ ( प्रीतीश कुलकर्णी ११०, प्रदीप कांबळे यांनी ३३, अमित काबणे १४, हरिष कुलकर्णी व डब्लू जी पटेल यांनी प्रत्येकी एक गडी) वि. वि. मर्फी संघ : १०० चेंडूत ०४ गडी बाद १३६( हरिष कुलकर्णी यांनी ६२, राघवेंद्र जोशी २४, हाजी तांबोळी १५, आंबादास तोरा, महेश गौडाणरू व अजय सिंघ प्रत्येकी एक गडी). कांगारूज् संघ : १०० चेंडूत ०९ बाद १७० (सुगंधराज कुलकर्णी ४६, युनूस खान ३३, राहुल फूटाणे ११, विकास के ३- ३२ अभिजित गायकवाड २-१३, मुख्तार शेख २-२२) वि. वि. निंजा संघ : १०० चेंडूत सर्वबाद १४७ (प्रशांत कांबळे ३३ चेंडूत ०५ चौकार व ०२ षटकारासह ५१ धावा, अभय गुमस्ते १७, मुख्तार शेख १६, राजा पटेल ३-१३, आसिफ पटेल व त्रिंबक कुलकर्णी यांनी प्रत्येकी दोन गडी).

# बार्शीत ‘भगवंत श्री’ शरीर सौष्ठव स्पर्धा १३मेला

### शिवगौरव पुरस्काराचेही वितरण

**बार्शी, दि.३० एप्रिल-**

शिवकार्य आणि सामाजिक कार्यामध्ये नेहमीच अग्रेसर असणाऱ्या शिवराज्य सेने संघटनेच्यावतीने प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले आहे. त्यात भगवंत श्री शरीसौष्ठव स्पर्धा १३ मे रोजी सायंकाळी ७ वाजता बेदराई गल्ली कसबा पेठ बार्शी येथे केले आहे.



यामध्ये नवयुवकांना प्रोत्साहन मिळावे, युवकांना खेळाची आवड निर्माण व्हावी, व्यायामाची आवड निर्माण व्हावी, भारत देशातील युवक सशक्त व बलशाली व्हावेत या हेतूने शिवराज्य सेनेच्यावतीने या स्पर्धेचे आयोजन केले आहे. तसेच बार्शी व तालुक्यात विविध क्षेत्रामध्ये सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्था, संघटना यांना शिवगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तरी बार्शी परिसरातील शिवभक्तांनी या ऐतिहासिक कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन शिवराज्य सेनेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. हर्षवर्धन पाटील यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# महिला, दिव्यांग, युवकांचे मतदान केंद्रांवर व्यवस्थापन

## पंढरपूर शहर, तालुक्यात नियोजन; सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ मे-**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, जिल्ह्यात सोलापूर-४२ (अ.जा.) व माढा-४३ लोकसभा मतदारसंघाचे मतदान दिनांक ७ मे रोजी होणार आहे. लोकसभा मतदारसंघातील पंढरपूर विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रात प्रशासनाकडून आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मतदारसंघात विशेष मतदान केंद्र राहणार असून यात आदर्श मतदान केंद्रांतर्गत महिला, दिव्यांग व युवा व्यवस्थापित मतदान केंद्राचा समावेश असल्याचे प्रांताधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी सांगितले.



सोलापूर लोकसभा मतदार संघातील पंढरपूर विधानसभा मतदारसंघात आदर्श मतदान केंद्रातंर्गत महिला व्यवस्थापित दोन मतदान केंद्र, दिव्यांग व्यवस्थापित एक मतदान केंद्र आणि युवा कर्मचारी व्यवस्थापित दोन मतदान केंद्रही मतदान केंद्र विशेष राहणार आहेत. मतदान केंद्रात रॅम्प, व्हीलचेअर, प्रथमोपचार पेटी, मदत कक्ष, स्वतंत्र प्रसाधनगृह, हिरकणी कक्ष, उष्मघातापासून वाचण्यासाठी सूचना फलक, आरोग्य सुविधा,पुरेशी प्रकाश व्यवथा, पिण्याच्या पाण्याची सुविधा व इतर बाबी राहणार आहेत. महिला कर्मचारी व्यवस्थापित मतदान केंद्र :- मतदान केंद्र क्र.-१०२- पंढरपूर- द. ह. कवठेकर प्रशाला, पश्चिम बाजूची खोली क्र.१ व मतदान केंद्र क्र.-१८३-मंगळवेढा-न्यू इग्लिश स्कूल, मंगळवेढा पश्चिम बाजूची खोली नं. १४ (नवीन इमारत) येथे महिला कर्मचाऱ्यांच्या वतीने चालविण्यात येणारे मतदान केंद्र राहणार आहे. येथील मतदान केंद्रांत संपूर्ण व्यवस्थापन महिलांचे राहणार आहे. दिव्यांग कर्मचारी व्यवस्थापित मतदान केंद्र- मतदान केंद्र २५७ -गोणेवाडी- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गोणेवाडी, जवाहर योजना इमारत खोली नं.१ येथे दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या वतीने चालविण्यात येणारे मतदान केंद्र राहणार आहे. येथील मतदान केंद्रांत संपूर्ण व्यवस्थापन दिव्यांग कर्मचाऱ्यांचे राहणार आहे.

युवा कर्मचारी व्यवस्थापित मतदान केंद्र- मतदान केंद्र क्र.१६०- तरटगांव कासेगाव-जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पूर्व बाजूची खोली क्र. २, तरटगांव (कासेगांव) व मतदान केंद्र क्र.२७२-लमाणतांडा -माध्यमिक आश्रमशाळा लमाणतांडा जिन्याच्या डाव्याबाजूने खोली नंबर १ येथे युवा कर्मचाऱ्यांच्या वतीने चालविण्यात येणारे मतदान केंद्र राहणार आहे. येथे युवा कर्मचारी व्यवस्थापित मतदान केंद्र राहणार आहे.

### सावली, पाणी अन् उपचाराची सुविधा

उन्हाचा तडाखा लक्षात घेता मतदान केंद्रावर मतदारांकरीता निवारा, प्रतिक्षालय तयार करण्यात आले आहे. तसेच शुध्द पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधांची उपलब्धता करण्यात आली असल्याचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी सांगितले.

## संक्षिप्त वृत्त



### 'रयत'मधील नोकरी म्हणजे विठ्ठलाच्या दिंडीत सहभागी झाल्याचा आनंद : डॉ. जाधव

**पंढरपूर, दि.३ मे-**

विठ्ठलाच्या दिंडीत सहभागी होण्यातून भाविकांना जो आनंद मिळतो. तोच आनंद रयत शिक्षण संस्थेत नोकरी करताना सेवकांना होतो. संस्था म्हणजे केवळ इमारत नसते तर तेथे कार्यरत असणाऱ्या सेवकांनी सेवेतून निवृत्त होताना व्यक्त केलेले समाधान असते, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य प्राचार्य डॉ. जे. जी. जाधव यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात प्राध्यापक वेल्फेअर समितीच्या वतीने आयोजित 'शिक्षक आणि शिक्षकेतर सेवकांच्या सेवानिवृत्ती समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे हे होते. यावेळी मंचावर सत्कारमूर्ती उपप्राचार्य डॉ. बजरंग शितोळे, डॉ. हनुमंत लोंढे, डॉ. फैमिदा बिजापुरे, पर्यवेक्षक प्रा. युवराज आवताडे, प्रा. राजेंद्र शितोळे, प्रा. बाळासाहेब जाधव, प्रा. विलास भोसले, प्रा. शामराव साळुंखे, प्रा. सीताराम सावंत, प्रभाकर पारधी, मधुकर वाकडे, राजू निंबाळकर इत्यादी सेवक त्यांच्या जोडीदारासह उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. उमेश साळुंखे यांनी केले. या कार्यक्रमात सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांचा महाविद्यालयाच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. त्यामध्ये शाल, पुष्पहार, कर्मवीरांची प्रतिमा असलेले चांदीचे नाणे असे सत्काराचे स्वरूप होते. यावेळी सेवानिवृत्त सेवकांनी मनोगते व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रा. डॉ. भारती सुडके, प्रा. सुनिता मगर, आभार प्रा.नामदेव पाटील यांनी मानले.



### धैर्यशील मोहिते-पाटील यांना माळशिरस तालुका कुंभार समाजाचा पाठिंबा

**अकलूज, दि.३ मे -**

माढा लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांना माळशिरस तालुका कुंभार समाजाच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला. शिवरत्न बंगला येथे पाठिंब्याचे पत्र युवा नेते शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्याकडे संपूर्ण कुंभार समाजाच्या कार्यकर्त्यांनी दिले राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद चंद्र पवार कॉंग्रेस आय शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे शेतकरी कामगार पक्ष आम आदमी पार्टी व मित्रपक्ष आघाडीचे माढा मतदार संघातील अधिकृत उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांना पाठिंबा दर्शवत तालुक्यातील संपूर्ण कुंभार समाज आपल्या पाठीशी असल्याचं पत्रकात म्हटले आहे. कुंभार समाजाचे विविध अडचणी अनेक वेळा माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील जयसिंह मोहिते पाटील धैर्यशील मोहिते-पाटील यांनी सोडविले आहेत म्हणून त्यांच्या प्रचारात सहभागी होऊन माळशिरस तालुक्यातील कुंभार समाजाच्या प्रत्येक घरोघरी जाऊन तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हाचा प्रचार करणार असल्याचे समाजाचे अध्यक्ष अमित सुरेश कुंभार यांनी व्यक्त केले. यावेळी कुंभार समाजातील उपाध्यक्ष चांगदेव कुंभार, कार्याध्यक्ष नामदेव कुंभार, सचिव संजय कुंभार, संघटक नितीन कुंभार, सयाजी राजे कुंभार, रवींद्र कुंभार, अतुल कुंभार, प्रमोद कुंभार, विनायक कुंभार, भारत कुंभार, दिलीप कुंभार, हनुमंत कुंभार, आप्पा कुंभार, चंद्रकांत कुंभार, रमण महादेव कुंभार उपस्थित होते.

### मंगळवेढा शहरात सार्वजनिक शांततेचा भंग केल्याप्रकरणी सहा जणांविरूद्ध गुन्हा दाखल

**मंगळवेढा, दि. ३ मे-**

शहरात सार्वजनिक ठिकाणी रोडवर मोठमोठ्याने आरडाओरडा करीत एकमेकांच्या अंगाला झोंबाझोंबी तसेच शिवीगाळ करीत हाताने मारहाण करून सार्वजनिक शांततेचा भंग केल्याप्रकरणी सहा जणांविरूध्द गुन्हे दाखल झाले आहेत. दि. १ मे रोजी २.३० वा. यातील फिर्यादी पोलिस नाईक कृष्णा जाधव व पोलिस हवालदार हणमंत कोष्टी हे शहरात पेट्रोलिंग करीत असताना घाडगे कलेक्शनसमोर सार्वजनिक ठिकाणी रोडवर यातील आरोपी गणेश शिवाजी कुराडे, प्रशांत कुराडे, विशाल गजानन उन्हाळे, पांडुरंग परशुराम जाधव, नाना ज्ञानेश्वर जगताप, महेश बंडू मोरे (सर्व रा. मंगळवेढा) आदी सहाजण एकमेकांना हाताने मारहाण करून मोठमोठ्याने शिवीगाळ व आरडाओरड करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असताना दिसून आले. या दरम्यान पोलिसांनी जवळ जाऊन त्यांचे भांडण मिटवून त्यांना ताब्यात घेऊन भादवि १६० प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

### माण नदीपात्रातून बेकायदा वाळू वाहतूक करणारे वाहन जप्त; दोघांवर गुन्हे दाखल

**मंगळवेढा, दि. ३ मे-**

धर्मगाव येथील माण नदीपात्रातून बेकायदा वाळू वाहतूक करणारे वाहन पोलिसांनी पकडून अज्ञात दोन इसमाविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. माण नदीपात्रातून दि.२८ एप्रिलच्या पहाटे ४.३० वा. धर्मगाव येथील माण नदीपात्रातून नंबर नसलेला दोन लाखांचे वाहन हे वाळू भरून जात असताना पोलिसांना मिळून आले. पोलिसांना पाहताच चालक व अन्य एक व्यक्ती अंधाराचा फायदा घेऊन वाहन जागेवर सोडून पळून गेले. पोलिसांनी ५० हजार रुपये किंमतीची मोटरसायकल, वाळूसह २ लाख ५१ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून याची फिर्याद पोलिस अंमलदार तेजस मोरे यांनी दिल्यावर अज्ञात दोन व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

### अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक मतदान केंद्रावर विविध सुविधा

**सोलापूर, दि. ३ मे-**

लोकसभेसाठी दि. ७ म रोजी होणाऱ्या मतदानादिवशी सोलापूर मतदारसंघातील अक्कलकोट विधानसभा मतदारसंघामध्ये उन्हाची वाढती तीव्रता लक्षात घेऊन सर्व मतदान केंद्रावर मतदारांसाठी प्रशासनाने प्रतिक्षा कक्ष, सावलीसाठी मंडप, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, मदत कक्ष, आरोग्य सहाय्यक, दिव्यांग मतदारांसाठी रॅम्प, मदतीसाठी स्वयंसेवक, व्हिलचेअरची सुविधा केल्याचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सोपान टोम्पे यांनी सांगितले.

# दादर-सातारा-दादर एक्सप्रेस रेल्वे दररोज सुरु करा

### अशोक कामटे संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३ मे-**



सातारा -दादर -सातारा या एक्सप्रेस रेल्वेस दररोज सुरू करण्याची आग्रही मागणी शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने मुंबईतील मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दोन महिन्यापासून संघटनेच्या मागणीनुसार या रेल्वेचा विस्तार सातारपर्यंत करण्यात आला. ज्या दिवसापासून ही रेल्वे सेवा विस्तारीकरण करून सुरू करण्यात आली त्या दिवशीपासून या रेल्वेस कवठेमंकाळ, ढालगाव, जत रोड, म्हसोबा डोंगरगाव, सांगोला या स्टेशनवरून उत्स्फूर्तपणे प्रवाशांचा प्रतिसाद मिळत आहे. आठवड्यातील तीनही दिवस या रेल्वेस आरक्षणाकरता प्रतीक्षा कालावधी सुरू असून सर्वसाधारण डब्यामध्ये देखील प्रवाशांची गर्दी होत आहे.

सदरची रेल्वे दररोज धावण्याकरता रेल्वे प्रशासनाने कार्यवाही करावी अशी मागणी सातत्याने अशोक कामटे संघटनेने रेल्वेमंत्री भारत सरकार, रेल्वे विभागाकडे सातत्याने केली आहे. या निवेदनाच्या प्रती रेल्वे बोर्ड दिल्ली, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, सोलापूर यांनाही देण्यात आलेले आहेत. तरी येणाऱ्या काळामध्ये प्रवाशांची गर्दी व सुट्टीचा हंगाम लक्षात घेता प्रशासनाने या रेल्वेस कायमस्वरूपी नियमित (दररोज) धावण्याकरता प्रशासनास आदेश द्यावेत, अशी मागणी कवठेमंकाळ, ढालगाव, जत रोड, डोंगरगाव, सांगोला तालुका येथील नागरिक, सर्व स्वयंसेवी संस्था यांच्यासह प्रवासी वर्गातून होत आहे.

कोरोनापूर्वी विजापूर- मुंबई सुपरफास्ट एक्सप्रेस धावत होती ती तीन वर्षापासून बंद करण्यात आली त्याचा रेक उपलब्ध असून उर्वरित तीन दिवसाकरिता सातारा- दादर-सातारा या मार्गावर हा रेक वापरल्यास आठवड्यातील संपूर्ण दिवस मुंबईला जाण्याकरता मिरज पासून सांगोल्यातील सर्व स्टेशन परिसरातील प्रवाशांना जाण्याकरिता सुरक्षित, अल्प खर्चात मोठी सोय होणार आहे. सांगोला येथून पुणे -मुंबईकडे रेल्वेने जाण्याकरता ३५०-४०० आरक्षित व सर्वसाधारण तिकिटची विक्री होत आहे, रेल्वेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या मागणीकडे गांभीर्याने लक्ष देऊन हा प्रश्न मार्गी लावावा याकरिता कामटे संघटना प्रयत्नशील आहे.

**-नीलकंठ शिंदे, संस्थापक, शहीद अशोक कामटे, बहुउद्देशीय सामाजिक संघटना, सांगोला**

# काझीकणबसमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणूक जल्लोषात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३ मे-**



तालुक्यातील काझीकणबस येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त भीम गीतांच्या कव्वालीसह भीमनगरमधून जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली.

बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याचे एपीआय निलेश बागव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आणि बुद्ध वंदना घेऊन जयंती कार्यक्रमाच्या मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. अध्यक्षस्थानी मेजर कमलाकर कांबळे होते. यावेळी रत्नाकर गायकवाड, नरसिंह गायकवाड, वामन गायकवाड, शेकू गायकवाड, खंडू गायकवाड, सूरज गायकवाड, अर्जुन गायकवाड, धर्मा गायकवाड, सोपान गायकवाड, हरीश गायकवाड, मल्लू गायकवाड, मल्लिनाथ वाघमारे, अमृत सोनकांबळे, राम हल्ले, शिवराज गायकवाड, मधुकर कांबळे, मधुकर गायकवाड, विद्यासागर गायकवाड, किरण गायकवाड, किसन कारवे, अभिमन्यू गायकवाड, अविनाश गायकवाड, गणेश गायकवाड, विशाल कांबळे, सचिन कांबळे, भीम कांबळे, लक्ष्मण लोखंडे, निवृत्ती कांबळे, परमेश्वर गायकवाड, स्वप्निल गायकवाड, ज्ञानदेव लोखंडे, हरिबा गायकवाड, तुकाराम गायकवाड, चंद्रकांत गायकवाड, रंजू गायकवाड, दत्ता कांबळे, नारायण गायकवाड, अमोल गायकवाड, गजानन गायकवाड, दत्ता कांबळे, राजू गायकवाड, चंद्रकांत गायकवाड, दत्ता देढे, गंगाराम देडे, सटवाजी उकरंडे, शत्रू करंडे, शरद जाधव, नागू हांडगे, अफसर आगसापुरे, सरपंच सिद्धाराम धर्मसाले, उपसरपंच दत्तात्रय मुनाळे, पोलीस पाटील दीपक मंडळे, माजी सरपंच अश्पाकभाई आगसापुरे , नारायण बंदीछोडे, गणेश जाधव, कल्याणी मुनाळे, संगमेश्वर मजगे, अभय वाले, सागर धर्मसाले, काशिनाथ खुबा यांच्यासह मोठ्या संख्येने भीमसैनिक सहभागी झाले होते. यावेळी करण्यात आलेल्या जयघोषांनी आसमंत दणाणून गेला होता.

# सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घेणारे सरकार आणा : धैर्यशील मोहिते-पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ मे-**



केंद्र शासनाच्या उद्योगपती धार्जिण्या धोरणांमुळे महागाई वाढवून सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. घरगुती गॅस सिलेंडरच्या बाबतीत २०१४ ला ४१० रुपयाला एका सिलेंडरची किंमत होती. आज तोच सिलेंडर ११०० रुपयांना आहे. घरातील प्रमुख महिला जी आपले घर सांभाळत असते. त्या माता भगिनींना आपले प्रपंच चालवण्यास मोठी कसरत करावी लागत आहे. यासाठी देशात सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घेणाऱ्या सरकार आणण्यासाठी मला विजयी करा, असे आवाहन महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केले.

माढा लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशिल मोहिते-पाटील यांनी खटाव, औंध येथे महिला मेळावा घेतला, यावेळी ते बोलत होते. यावेळी मदनसिंह मोहिते-पाटील, रणजीत देशमुख, अनिल देसाई, विवेक देशमुख, संजय भोसले, विजय शिंदे, शहाजीराजे भोसले, शिवसेना (उबाठा) महिला तालुकाध्यक्ष सलमा शेख, बाबा गोसावी, संजय भोसले, मार्तंड इंगळे यांच्यासह परिसरातील नागरिक, मतदाधिकारी, महिला, तरुण व मान्यवर उपस्थित होते.

# रिपाइं कार्यकर्त्यांनी भाजपाच्या पाठीशी रहावे

## जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.३ मे-**

माढा मतदार संघात आरपीआय (आठवले गट) कार्यकर्त्यांनी भाजपाच्या पाठिशी ठाम.

संपूर्ण देशात आर पी आय चे राष्ट्रीय अध्यक्ष रामदासजी आठवले यांनी भाजपा व अन्य पक्षच्या महायुती मध्ये समाविष्ट होण्याचा निर्णय घेतला आहे या निर्णयाची अंमलबजाणी राज्य पातळीवरही असल्याने माढा लोकसभा मतदारसंघात भाजप, शिवसेना (शिंदे गट) मनसे, स्वाभिमानी शेतकरी संघटना, रासपा या महायुतीचे अधीकृत उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचा आरपीआयचे कार्यकर्त्यांनी प्रचार करुन त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांवर असून रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करावेत असे आवाहन आरपीआय आठवले गट सोलापूर जिल्हा अध्यक्ष सोमनाथ भोसले यांनी केले आहे यावेळी आरपीआय चे तालुका अध्यक्ष शामराव भोसले , संघटक तुकाराम बाबर, बी .टी . शिवशरण ,बापुराव पोळके , उपस्थित होते . मध्यंतरी शोशल मिडीयाच्या माध्यमातून युती धर्माचे पालन होत नसल्याने आय च्या कार्यकर्त्या मध्ये नाराजी असल्याच्या पोस्ट फिरत होत्या . त्यावर वरिष्ठ पातळीवर चर्चा होऊन व प्रत्यक्ष रणजितसिंह निंबाळकर यांच्याशी संवाद झाला असून शंकाचे निरसन झाले आहे तरी आरपीआय कार्यकर्त्यांनी रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचा प्रचार करुन त्यांना निवडून आणण्यासाठी सर्व आरपीआय कार्यकर्त्यांनी मेहनत घ्यावी . राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी भाजप शिवसेना मनसे रासप बरोबर युती केली आहे आठवले यांच्या आदेशानुसार माढा लोकसभा मतदारसंघात नाईक निंबाळकर यांचे पाठीमागे उभे राहून त्यांना भरघोस मतानी निवडून आणावे असे आवाहन केले आहे.



# पंढरपूरमध्ये बुधवारपासून समता वारी सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ मे-**

येथील संत विचार पीठाच्या वतीने येत्या बुधवारी (ता.८) ते शुक्रवार (१० मे ) या तीन दिवसांच्या कालावधीत पंढरपूरमध्ये समता वारी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या समता वारी सोहळ्यातील प्रत्येक कार्यक्रमात संत साहित्य प्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन देखील आयोजक असलेल्या संत विचार पीठाकडून करण्यात आले आहे.



या सोहळ्यात बुधवार ते शुक्रवार दरम्यान विविध उपक्रम हाती घेतले आहेत. बुधवार दि. ८ मे रोजी सायं. ५ ते ७ वा. मंगळवेढा मधील श्रीसंत चोखोबाराय यांची पालखी नगरप्रदक्षिणा करणार असून याचे उदघाटन श्री संत चोखामेळा समाधी, मंगळवेढाचे अध्यक्ष जयराज शेंबडे व सचिव अविनाश शिंदे यांच्या हस्ते तर डॉ. आप्पासाहेब गोविंद पुजारी, चोखामेळा व परिवार, चरित्र व समग्र अभंग गाथाचे लेखक अॅड. दत्तात्रय तोडकरी यांच्या उपस्थितीत होणार आहे. त्यानंतर पंढरपूर मधील स्टेशन रोड लगत असलेल्या तनपुरे महाराज मठात मुक्काम करणार आहे.गुरुवारी, दि. ९ मे रोजी सकाळी ७ ते ९ प्रदक्षिणा रोडवर ग्रंथ दिंडी निघणार असून याचे उद्घाटन श्रीसंत तनपुरे महाराज ट्रस्टचे अध्यक्ष हभप बद्रीनाथ महाराज तनपुरे यांच्या हस्ते तर श्री विठ्ठल इन्स्टिटयूट ऑफ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशनचे उपाध्यक्ष भिमराव रोंगे, श्रमिक सहयोग, चिपळूणचे उपाध्यक्ष भार्गव पवार हे उपस्थित राहणार आहे. त्यानंतर सकाळी ९ ते १० मध्ये लोटस इंग्लिश स्कूलमध्ये एकत्र जमणार आहेत. त्यानंतर १० वा लोटस् इंग्लिश स्कूलमध्येच एन.ए.पी.एम., मदर टेरेसा पुरस्कार विजेत्या, समाजसेविका, जेष्ठ विचारवंत मेधाताई पाटकर यांच्या हस्ते संतसाहित्य संमेलनाचे उदघाटन व परिसंवाद कार्यक्रम होणार असून यासाठी श्री विठ्ठल इन्स्टिट्यूट ऑफ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन, पंढरपूरचे अध्यक्ष हणमंत बागल हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. तर संमेलनाध्यक्ष म्हणून यवतमाळ मधील जेष्ठ विचारवंत, लेखक व तत्वचिंतक डॉ. अशोक राणा तर संतविचार पीठ, पंढरपूरचे अध्यक्ष ह.भ.प.भारत जाधव महाराज हे स्वागताध्यक्ष राहणार आहेत.

यासाठी संजय गोपाळ (मुंबई), विजय दिवाणे (मुंबई) राजन इंदूलकर (चिपळूण) यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. दुपारी १२ ते १.३० पर्यंत सुप्रसिद्ध भारुड गायिका चंदा तिवाडी व त्यांच्या सहकाऱ्यांचे भारुड हा लोककला प्रकार सादर होणार आहे. यासाठी जेष्ठ पत्रकार व संपादक शिवाजी शिंदे हे उपस्थित राहणार आहेत. दुपारच्या भोजनानंतर संतांची चळवळ या धार्मिक व सामाजिक विषयावर पहिला परिसंवाद होणार असून अध्यक्षस्थानी ह.भ.प. श्यामसुंदर सोन्नर महाराज राहणार आहेत तर यामध्ये शाम सुंदर मिरजकर (मायणी), ह.भ.प. ज्ञानेश्वर बंडगर महाराज (सांगोला), ह.भ.प. सुहास फडतरे महाराज (कोरेगांव) यांची उपस्थिती राहणार आहेत तर संवादक म्हणून स्वेरीचे प्रा. डॉ.यशपाल खेडकर हे राहणार आहेत.

त्यानंतर सायं. ४.०० ते ६.०० या वेळात साने गुरुजी व संतविचार या विषयावर दुसऱ्या परिसंवादाचे आयोजन केले आहे. यासाठी अध्यक्ष म्हणून देवदत्त परुळेकर महाराज (वेंगुर्ला) तर यात डॉ.राजेंद्र कुंभार (जयसिंगपूर), श्रीरंग गायकवाड (पुणे),प्रा.स्वामीराज भिसे (पुणे), यांनी सहभाग घेतला आहे. यासाठी संवादक म्हणून शिवाजी शिंदे (पंढरपूर) हे काम पाहणार आहेत. सायं. ७.०० ते रात्री ९ वा. ङ्गपुज्य साने गुरुजी प्रेमी मंडळी यांची श्रीसंत तनपुरे महाराज मठामध्ये समन्वय व आढावा बैठक आयोजित केले असून यामध्ये महत्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे.संतसाहित्य संमेलनाचे परिसंवाद व समारोप कार्यक्रमाचे आयोजन श्री संत तनपुरे महाराज चारोधाम मंडप ट्रस्ट, पंढरपूर, श्रीसंत कैकाडी महाराज विश्व पुण्यधाम मंदीर, पंढरपूर, साने गुरूजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट, वडघर, मानगांव, संतविचार पीठ, पंढरपूर, श्री विठ्ठल इन्स्टिट्यूट ऑफ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन, पंढरपूर व श्रमिक सहयोग, चिपळून यांनी केले आहे. कार्यक्रमाच्या अधिक माहितीसाठी हभप भारत जाधव मो. ९०११०९७९७९, हभप ज्ञानेश्वर बंडगर मो. ८४५९२१२०२५ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

### संत विचार पिठाची माहिती

### शुक्रवारी अखेरच्या दिवशीचे कार्यक्रम

अखेरच्या दिवशी शुक्रवारी (ता.१०) सकाळी ७.वा. नामदेव पायरी, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदीर, महाद्वार, पंढरपूर येथे समतेचा जागर (भजन, गीत व घोषणा इ.) आणि श्री संत चोखोबाराय यांचा श्री पांडुरंग दर्शन सोहळा. त्यानंतर सकाळी ८ ते ८.३० पर्यंत श्रीसंत कैकाडी महाराज मठ, पंढरपूर येथे एकत्रित आल्यानंतर श्रीसंत कैकाडी महाराज विश्वपुण्यधाम मंदीर, पंढरपूर येथे सकाळी ८.३० ते १०.३० ह.भ.प. भारत जाधव महाराज यांच्या अध्यक्षतेखाली संतविचार आणि अस्पृश्यता निवारण या विषयावर परिसंवादाचे आयोजन केले असून यामध्ये प्रा. डॉ. अरुण शिंदे (कोल्हापूर), ह.भ.प. नितीन सावंत महाराज (परभणी), ह.भ.प. अभय जगताप महाराज (पुणे) यांचा सहभाग असणार आहे यासाठी संवादक म्हणून सारंग कोळी (पंढरपूर) हे काम पाहणार आहेत. सकाळी १०.३० ते १२ दरम्यान डॉ.अशोक राणा (जेष्ठ विचारवंत, लेखक व तत्वचिंतक) यांच्या अध्यक्षतेखाली समारोप समारंभ होणार असून यासाठी दत्तात्रय कोंडलकर, सदाशिव मगदूम (मिरज), वसंत एकबोटे (नाशिक) यांच्यासह संत विचार पीठातील पदाधिकाऱ्यांसह आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## संक्षिप्त वृत्त




### निवृत्त कामगारांच्या पेन्शनचा प्रश्न मार्गी लावू : पालकमंत्री पाटील

**सोलापूर, दि.३ मे -**
लक्ष्मी विष्णू कामगारांच्या घराचा प्रश्न आणि खासगी निवृत्त कर्मचारी व कामगारांचा प्रश्न आचारसंहिता संपल्यानंतर मार्गी लावू, असे आश्वासन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले. महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून देगांव रोड रिलायन्स मार्केट समोर लोकसेवा तरुण मंडळाच्या श्री संत चोखामेळा मंदिर येथे ई.पी.एस.९५, पेन्शनर निवृत्त कामगार व लक्ष्मी विष्णू मिल कामगारांचा मेळाव्याच्या वेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी आ. विजय देशमुख, हभप लक्ष्मण महाराज चव्हाण व शहर अध्यक्ष शशिकांत भुसारे, जिल्हा संघटक पांडुरंग ढवण व महिला शहर सचिव आशा होळकर उपस्थित होते. त्यांनी लक्ष्मी विष्णु समन्वय यांनी पेन्शनरांचा प्रश्न मांडला. तसेच वाढीव पेन्शनचे २०१४च्या निवडणुकीत भाजपाने दिलेले अश्वासन पूर्ण करावे, असे मुद्दे मांडले. पालकमंत्र्याच्या आश्वासनानंतर महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांना भरघोस मताने निवडून आणण्याचे आवाहन पदाधिकाऱ्यांनी कामगारांना केले.

### महाराष्ट्र अस्थिरोग संघटनेच्यावतीने आरोग्य सप्ताहास सुरवात

**सोलापूर, दि. ३ मे-**
महाराष्ट्र अस्थिरोग संघटनेच्या स्थापना दिनानिमित्त सोलापुरात आरोग्य सप्ताहास १ मे पासून सरुवा झाली असून ७ मेपर्यं याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रदीप कोठाडिया यांनी पत्रकार परिषदेत दिली. १९८३ साली या संघटनेची स्थापना करण्यात आली. गेले ४० वर्षापासून महाराष्ट्रातील सर्व अस्थिरोग तज्ञ आपुलकीने आपली सेवा बजावत आहेत. स्थापना दिनानिमित्त सप्ताहात विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि. ६ मे २०२४ रोजी डफरीन चौक येथील आयएमए हॉल येथे हाडाची ठिसूळता तपासणी मोफत शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे तसेच या ठिकाणी अस्थिरोग तज्ञ विविध प्रश्न संदर्भात मार्गदर्शन करणार आहेत. रुग्णांची मोफत रक्त, लघवी, कॅल्शियम तपासणी शिबिर, नागरिकांना आरोग्य मार्गदर्शन करणे, खेळाडू आणि पोलिस सैनिक भरती करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या अकॅडमी मध्ये जाऊन आरोग्य तपासणी व मार्गदर्शन केले जाणार आहे. सीनियर सिटीजन क्लब येथे सांध्याची झीज व हाडांची ठिसूळता या विषयावर मार्गदर्शन व तपासणी केली जाणार आहे असेही यावेळी डॉ. कोठाडिया यांनी सांगितले.

### शहर गुन्हे शाखेकडून चार गुन्हे उघडकीस; १ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर, दि. ३ मे**
सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी २ आरोपींना अटक करून त्यांच्याकडून चोरीचे ४ गुन्हे उघडकीस आणले. या कारवाईत पोलिसांनी १ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आदित्य उर्फ पोत्या बसवराज दोडमनी (वय २६, रा. बिलाल नगर, नडगेरी पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, विजापूर रोड, सोलापूर) आणि आकाश भंवरसिंह राजपूत उर्फ बंटी (वय २२, रा. विद्यानगर झोपडपट्टी, रामनगर, पिंपरी चिंचवड) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. भैय्या चौकात राहणारे गणेश लक्ष्मण खोत या सिगारेट विक्रेत्याकडील ३२ हजार ८६० रुपयांची सिगारेट पाकीटे १० जुलै २०२३ रोजी दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी चोरून नेली होती. तर नामदेव भिमराव चव्हाण (रा. वाडी बामणे, जि. उस्मानाबाद) याच्या जीपमधून १२ जुलै २०२३ रोजी चोरट्यांनी ७७ हजार ८५९ रुपये किंमतीची सिगारेट पाकिटे चोरून नेली होती. या दोन्ही गुन्ह्यांबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यांचा तपास करताना गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी आकाश राजपूत यास सुपा (अहमदनगर) येथून ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने हे दोन्ही गुन्हे केल्याचे कबुल केले. पोलिसांनी त्याच्याकडून ७० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. तर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी आदित्य दोडमनी यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून विजापूर नाका पोलिस ठाण्यात दाखल असलेला तसेच मंगळवेढा पोलिस ठाण्यात दाखल असलेला दुचाकी चोरीचा गुन्हा उघडकीस आणला. पोलिसांनी ६५ हजार रुपये किंमतीच्या दोन दुचाकी जप्त केल्या. ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ दिपाली काळे, सहायक आयुक्त प्रांजली सोनवणे, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पोलिस निरीक्षक विजय पाटील यांची टीम व सायबर पोलिस ठाण्यातील कर्मचाऱ्यांनी केली.

# नेहा हिरेमठ हत्येच्या निषेधार्थ सोलापुरात भव्य हिंदू जन आक्रोश मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापर, दि. ३ मे-**
कर्नाटकातील सौंदत्ती या ठिकाणी झालेल्या नेहा हिरेमठ तरुणीच्या हत्येच्या विरोधात सोलापुरात शुक्रवारी सायंकाळी सकल हिंदु समाजाच्यावतीने हिंदू जनआक्रोश मोर्चा काढून लव्ह जिहादवर प्रतिबंधात्मक कठोर कायदा करण्याची मागणी करण्यात आली.




कर्नाटकातील हुबळी सौंदत्ती या ठिकाणी नेहा हिरेमठ या तरुणीची निर्घृण हत्या करण्यात आली. याच घटनेच्या निषेधार्थ सोलापूर शहरातील मल्लिकार्जुन मंदिरापासून शुक्रवारी सायंकाळी सकल हिंदू समाजाच्यावतीने हिंदू जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

या मोर्चामध्ये महिलांनी तसेच हिंदू संघटनांनी सहभाग नोंदवला. हातामध्ये भगवे ध्वज आणि नेहा हिरेमठ हीचे पोस्टर घेऊन लव जिहादवर प्रतिबंधात्मक कठोर कायदा करण्याची मागणी मोर्चेकरी महिलांनी केली तसेच आरोपीला फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशा घोषणा देण्यात आल्या. या मोर्चामध्ये आ. राम सातपुते, आ. प्रणिती शिंदे यांच्यासह महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

मल्लिकार्जुन मंदिरापासून निघालेला मोर्चा पंजाब तालीम, चौपाड, नवी पेठ, सरस्वती चौक मार्गे हुतात्मा चौक इथे विसर्जित होऊन जाहीर सभेत रूपांतर झाले. सदरच्या घटनेचा निषेध नोंदवला. यावेळी मोर्चा परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी चोख पोलीस बंदोबस्त तसेच संवेदनशील भागात कमांडो आणि बी.एस.एफ सेक्युरिटी तैनात करण्यात आली होती.




## कर्मचाऱ्यांचा स्तर उंचाविण्यासाठी कार्यरत राहू : आ. सुभाष देशमुख

**लोकमंगल पतसंस्थेची सर्वसाधारण सभा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे -**
नजीकच्या काळात सभासदांचे आरोग्य, आर्थिक, सामाजिक, रोजगारनिर्मिती, उच्च शिक्षण व परदेशात शिक्षण आदी योजनांद्वारे कर्मचाऱ्यांचा स्तर उंचविण्यासाठी कार्यरत राहून अशाप्रकारे उत्तरोत्तर उन्नती करत राहील अशा शुभेच्छा लोकमंगल समूहाचे संस्थापक अध्यक्ष आमदार सुभाष देशमुख यांनी दिल्या.

लोकमंगल समूहातील कर्मचाऱ्यांच्या उन्नतीसाठी कार्यरत असलेली लोकमंगल कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्था मर्या., मु.पो.बीबी दारफळ, ता.उत्तर सोलापूर या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान वडाळा (ता. उत्तर सोलापूर) येथे संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी गजानन भाकरे, रोहन देशमुख व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. संस्थेचे चेअरमन सरोजनी निकम यांनी अद्यापपर्यंत सभासद नसलेल्या कर्मचाऱ्यांनी सभासद होऊन उपलब्ध सोई-सुविधाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. सेक्रेटरी सुदन सुरवसे यांनी संस्थेचा वार्षिक अहवाल वाचन करुन सभेपुढील विषयांची मंजूरी घेतली. सूत्रसंचालन सतिश लोंढे व श्रध्दा कुलकर्णी यांनी केले.

## मित्रानेच मित्राला घातली टोपी; प्लॉट देण्याच्या आमिषाने १७ लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ मे**
प्लॉट देण्याचे आमिष दाखवून मित्रानेच मित्राला १६ लाख ६४ हजारांना फसविल्याची केल्याची घटना उघडकीस आली असून याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.




याबाबत प्रविण रेवू राठोड (वय ३०, रा. मिलीटरी हॉस्पीटल, मासिंगपूर, सिलचन, राज्य आसाम, कायम पत्ता रा. महालक्ष्मी निवास, गट नं. ५, गुरूदेव दत्त नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अविनाश अनिल खलाटे (रा. सरडे रोड, फौजी ढाबाशेजारी, राजळे, ता. फलटण, जि. सातारा) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रविण राठोड आणि अविनाश खलाटे हे दोघे मित्र असून दोघेही आसाम येथे सैन्याच्या एका दलात कार्यरत आहेत. नोव्हेंबर २०२३ मध्ये अविनाश खलाटे याने प्रविण राठोड यांना रिअल इस्टेटमध्ये गुंतवणुक करायची आहे, त्यासाठी २० लाख रुपये लागतील, तु मला मदत कर, मी तुला सातारा व पुणे येथे चांगला प्लॉट देतो असे सांगितले. त्यामुळे राठोड यांनी खलाटे यास वेळोवेळी गुगल पे, फोन पे तसेच एटीएम मशिनवरून १६ लाख ६४ हजार रुपये ट्रान्सफर केले. पैसे घेऊनदेखील खलाटे याने राठोड यांना प्लॉट दिला नाही. म्हणून मार्च २०२४ मध्ये राठोड यांनी खलाटे यास त्यांनी दिलेले पैसे परत मागितले. त्यावेळी अविनाश खलाटे याने त्याची बहिण सोनाली खलाटे ही रिअल इस्टेटचे काम पाहात असून तिच्यामार्फत तुला सातारा किंवा पुणे येथे चांगला प्लॉट घेऊन देतो असे म्हणून राठोड यांचा विश्वास संपादन करून त्यांचे पैसे देण्यास टाळाटाळ करून फसवणुक केली. स. पोलिस निरीक्षक गायकवाड तपास करीत आहेत.

# जि.प. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या 'पीएफ'ची चौकशी सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**
जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागांतर्गत असलेल्या राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम न भरल्याने बँक खाते गोठविण्यात आले होते. नेमकी किती कर्मचाऱ्यांची रक्कम भरली याची पीएफ कार्यालयाने आता चौकशी सुरू केली आहे.



जिल्हा परिषदेच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांच्या मानधनातून पीएफची रक्कम कपात करण्यात आली मात्र ही रक्कम पीएफ कार्यालयाला भरलीच नाही. २०२० पासून कर्मचाऱ्यांची थकबाकी असल्याने पीएफ कार्यालयाने एनआरएचएम विभागाचे खाते सील केले होते. त्यामुळे कामकाजाची अडचण निर्माण झाल्यावर आरोग्य विभागाने शासनाची परवानगी मागून थकलेला पीएफ भरला. मात्र उशिराबद्दल पीएफ कार्यालयाने आरोग्य विभागाला दंड केल्याचे हे सांगण्यात आले. आरोग्य विभागाने नेमका किती कर्मचाऱ्यांचा पीएफ भरला याची आता चौकशी सुरू झाली आहे. गेल्या दोन दिवसापासून पीएफ कार्यालयाचे अधिकारी आरोग्य विभागातून माहिती घेत आहेत. याबाबत अधिक माहिती घेण्यासाठी डॅमचा पदभार असलेले जानगवळी यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला पण ते या चौकशीकामी सहकार्य करीत असल्याने त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

कर्मचाऱ्यांच्या पगारातून पीएफची रक्कम कपात करण्यात आली मात्र चार वर्षे पीएफ कार्यालयाकडे भरण्यात आली नाही. या विलंबासाठी झालेला दंड कोणत्या खर्चातून भरला. ही जबाबदारी कोणाची होती. याच्यावर कोणाचेच नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे. कंत्राटी डॉक्टरांच्या वेतनानंतर त्यांच्या वेतन फरकाची रक्कम देण्याची जबाबदारी कोणाची? कोणत्या कर्मचाऱ्यांचा कोणता जॉब चार्ट यावरून आता वादंग माजले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या आढावा बैठकीत आता या गंभीर बाबींचा खुलासा होणार आहे.







**सोलापूर : दैनिक सोलापूर तरुण भारतचे कार्यकारी संचालक तथा मुख्य समूह संपादक दिलीप पेठे यांना शुक्रवारी तरुण भारत कार्यालयात वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना सोलापुरातील नामवंत विधीज्ञ. यावेळी अॅड. चैतन्य पेठे उपस्थित होते.**


## कमलाबेन पटेल महाविद्यालयाचा आकाश जाधव जिल्ह्यात प्रथम



**सोलापूर, दि. ३ मे -**
कुंभारी येथील श्रीमती कमलाबेन पटेल इन्सटिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशनमध्ये २०२२-२३ पासून बी.एससी. (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरू झाला आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या या अभ्यासक्रमाची दुसऱ्या सत्राच्या जानेवारीमध्ये झालेल्या परीक्षेमध्ये आकाश हणमंत जाधव याने ७६.२८ टक्के गुण मिळवून पश्चिम महाराष्ट्र व सोलापूर जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक मिळविला आहे. यावेळी महाविद्यालयाच्या वतीने आकाश जाधव यांचा सत्कार संस्थेचे विश्वस्त मेहूल व दिप्ती पटेल यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी प्राचार्य व शिक्षकवृंद उपस्थित होते. या यशाबद्दल संस्थेचे कार्यकारी विश्वस्त बिपीनभाई पटेल, विश्वस्त भारतीबेन पटेल, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. सचिन मुंबरे, अधिष्ठाता डॉ सुहास कुलकर्णी, वैद्यकीय अधिक्षक डॉ.गुणवंत नस्के, आरोग्य अधिक्षक डॉ. एस.एम.करजखेडे यांनी अभिनंदन केले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● निवासी संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Resident Editor (The Editors are responsible as per PRB Act). Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue.

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानराज माणिकप्रभू महाराजांचे उद्या व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

कृष्णामाई हॉस्पिटलच्या वतीने आदि शंकराचार्य यांच्या जयंती निमित्त माणिकप्रभु संस्थान माणिकनगरचे पिठाधिपती परमपूज्य सदगुरू ज्ञानराज माणिकप्रभू महाराज यांचे रविवारी ५ मे रोजी सायंकाळी ५ वाजता हिराचंद नेमचंद किर्लोस्कर सभागृहात व्याख्यानाचे आयोजन केल्याची माहिती डॉ. माधुरी राजीव दबडे यांनी दिली.

हॉस्पिटलच्या वतीने सामाजिक बांधिलकी म्हणून अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवण्यात येतात. त्याच्याच अनुषंगाने जयंतीचे औचित्य साधून परमपूज्य महाराजांचे कार्य आणि त्यांची जीवनशैली या विषयावर व्याख्यान होईल. महाराजांनी त्यांच्या जीवनात ऑल इंडिया एसएससी स्कूल परिक्षेत उत्कृष्ठ कामगिरी केल्याबद्दल त्यांना राष्ट्रपती पदक देण्यात आले. तसेच सिंदिया स्कुलमध्ये उत्कृष्ठ विद्यार्थी म्हणून त्यांनी सुवर्ण पदक मिळवले. अद्वैतवेदांत हा त्यांचा संकल्पमत सिध्दांत आहे. आजपर्यत त्यांनी सामाजिक तसेच शैक्षणिक क्षेत्रात निस्वार्थपणे सेवा केली. समाजातील गरीब लोकांच्या उन्नतीसाठी तसेच शैक्षणिक क्षेत्राच्या उन्नतीसाठी अनेक उपक्रमही त्यांनी राबवलेले आहेत. त्यांच्या अगाध ज्ञानाचा आणि आदि शंकराचार्य यांच्यावरील अभ्यासाचा लाभ सोलापूरकरांना व्हावा तसेच तरूण पिढीला आपल्या भारतीय संस्कृतीची ओळख व्हावी, ती जपली जावी. त्याचे आचरण व्हावे, तरूण आपल्या देशाचे भविष्य आहे आणि प्रत्येक तरूणाने आपल्या देशाच्या सेवेसाठी योगदान द्यावे. यासाठीचे संस्कार त्यांच्यावर घडण्यासाठी या व्याख्यानाचे आयोजन केले आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. दबडे यांनी केले.

## ▶▶ क्राईम वृत्त...

### श्रीशैल नगरातून ३० हजारांची दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. ३ मे-**

शहरातील भवानी पेठेतील श्रीशैल नगरातून चोरट्यांनी ३० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली.



याबाबत नागनाथ महादेव रामपुरे (वय ३६) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २९ एप्रिल रोजी रात्री नागनाथ रामपुरे यांनी त्यांची एमएच १३ डीएल ६७८० क्रमांकाची दुचाकी घरासमोर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेली. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार शिवशरण पुढील तपास करीत आहेत.

### शासकीय विश्रामगृह समोरून दुचाकी चोरीला

**सोलापूर, दि. ३ मे-**

शासकीय विश्रामगृहासमोरील रस्त्यावर दुचाकी पार्क करून फळं खरेदी करण्यासाठी गेल्यानंतर चोरट्याने ७० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत फय्याज महताबअली शेख (वय ३२, रा. बोरूळ, पो. कणबस, ता. दक्षिण सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २९ एप्रिल रोजी सायंकाळी फय्याज शेख हे त्यांची दुचाकी क्र. एमएच १३ ईजी २७६३ ही शासकीय विश्राम गृहासमोरील रस्त्यावर पार्क करून फळ खरेदी करण्यासाठी गेले होते. त्यावेळी चोरट्याने त्यांची दुचाकी चोरून नेली. अशी नोंद सदर बझार पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार भोई पुढील तपास करीत आहेत.

### मंत्री चंडक विहारमध्ये २५ हजारांचा दरवाजा चोरीस

**सोलापूर, दि. ३ मे-**

होटगी रोडवरील मंत्री चंडक विहारमधील बंद घर फोडून चोरट्यांनी २५ हजार रुपयांचा लोखंडी दरवाजा चोरून नेला. याबाबत स्मिता सतिश जोशी (वय ६५, रा. विश्राम नगर, जुना होटगी नाका, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्मिता जोशी यांचा मंत्री चंडक विहारमध्ये फ्लॅट आहे. १० फेब्रुवारी २०२२ ते ३० एप्रिल २०२४ या कालावधीत चोरट्यांनी जोशी यांच्या फ्लॅटच्या मागील दरवाजाचे कुलूप तोडून फोडून नुकसान करून २५ हजार रुपये किंमतीचा मुख्य लोखंडी दरवाजा चोरून नेला. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक शेख पुढील तपास करीत आहेत.






### सासू व नणंदसोबत भांडणामुळे विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि. ३ मे-**

सासू व नणंदेसोबत भांडणामुळे विववाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह तिघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत बेबीआयेशा इकरार शेख (वय २१, रा. आसरा सोसायटी, आसरा चौक, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती इकरार शेख, सासू हसिना शेख, नणंद हिना राजू सुतार (रा. गैबीपीर वसाहत झोपडपट्टी, आसरा चौक, सोलपूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बेबीआयेशा व इकरार यांचा फेब्रुवारी २०२१ मध्ये विवाह झाला आहे. लग्नानंतर बेबीआयेशा या सासरी नांदत असताना पती इकरार याने सासू व नणंदसोबत घरातील भांडणाचा राग मनात धरून बेबीआयेशा यांना मारहाण केली. तसेच रिक्षा घेण्यासाठी एक लाख रुपये व एक तोळे सोने माहेरून आणावेत म्हणून बेबीआयेशा यांचा शारीरीक व मानसिक छळ केला. म्हणून पोलिसांकडे नोंद करण्यात आली आहे. हवालदार गावडे पुढीत तपास करीत आहेत.

## आमदार सातपुतेंच्या पाठीशी हिंदुत्ववादी संघटना उभारल्या

**हिंदुत्ववादी संघटनांच्या मेळाव्यासाठी मोठी गर्दी**

**जय श्रीरामाच्या घोषणांनी मंगल कार्यालय दुमदुमले**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

सोलापूर लोकसभा निवडणुकीत भाजपचे उमेदवार राम सातपुते यांनी विजयासाठी मोदीत्व आणि हिंदुत्वाच्या मुद्यावर भर दिला असून, त्यांच्या पाठीशी सोलापूर शहर जिल्ह्यातील हिंदुत्ववादी संघटनाही उभ्या राहिल्या आहेत. जुन्या एम्लॉयमेंट चौकाजवळील शांतीसागर मंगल कार्यालयात आयोजित हिंदुत्ववादी संघटनांच्या मेळाव्यात भाजपचे उमेदवार सातपुते उपस्थित होते. यावेळी जय श्रीरामच्या घोषणांनी मंगल कार्यालय दुमदुमून गेले. गळ्यात भगवे उपरणे आणि डोक्यावर भगव्या टोप्या परिधान केलेले कार्यकर्ते उपस्थित होते. यात शहर जिल्ह्यातील सकल हिंदू संघटनांनी पुढाकार घेतला होता.

या मेळाव्यातील कार्यक्रमाच्या व्यासपीठावर विश्व हिंदू परिषद महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य लक्ष्मण महाराज चव्हाण, रवि बंडे, हिंदू महासभा सोलापूर शहर अध्यक्ष सुधाकर बहिरवाडे, श्रीराम जन्मोत्सव समिती प्रमुख संजय साळुंखे, सागर अतनुरे, श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे सुभाष पवार, पानिवेस तालिम अध्यक्ष पंकज काटकर, अक्षय अजिंखाने यतीराज होनमाने, समर्थ बंडे, हिंदुराष्ट्र सेना आनंद मुसळे, ओमसाई प्रतिष्ठानचे प्रमुख शिवराज गायकवाड, सागर अतनुरे, ओंकार देशमुख, आंबादास गोरंटला, रणधीर स्वामी, अभिजीत जाधव, अर्जुन मोहिते यांची प्रमुख उपस्थिती होती.

या मेळाव्यात राम सातपुते यांना समर्थन देताना हिंदुत्ववादी संघटनांनी, ज्यांनी राम मंदिर बांधले, आम्ही त्यांनाच निवडून आणू, असा निर्धार केला. तर सातपुते यांनी नरेंद्र मोदी यांना पराभूत करण्यासाठी मशिदींमधून फतवे काढले जात असल्याचा पुनरूच्चार करीत, यासंदर्भात आपण स्वतः निवडणूक आयोगाकडे तक्रार करणार असल्याचे सांगितले. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी लतेश हिरवे, अभिजीत जाधव, अभि आडगळे आणि सोलापूर शहर जिल्ह्यातील समस्त हिंदूवादी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी साधला डॉक्टरांबरोबर संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

देशाच्या आरोग्याच्या दृष्टीने मोदी पुन्हा पंतप्रधान होणे आवश्यक आहे. ते खूप प्रामाणिकपणे व दूरदृष्टीने काम करतात. मानव जातीची सेवा करणाऱ्या डॉक्टरांच्या समस्यांचे निराकरण नरेंद्र मोदीच करू शकतात. वैद्यकीय व्यावसायिकांना जास्तीत जास्त मदत करण्याची आपली नेहमीच भूमिका असते शहरातील डॉक्टरांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी सातत्याने आपण प्रयत्न करू. डॉक्टरांवरील हल्ले थांबवण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यासाठी तसेच अन्य समस्या सोडवण्यासाठी या पुढील काळात आपण प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोलापुरातील बैठकीदरम्यान डॉक्टरांना दिली.



सदरची बैठक भाजपाचे युवा नेते श्रीनिवास संगा यांच्या पुढाकाराने घेण्यात आली. या बैठकीस डॉक्टरांनी आपल्या समस्या पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासमोर मांडल्या. यावेळी या बैठकीस मोहन डांगरे, डॉ. रविराज गायकवाड, डॉ. सारडा, डॉ. सचिन बोंगलीकर, डॉ. नितीन बलवान, डॉ. जिद्दीमनी, डॉ. चंदन रवा, डॉ. श्रीनिवास पिंडीपोल, डॉ. सुनील काटे, डॉ. राजेश फडकुले यांच्यासह सोलापूर शहरातील हॉस्पिटलचे डॉक्टर्स उपस्थित होते. यावेळी श्री प्रतिष्ठानचे संस्थापक तथा भाजपा युवा नेते श्रीनिवास संगा यांनी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. डॉक्टरांच्या आणि अडचणी सोडवण्यासाठी राज्य सरकार आणि केंद्र सरकार कटिबद्ध असल्याचे यावेळी श्रीनिवास संगा यांनी सांगितले. अत्यंत खेळीमेळी वातावरणात ही बैठक पार पडली. यावेळी शहरातील डॉक्टर्स संघटनेचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.




## निमा संघटनेकडून मतदानासाठी जनजागृती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

देशाला जर प्रगतीच्या शिखरावर घेऊन जायचं असेल तर प्रत्येक तरुणांनी सामाजिक आणि राजकीय कार्यात सक्रिय सहभागी होणे ही काळाची आणि येणाऱ्या सुशिक्षित पिढीची गरज आहे. मतदारांमध्ये जाणीव व जागृती करणे आवश्यक आहे; भारतीय संविधानाने वयाचे १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या प्रत्येकाला मतदानाचा अधिकार दिला आहे यासाठी प्रत्येक नागरिकांनी मतदान करावे, असे आवाहन वैद्यकीय क्षेत्रातील निमा या डॉक्टर संघटनेच्या वतीने करण्यात आले.

संघटनेचे पदाधिकारी सोलापूर रेल्वे स्थानक परिसरात जनजागृती करीत आहेत. देशाच्या प्रगतीसाठी प्रत्येक मत महत्त्वाचे आहे. नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजावा यासाठी निमा या डॉक्टर संघटनेने पुढाकार घेतला असून, मतदान प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी जनजागृती करीत आहेत. यावेळी भाजपाचे युवा नेते तथा श्री प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रीनिवास संगा यांनी या कार्यक्रमाचा शुभारंभ केला. याप्रसंगी संघटनेचे डॉ. विनायक टेंभुर्णीकर, डॉ. रविराज गायकवाड, सचिन बोंगरलीकर, डॉ. नितीन बलदवा, डॉ. जिड्डीमणी, डॉ. चंदन रवा, डॉ. श्रीनिवास पिंडीपोल, डॉ. सुनील काटे आदी उपस्थित होते. रेल्वे स्थानक परिसरात मतदान जनजागृतीसाठी हातामध्ये फलक घेऊन मतदानाचा हक्क बजावा यासाठी जनजागृती करण्यात आले. यानंतर डॉ. नितीन बलदवा यांनीही मार्गदर्शन केले.

## वडार समाजाचा प्रणिती शिंदेंच्या पाठीशी राहण्याचा संकल्प

**समाजातील प्रमुख पंच, माजी नगरसेवक, प्रतिष्ठित बांधवांकडून घोषणा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

वडार समाज हा परंपरागत काँग्रेस पक्षाच्या पाठीशी भक्कमपणे उभा असलेला समाज असून काँग्रेसने देखील यापूर्वी १७ नगरसेवक देऊन वडार समाजाला न्याय दिला आहे असे सांगत सोलापूर शहरातील विविध भागातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांनी महाविकास आघाडी व काँग्रेसच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांना पत्रकार परिषदेत पाठिंबा जाहीर केला.



सहा वर्षांपूर्वी वडार समाजाच्या मेळाव्यात राज्याच्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वडार समाजाच्या विविध मागण्या संदर्भात काम करू असे आश्वासन दिले होते. प्रत्यक्षात समाजाच्या पदरी निराशा आली. सोलापूर जिल्ह्यात वडार समाज बांधवांच्या न्याय व हक्कासाठी काम करणाऱ्या संघटना आणि पदाधिकाऱ्यांची एक बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत सर्व पदाधिकाऱ्यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवार, काँग्रेसच्या प्रदेश कार्याध्यक्ष आमदार प्रणिती शिंदे यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रतिनिधी सुशील बंदपट्टे यांनी सांगितले.

आ. प्रणिती यांनी आजवर वडार समाज बांधवांच्या न्याय व हक्काच्या मागण्यांचा पाठपुरावा केला आहे. शासन दरबारी समाज बांधवांचे दगड खाणींचे विषय असो रॉयल्टी चे विषय असो. यातील शासन दरबारी निर्माण करण्यात आलेल्या अडचणी दूर करण्याचे काम आमदार प्रणिती यांच्या माध्यमातूनच झाले आहे. त्यामुळे समस्त समाज बांधवांनी आमदार प्रणिती यांचा सोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे.

भाजप सोबत जाऊन समाजाची घोर फसवणूक होणार आहे. प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम आमदार प्रणिती यांच्या माध्यमातून होईल, असा ठाम विश्वास श्री. बंदपट्टे यांनी व्यक्त केला.

या पत्रकार परिषदेस संघटनेचे अध्यक्ष मुकुंद पवार, माजी नगरसेवक दत्तू बंदपट्टे, शंकर चौगुले, माजी नगरसेविका महादेवी अलकुंटे, मनोहर मुधोळकर, विष्णू मुधोळकर, गजेंद्र निंबाळकर, भारत निंबाळकर, परशुराम आनंदकर, सिद्धू आनंदकर, तम्मा भरले, भीमराव धोत्रे, राजू कलकेरी, सुरेश धोत्रे महाराज, अशोक यामपुरे, रवी अलकुंटे, दत्ता विटकर, प्रदीप भरले, हेमंतकुमार निंबोळे, अंजलीताई मंगोडेकर, दत्तू अलकुंटे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

## सोशल मिडीयावर मिम्स व्हायरल; राज सलगरवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ मे-**

सोशल मिडीयावर मिम्स व्हायरल करून भाजपा महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांची जनमानसात प्रतिमा मलीन केल्याप्रकरणी काँग्रेस कार्यकर्ते राज सलगर यांच्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



भाजपाचे कार्यकर्ते समर्थ रविंद्र बंडे (वय ३२, रा. सिध्देश्वर पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सलगर यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यांनी फेसबुक या सोशल मिडीयावर २५ मार्च ते २४ एप्रिल २०२४ या कालावधीत भाजपा महायुतीचे आ. राम सातपुते यांच्याविषयी मिम्स व्हायरल करून बदनामी केल्याप्रकारणी काँग्रेस कार्यकर्ते राज सलगर यांच्यावर फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## मराठा बांधवांनी आ. सातपुते यांना मताधिक्याने निवडून द्यावे

**पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष पाटील यांचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

महायुती सरकारने सर्व समाज घटकांचे प्रश्न सोडवून खऱ्या अर्थाने न्याय दिला. मराठा समाजाला आरक्षण देण्याचा शब्द काही प्रमाणात पूर्ण केला आहे. ज्यांनी काम केले त्यांना साथ देणे गरजेचे आहे. त्यामुळे मराठा समाजाने सोलापुरातील महायुती अंतर्गत भाजपाचे उमेदवार आ. राम सातपुते यांना प्रचंड मताधिक्याने निवडून द्यावे, असे आवाहन अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे



अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी पत्रकार परिषदेत केले.

महायुतीतील मराठा पदाधिकारी, नेत्यांनी घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत आपली भूमिका मांडली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार हे तीनही नेते सर्व जाती धर्मातील समाज घटकांना न्याय देतात. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी दिलेला शब्द काही प्रमाणात पूर्ण केलेला आहे. कुणबी प्रमाणपत्र कमी वेळात शोधून काढले. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने कर्जपुरवठा झाल्याने ८० हजार मराठा उद्योजक आज कार्यरत आहेत. सारथी संस्थेची स्थापना केली. त्यामुळे आम्ही महायुतीच्या उमेदवाराला विजयी करण्यासाठी, त्यांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणण्यासाठी प्रचार करीत आहोत. असे आवाहन यावेळी अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केले. या पत्रकार परिषदेत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, शिवसेनेचे समन्वयक दिलीप कोल्हे, तुकाराम मस्के, भाजपचे जिल्हा कोषाध्यक्ष इंद्रजीत पवार, माजी नगरसेवक अनंत जाधव, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष संतोष पवार, युवक अध्यक्ष सुहास कदम, रयत क्रांतीचे नामदेवराव पवार आदी उपस्थित होते.

## सराईत गुन्हेगार अजय जाधव येरवड्यात स्थानबध्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

सोलापूर शहरातील सात रस्ता परिसरातील शामा नगर झोपडपट्टीतील सराईत गुन्हेगार अजय जाधव यास एमपीडीएअंतर्गत कारागृहात स्थानबध्द करण्याचे आदेश पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी दिले आहेत. त्यानुसार सदर बझार पोलिसांचे एक पथक जाधव यास घेऊन येरवडा कारागृहाकडे रवाना झाले आहे.

अजय रघुनाथ जाधव (वय ४०, रा. शामा नगर झोपडपट्टी, सोलापूर) असे येरवड्यात स्थानबध्द करण्यात आलेल्या सराईत गुन्हेगाराचे नाव आहे. जाधव याच्याविरुध्द गंभीर स्वरूपाचे ४ गुन्हे दाखल आहेत.

अजय जाधव याच्याविरुध्द मागील काही वर्षापासून सातत्याने घातक शस्त्राचा वापर करून



बेकायदेशीर जमाव जमविणे, दगडफेक करणे, खंडणी मागणे, जबरी चोरी, घातक शस्त्राने दुखापत करणे, खुनाचा प्रयत्न करणे, धमकी देणे अशास्वरूपाचे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्याच्या या गुन्हेगारी कृत्यामुळे शहरातील नागरीकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होऊन कायदा व सुव्यवस्थेस बाधा निर्माण झाली आहे.

अजय जाधव यास त्याच्या गुन्हेगारी कारवायापासून परावृत्त करण्यासाठी सन २०२१ आणि सन २०२४ मध्ये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आल्या आहेत. तरीही त्याच्या वर्तनात कोणताच बदल झाला नाही आणि त्याने गुन्हेगारी कृत्ये चालू ठेवली. त्यामुळे जाधव यास एमपीडीएअंतर्गत कारगृहात स्थानबध्द करण्याबाबतचा प्रस्ताव सदर बझार पोलिसांकडून पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यास पोलिस आयुक्तांनी मंजुरी देत जाधव यास येरवडा कारागृहात स्थानबध्द करण्याचे आदेश दिले. ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ. दिपाली काळे, विजय कबाडे, सहायक आयुक्त प्रांजली सोनवणे, अजय परमार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे, अजित लकडे, पोलिस उपनिरीक्षक विशेद्रसिंग बायस, एमपीडीए पथकातील कर्मचारी विनायक संगमवार, सुदीप शिंदे, अक्षय जाधव, विशाल नवले यांनी केली.

## अरबळीत चोरट्यांच्या मारहाणीत वृध्द महिलेचा मृत्यू

**कामती पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

अरबळी (ता.मोहोळ) येथे चोरी करण्याच्या उद्देशाने चोरट्यांनी हत्यारांनी मारहाण करून वृध्द महिलेचा खून केल्याची घटना उघडकीस आली असून याबाबत कामती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सहायक पोलिस निरीक्षक उदार पुढील तपास करीत आहेत.

सिंधुबाई हरिबा घाडगे (वय ७४, रा. अरबळी, ता. मोहोळ) असे खून झालेल्या वृध्द महिलेचे नाव आहे. याबाबत मयत सिंधुबाई यांचे जावई परमेश्वर तुकाराम कलुबर्मे (वय ४५, रा. माचणूर, ता. मंगळवेढा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात आरोपीविरुध्द कामती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अरबळी येथील शेतजमीन गट नं. २२/२ मध्ये असणाऱ्या पत्र्याच्या घरामध्ये परमेश्वर कलुबर्मे यांच्या सासू सिंधुबाई घाडगे या राहात होत्या. २९ एप्रिलच्या रात्री अज्ञात चोरट्याने चोरी करण्याच्या उद्देशाने सिंधुबाई घाडगे यांच्या घरात घुसून कोणत्या तरी हत्याराने जबर मारहाण करून सिंधुबाई यांच्या गळ्यातील सोन्याची व काळ्या मण्याची ५ हजार रुपये किंमतीची माळ आणि २ हजार रुपये किंमतीची कानातील फुले असा ७ हजार रुपयांचा ऐवज जबरदस्तीने चोरून नेला. चोरट्यांनी केलेल्या मारहाणीत सिंधुबाई घाडगे या गंभीर जखमी होऊन मृत झाल्या.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### अजय पोन्नम यांना डॉक्टरेट पदवी प्रदान

**सोलापूर, दि. ३ मे-**
पूर्व भागातील अरिहंत इंग्लिश मीडियम स्कूलचे अध्यक्ष अजय पोन्नम यांना वॉशिंग्टन विद्यापीठाकडून शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल नुकतीच डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. अजय पोन्नम हे इंडिपेंडेंट इंग्लिश स्कूल असोसिएशनचे सोलापूरचे जिल्हाध्यक्ष तसेच महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. गेल्या २० ते २५ वर्षापासूनचे त्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान तसेच सामाजिक उपक्रमातील त्यांच्या सहभागाबद्दल त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून वॉशिंग्टन विद्यापीठाकडून शिक्षण क्षेत्रातील मानाची डॉक्टरेट पदवी प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला. १ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून अरिहंत परिवारातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच अध्यक्षांच्या हस्ते ध्वजही फडकवण्यात आला. याप्रसंगी संस्थेच्या संचालिका सुलक्षणा पोन्नम, पर्यवेक्षिका तस्नीम शेख, चन्नेश इंडी, शीतल रजपूत, ज्योती आडम यांनी त्यांचे अभिनंदन केले.




### महापालिका शाळेत कामगार पाल्यांचा गौरव

**सोलापूर, दि.३ मे-**
मनपा पांढरेवस्ती शाळेत महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या निमित्ताने कामगार असणाऱ्या पालकांचा गुणगौरव गुलाब रोपे देऊन करण्यात आले. शिक्षणाधिकारी यांच्या परिपत्रकान्वये आज महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त कामगारांचे सत्कार करून त्यांना मतदानाविषयी व मतदान करण्याविषयी जागृती करण्याचे आवाहन केले आहे. त्यासंदर्भानुसार मनपा पांढरेवस्ती शाळेत कामगार पालकांना गुलाबाची रोपे देऊन सत्कार करण्यात आला. त्यांना मतदानाचे महत्त्व सांगून मतदान करण्याविषयी जनजागृती करण्यात आली. यावेळी नारायण रणदिवे (ऊसतोड कामगार) राजू सकट (बांधकाम कामगार) अभिमान नामदास (कामगार) महादेव हेगडे (कामगार )परसराम गवळी (मेकॅनिक) आदी कामगार पालकांचा गौरव करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अमोल भोसले यांनी आजच्या दिनाचे महत्त्व सांगून सर्व पालकांना गुलाब रोपे जगवण्यासाठी जशी पाण्याची गरज असते तसेच आपली लोकशाहीसाठी मतदानाची गरज असते तरी सर्वांनी दि. ७ मे रोजी मतदान करण्याचे आवाहन केले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी अमोल भोसले, किरण शेळगे,श्रीदेवी गौडगावे, आफरीन शेख आदींनी परिश्रम घेतले.




### राधाकिशन फोमरा मूकबधीर विद्यालयात महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजवंदन

**सोलापूर, दि. ३ मे-**
येथील रोटरी नॉर्थ राधाकिशन फोमरा मूकबधिर विद्यालयात रोटरीचे नवनियुक्त डिस्ट्रिक्ट गव्हर्नर उद्योगपती जयेश पटेल यांच्या हस्ते १ मे महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने ध्वजवंदन करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे यांनी केले. रोटरीच्या गव्हर्नरपदी निवड झाल्याबद्दल राजगोपाल झंवर यांनी त्यांचा सत्कार केला. तसेच शाळेतील कलाशिक्षक सैपन बागवान यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना जयेश पटेल यांनी रोटरी नॉर्थ या सेवाभावी कार्याची दमदार अर्धशतकीय वाटचाल असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. सलग ५० वर्षे दिव्यांग शाळेचे पालकत्व स्वीकारून उत्तमप्रकारे कामकाज या संस्थेचे पदाधिकारी आणि शाळेचे कर्मचारी करीत आहेत असल्याचे सांगितले. याप्रसंगी शाळेचे सचिव सुनील दावडा, डॉ. वैद्य, राजगोपाल झंवर, बळीराम पावडे, सुधीर क्षीरसागर, रेणुका पसपुलें, संध्या चंदनशिवे, विजया पिटाळकर, गजानन गडगे, नागनाथ बसाटे, सोमनाथ ठाकर, दिनेश ताटे, गंगाधर मदभावी, अजित पाटील, आनंद पारेकर, विठ्ठल सातपुते, चिदानंद बेनुरे, सैपन बागवान, साहेबगौडा पाटील, सोमनाथ थोरात, बाबासाहेब पवार उपस्थित होते. सूत्रसंचालन गंगाधर मदभावी यांनी केले तर आभार सहसचिव डॉ. सुनील वैद्य यांनी मानले.

### एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळेत महाराष्ट्र व कामगार दिन साजरा

**सोलापूर, दि.३ मे-**
एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळेमध्ये महाराष्ट्र दिन व कामगार दिन कार्यक्रमाचे अध्यक्ष रामचंद्र कुलकर्णी व प्रमुख पाहुणे नॅब संस्थेचे आजीव सभासद अंबादास शिंगाडे र होते. मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. श्री.कुलकर्णी यांच्या हस्ते पुष्पुच्छ देवून प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतात महाराष्ट्राचे गौरव, संस्कृती महाराष्ट्राचा देशाच्या विकासातील वाटा याविषयी सांगितले. कार्यक्रमास रियाज मुल्ला, श्रीनिवास समदुर्ले, संजयकुमार कलाल, ग्यानम्मा म्हेत्रे, भागिरथी नाईकवाडे, शुभम वांझरे व संदेश कांबळे यांची उपस्थिती होती.

# मतदार जागृतीसाठी शहरात 'रन फॉर वोट'

## शिक्षण विभागातील अधिकारी, महापालिका शिक्षकांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**
मतदाराने मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे. मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी स्वीप कार्यक्रमांतर्गत शहरात विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. एक भाग म्हणून शहरातील सात रस्ता परिसरात 'रन फॉर वोट' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.




मनपा कॅम्प शाळा समूह पासून शहरात कार्यरत असणाऱ्या सर्व शाळांमधील शिक्षकांना रन फॉर वोट या उपक्रमा सहभाग होण्याचे आवाहन करण्यात आले होते. या अंतर्गत जवळपास एक हजाराहून अधिक शिक्षकाने या सहभाग घेतला. मतदार जनजागृती विषयी घोषवाक्य म्हणत या रॅलीत सहभाग घेतला. परिसरातील लोकांना मतदान करण्याचे आवाहन केले. सोलापूर लोकसभा मतदारसंघातील मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे, तहसीलदार निलेश पाटील, नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्या नेतृत्वाखाली मार्गदर्शनाखाली शहरातील विविध भागात उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शिक्षणाधिकारी तथा नोडल अधिकारी कादर शेख हे स्वतः या रॅली मध्ये धावण्यासाठी पुढे होते. त्यांच्याबरोबर शिक्षण विभागातील सर्व कर्मचारी विस्तार अधिकारी पर्यवेक्षक शिक्षक हे सहभागी झाले होते. सहभागी शिक्षकांना मतदार जनजागृतीची प्रतिज्ञा देण्यात आली. यावेळी प्रशासनाधिकारी संजय जावीर, विस्ताराधिकारी गोदावरी राठोड, विस्ताराधिकारी स्वाती स्वामी, पर्यवेक्षक मनीष बांगर, संतोष बुलबुले, सुरेश कासार, भगवान मुंडे, रजनी राऊळ, निलोफर सय्यद यांची प्रमुख उपस्थिती होती. रॅली यशस्वी करण्यासाठी स्वीप सदस्य अमोल भोसले, शहाबाद काझी, प्रकाश राशेट्टी, अनिल थोरबोले, आनंद सामल, अनिल शिरोळे, रजाक बेद्रेकर, मल्लिनाथ हिरेमठ यांनी परिश्रम घेतले.

### एप्रिल महिन्यात

# रेल्वे विभागाला ४२ कोटी ४५ लाखांचे उत्पन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**
मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातीला एप्रिल महिन्यात सिमेंट व साखरेच्या वाहतूकीतून ४२ कोटी ४५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे.

वाणिज्य विभागाने एप्रिलमध्ये सिमेंटचे ११७ रेक लोड केले गेले. त्यातून २३.९६ कोटी रुपये महसूल मिळाला. गतवर्षी एप्रिल २०२३च्या १५१ रेकच्या २१.४३ कोटी महसूल तुलनेत हा महसूल ११.७९ टक्के ने अधिक आहे. साखरेचे १७ रेक लोड करून त्यातून १२.४९ कोटी महसूल मिळवला. गतवर्षी एप्रिल २०२३ मध्ये साखरेचे १४ रेक लोड करून ८.६२ कोटी इतका महसूल मिळवला होता. गतवर्षीच्या एप्रिल २०२३ च्या तुलनेत एप्रिल २०२४ चा महसूल ४४.८८ टक्के अधिक आहे.

एप्रिलच्या महिन्यात १.०१ कोटी महसूल मिळवून डीओसी चे ४ रेक लोड केले गेले. एप्रिल २०२४ मध्ये ४.७६ कोटी महसूल मिळवून क्लिंकरचे २० रेक लोड केले गेले. तिलाटी गुड्स शेड मधून एप्रिल-२०२४ महिन्यात साखरेचा पहिला रेक लोड करण्यात आला आणि त्यातून ८६ लाखाचे रुपयांचे उत्पन्न मिळाले. सोलापूर विभागाचा खानपान महसूल २८.०१ लाख आहे जो मागील वर्षीच्या याच महिन्यात कमावलेल्या २.२१ लाखाची वाढ दर्शवितो. सोलापूर विभागाने पार्किंग महसूलातून १६.८४ लाख रुपये मिळाले आहेत जो मागील वर्षीच्या याच महिन्यात मिळालेल्या ७.७८ लाखाची वाढ दर्शवितो.

# सर्वांगीण विकासासाठी आ. प्रणिती शिंदेंना मतदान करा

### माजी उपमहापौर नानासाहेब काळे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मे-**
सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी, रोजगार, दररोज पाणी आणि धर्मांध शक्तीला रोखण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार प्रणिती शिंदे यांना मतदान करावे, असे आवाहन माजी उपमहापोर पद्माकर काळे यांनी केले.



सोलापूर लोकसभेच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांची कॉर्नर सभा पत्रा तालीम येथे पार पडली. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे कार्याध्यक्ष नानासाहेब काळे आणि महेश गादेकर यांच्या वतीने सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पत्रा तालीम प्रमुख घाडगे गुरुजी, राजाराम दुधाळ, राष्ट्रवादी नेते महेश कोठे, शहराध्यक्ष सुधीर खरटमल, काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे, माजी महापौर नलिनी चंदेले, युएन बेरिया, राष्ट्रवादीचे शंकर पाटील, भारत जाधव, महादेव गवळी, चंद्रकांत पवार, जावेद खैरदी, शिवसेना नेते लहू गायकवाड, माजी नगरसेवक विनोद भोसले, प्रतीक्षा चव्हाण, मनीषा माने, नेताजी घेरडे, गणेश डोंगरे, राष्ट्रवादी युवक अध्यक्ष अक्षय वाकसे अंबादास करगुळे, मोनिका सरकार, राष्ट्रवादी विद्यार्थी संघटना शहराध्यक्ष निशांत सावळे यांच्यसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी पत्रा तालीमच्या वतीने प्रणिती शिंदे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना महेश कोठे म्हणाले, भाजपाने सोलापूरचे दोन दिवसाआडचे पाणी आज सात दिवसाआड करून ठेवले आहे. धर्मांध शक्तीला रोखण्यासाठी आणि सोलापूरचा सर्वांगीण विकास करण्यासाठी महाविकास आघाडीला मतदान करण्याचे आवाहन आमदार प्रणिती शिंदे यांनी केले.

सभा यशस्वी करण्यासाठी पत्रा तालीम युवक मंडळाचे बाबुभाई बनसोडे, पिंटू चव्हाण, पेजर चव्हाण, विजय कांबळे, प्रवीण इरकशेट्टी, बडू दुधाळ, अंकुश वाघमारे, सुरज पाटील, अर्जुन सोनवणे, अनिकेत बनसोडे यांच्यासह पत्रा तालीम युवक मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.यावेळी महाविकास आघाडीतील कार्यकर्त्यांसह पत्रा तालीम परिसरातील नागरिकांची मोठी गर्दी होती.



## जय भारत शाळेत महाराष्ट्र व कामगार दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**
महाराष्ट्र दिनानिमित्त जय भारत प्राथमिक शाळेत, महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे लेखाधिकारी वैभव राऊत होते. प्रमुख पाहुणे सिद्राम फुले, श्री. मुलाणी, श्री. सगरी, चंद्रकांत साबळे, दिपक फुले, नारायण सुर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला. त्यावेळी राष्ट्रगीत, ध्वजगीत आणि राज्यगीन झाले. प्रास्ताविक रेश्मा म्हेत्रे यांनी केले. सूत्रसंचालन किरण गाटे यांनी केले. कविता लेंगरे यांनी आभार मानले.

## 'तेलुगू भाषिकाबरोबरच वंचितांना शिक्षण मिळावे हाच ध्यास'




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**
पद्मशाली समाजातील मुला मुलींबरोबर वंचित व बहुजन समाजातील सर्वांना शिक्षण मिळावे या हेतूने पद्मशाली शिक्षण संस्था कार्य करत आहे. येणाऱ्या काळात नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण क्षेत्रात जे बदल होणार आहेत त्यास सामोरे जाण्यासाठी आम्ही सक्षम आहोत, असे प्रतिपादन उद्घाटक पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप यांनी केले.

ए.आर.बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात बी.सी.ए.विभागाकडून स्किल्स युवर नीड; या उपक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.श्रीनिवास कोंडी होते. व्यासपीठावर प्रभारी प्राचार्य डॉ. टी. एन. शिंदे, विश्वस्त श्रीधर चिट्याल, विजयकुमार गुल्लापल्ली आणि रमेश बोध्दुल उपस्थित होते.

उपक्रमामध्ये रोहन कुर्री आणि प्रा. पंकज अंदे हे प्रशिक्षण देणार आहेत. प्रास्ताविक प्र. प्राचार्य डॉ.टी.एन.शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. गायत्री बेनगिरी यांनी केले. उपस्थितीतांचे आभार प्रा. विद्या बिर्रु यांनी मानले.

## गणेश नगरात सव्वा लाखांची घरफोडी




**सोलापूर, दि. ३ मे-**
शहरातील मुळेगाव रोडवरील गणेश नगरात चोरट्याने घरफोडी करून सव्वा लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याबाबत महेश भास्कर इंगळे (वय ३५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ मे रोजी रात्री चोरट्याने इंगळे यांच्या घराबाहेर असलेल्या जिन्यावरून इंगळे यांच्या घरात प्रवेश करून घरातील कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने व मोबाईल असा १ लाख १५ हजार ८९९ रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

# गुणवंत कामगार पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**
महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे गुणवंत कामगार पुरस्कार वितरण कार्यक्रम पार पडला.

क्रांतीवीर लहुजी शक्ती सेनेच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक येथे हा कार्यक्रम पार पडला. महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत, उपायुक्त आशिष लोकरे यांच्या हस्ते कर्मचाऱ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुरेश पाटोळे , जिल्हाध्यक्ष किसन पाटोळे, माजी पक्षनेते देवेंद्र भंडारे, विठ्ठल व्हनमारे , मातंग समाज अध्यक्ष लष्कर भिमराव दाजी गायकवाड, बापु गायकवाड, हरिबा कांबळे ,किशोर जाधव, रोहित खिलारे, रोहित कांबळे, एड.विक्रम कसबे, विश्वेश्वर गायकवाड, प्रविण वाडे ,जावेद शिकलकर, ओंकार पाटोळे, शक्ती कटकधोंड आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. विशेष कार्याबद्दल सरकारी वकील प्रदिपसिंग राजपुत यांचा सत्कार करण्यात आला.



### हे आहेत पुरस्काराचे मानकरी

अरुण म्हेत्रे (कर आकारणी विभाग महापालिका), रामचंद्र चंदनशिवे (स्वच्छता दूत), सुनील शिंदे (स्वच्छता दूत), रेशमा तलकदार( परिचारिका), शंतनु गायकवाड( नाईक,जिल्हा परिषद), नागनाथ जाधव (मजूर), भारत गायकवाड, (शिपाई कर विभाग),राजू डोलारे(मजूर).

# निकष डावलल्याने रोपांची हेळसांड; वृक्ष लागवडीचा बोजवारा


**तभा वृत्तसेवा। सहयोग प्र.जावळे**
**कन्नड, दि.३ मे -**
राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व वृक्ष लागवड करणारे खासगी कंत्राटदार यांच्या मिलीभगत मुळे धुळे सोलापूर महामार्गालगत वृक्ष लागवडीचा बोजवारा उडाला आहे. कन्नड परिसरात या महामार्गालगत वृक्षांचा वैभवशाली इतिहास पुसला गेला.आणि आता लावलेले रोपांची निकषांनुसार काळजी न घेतल्याने, कागदावरील देखरेखी मुळे पुन्हा या रस्त्याला जुने वैभव प्राप्त होणे अशक्य वाटते.


भाग ४
सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग झाला ओसाड

तेलवडी ते कारोडी दरम्यान ५५ किलोमिटर अंतरात या महामार्गावर मध्यभागी व दुतर्फा ५८ हजार रोपे लावण्यात आली.सदर कंत्राट तब्बल दोन कोटी रुपयांचा आहे.

निकषांनुसार लागवड करतांना रोपांची उंची दोन मीटर अर्थात सुमारे साडेसहा फूट असायला हवी.म्हणजे सुमारे तीन वर्षांपूर्वी रस्त्याच्या दुतर्फा लागवड केलेले रोपांची उंची आता १५ ते २० फूट असायला हवी होती,मात्र प्रत्यक्षात हे झाडे अजूनही जमिनीवर रेंगळतांना दिसतात.रस्त्याच्या मधले व दुतर्फा सुमारे पन्नास टक्के झाडे गायब झालेले आहेत. अर्थात कंत्राट संपेपर्यंत बाद रोपे लावणे कंत्राटदाराला अनिवार्य आहे.मात्र बाद रोपे लावल्याचे प्रत्यक्षात दिसत नाही.महामार्ग प्राधिकरणाच्या म्हणण्यानुसार त्यांच्याकडे बॅकअप प्लॅन आहे,त्यानुसार बाद झाडे लावण्यासाठी त्यांच्या नर्सरित हजार ते दोन हजार झाडे आहेत,पण मग अजूनही बाद झाडे का दिसून येतात, व तेही इतक्या मोठ्या संख्येने,हा मुख्य प्रश्न आहे.





### सुरक्षा जाळी नाही:

इंडियन रोड काँग्रेस यांनी दिलेल्या निकषांमध्ये रस्त्याच्या दुतर्फा झाडांना सुरक्षा जाळी बसविण्याचे सांगितले आहे.मात्र या महामार्गावरील दुतर्फा झाडांना एकाही ठिकाणी सुरक्षा जाळी, ट्री गार्ड बसवलेले नाही. करोडी ते तेलवाडीच्या पुढे चाळीसगाव धुळे कडे नुकताच बांधकाम सुरू झालेल्या रस्त्यालगत दुतर्फा लावलेल्या प्रत्येक झाडांना प्लास्टिक सुरक्षा जाळी लावण्यात आली आहे.मग एकच महामार्गावर दोन ठिकाणी वेगवेगळे नियम का? याही भागात सुरक्षा जाळी बसवणे आवश्यक आहे.

### कागदावरील देखरेख:

निकषांनुसार झाडांच्या लागवडी वेळी खड्ड्यात काळी माती,कंपोस्ट खत,शेण खत टाकण्याची तरतूद आहे.मात्र सदर रोपे लावताना काळी माती,खते टाकतांना दिसून आले नसल्याचे परिसरातील शेतकऱ्यांनी सांगितले आहे.पावसाळ्यात रस्त्याच्या मध्ये असलेले शोभिवंत झाडांच्या वर पर्यंत गवत वाढलेले असते,वेळेवर या शोभिवंत झाडांची कटिंग न केल्याने त्यांच्या फांद्या रस्त्यावर येवून अपघाताचा धोका वाढतो.उन्हाळ्यात वेळोवेळी पाणी पुरवठा न केल्याने निम्म्यापेक्षा जास्त झाडे जळून गेले आहेत. निकषांनुसार देखरेख केली असती तर या महामार्गाला जुने वैभव नक्कीच प्राप्त झाले असते.सध्याच्या झाडांची परिस्थितीवरून सदर देखरेख कागदोपत्री असल्याचे दिसून येते.

> झाडांना संरक्षण जाळ्या लावण्यात आलेल्या होत्या पण काही जाळ्या चोरी झाल्या,सर्व झाडांना मुबलक पाणी देण्यात येत आहे,झाडे संगोपनसाठी आम्ही शक्य तेवढ्या बाबींचा विचार करून काम करत आहोत
> **- रवींद्र इंगोले, प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभाग**

या परिसरात रोपे लागवड पासून आज पर्यंत त्या परिसरातील प्रत्यक्षदर्शी शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया व सविस्तर माहिती पुढील लेखात

**क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी- ७६१

**ऐसा असोनि अनुभव ।**
**कासावीस होती जीव ।।**

जन्मत: माणूस सारखाच असला तरीही त्याच्या वर्तनाने तो पुढे चालून इतरांपेक्षा भिन्नत्व मिळवतो. हे भिन्नत्व चांगले मिळवायचे की वाईट हे ज्याचे त्याचेवर अवलंबून असते. प्रत्येकाला आपण चांगले व्हावे असे वाटत असले तरीही प्रसंगानुरुप किंवा स्वभावानुरुप कांही लोक वाईट मार्गावर जातात. वाईट मार्गावर गेल्यानंतर वाईटच घडणार असते. त्याचप्रमाणे चांगल्या मार्गाचा अवलंब केला तर चांगलीच निर्मिती होत असते. हे सत्य असले तरीही कांही लोक स्वार्थापोटी किंवा विषयांच्या पूर्तीसाठी म्हणजेच इंद्रियांचे लळे पुरविण्यासाठी चुकीच्या मार्गावर जातात. वाईट मार्गावर गेल्यानंतर समाजाकडून आपली छीथू होईल याची जाणीव असतांनाही लोक असे मार्ग पत्करतात आणि परिणामी स्वत:च्या नजरेतून उतरण्याची म्हणजे स्वत:ला क्लेश करून घेण्याची वेळ अशांवर येते. वाईट कृत्याचे वाईट अनुभव येऊनही लोक वाईट मार्गावर जाऊन स्वत:ला किंवा स्वत:च्या जीवाला प्रसंगानुरूप का होईना पण कासावीस करून घेतात. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**ऐसा असोनि अनुभव । कासावीस होती जीव ।।**

विषय हे मनवांसाठीच असले तरीही विषयाधीन होणे हे मानवाच्या दृष्टीकोनातून योग्य नसते. नीतीनियमपूर्वक इंद्रिय आणि विषयाची जोड घातल्यास ते बाधक ठरत नाहीत. पण निती नियमबाह्य इंद्रिय आणि विषय यांची सांगड घालणे बाधक ठरते. अनेकांना अशा बाधकत्वाचा अनुभव येऊनही कांही लोक त्याच मार्गाची पुनरावृत्ती करतात. त्यांची ही पुनरावृत्ती किंवा अशा लोकांकडे पाहून त्यांच्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करणाऱ्यांची वृत्ती त्यांच्यासाठीही बाधक ठरते आणि समाजालाही घातक असते. सर्व गोष्टींचा, कृतीचा प्रत्येकांनी अनुभवच घ्यावा असे नसते. कारण मूळात जे वाईट असते त्याचा परिणाम हा वाईटच असतो. विद्युत तारेला हात लावला किंवा विष प्राशन केले तर मृत्यू येतो, हे निश्चित असतांना त्याचा अनुभव घेण्याचा प्रयत्न करणे म्हणजे मूर्खता होईल. त्याप्रमाणे चुकीच्या मार्गाने इंद्रियांचे लळे पुरविणे किंवा विषयाधिन होणे चुकीचे ठरेल. बाहेरख्याली होण्यामुळे एड्स सारखा रोग उद्भवू शकतो किंवा बाहेरख्याली होणाऱ्याला एड्स होतो. हे अनेकांच्या अनुभवातून सिध्द झाल्याची उदाहरणे डोळ्यासमोर असतांनाही एड्स रुग्णांची संख्या आजही कमी अधिक प्रमाणात दिसून येत आहेच. अर्थात, अनेक जीव एडसने कासावीस होत आहेत. एड्ससारखे अनेक वाईट अनुभव समाजात अनेक लोक अद्यापही घेत आहेत, याचे आश्चर्य वाटते. ज्ञानोबा-तुकोबांच्या मार्गावर चालणाऱ्यांना एड्ससारख्या बाधेचेच काय कसल्याही बाधेचे भय असण्याचे कारण नसावे. कारण संतांचा मार्ग आनंददायीच असतो.

**जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - |
| दि. ४ मे २०२४ | वरुथिनी एकादशी |
| विक्रम संवत् २०८०, | ....राहू काल.... |
| शके - १९४६ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| मास - चैत्र | मंगळवार : दु. ३ ते ४.३० |
| कृ. एकादशी (२०.३९) | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| ऋतु - वसंत | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| नक्षत्र- पू. भाद्रपदा (२२.०७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| योग - ऐंद्र (११.०२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| करण - बव (१०.०३) | |

### राशीभविष्य

**मेष** : कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील.

**वृषभ** : नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. आत्मविश्वासाने संकटाला सामोरे गेल्याने जीवनातील संकट टळेल.

**मिथुन** : तणावमुक्त होऊन कार्य करा. जीवनात नवीन संधी निर्माण होईल. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क** : विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल.

**कन्या** : जिवनात यश मिळेल. आज आनंदी दिवस जाईल. लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल.

**तुळ** : परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. आर्थिक आवक वाढेल.

**धनु** : आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. विरोधकांपासून सावध रहा.

**मकर** : मुलांना आनंद मिळेल. खर्चाचे योग आहेत. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडण्याची शक्यता आहे.

**कुंभ** : नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. सामाजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन** : कौटुंबिक सहकार्य कमी प्रमाणात मिळेल. जीवनात नवीन संधी मिळाल्याने यश प्राप्त होईल. कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या.

# फडणवीसांनी शब्द पाळला; 'विठ्ठल'ची जप्ती टळली

## साखर गोडाऊन उघडले; राज्य शासन, राज्य बँकेकडून सकारात्मक प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ मे-**

पंढरपूर तालुक्यातील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याने कर्जाची परतफेड न केल्यामुळे शिखर बँकेने थकित कर्जप्रकरणी कारवाई करत कारखान्याची तीन गोडाऊन बँकेने सील केले होते. कारखान्यावरील बँकेने जप्तीची कारवाई केल्यानंतर चेअरमन अभिजित पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत मदत करण्याची विनंती केली होती. त्यावेळी फडणवीस यांनीही शेतकऱ्याचे हित डोळ्यासमोर ठेवून निश्चितच मदत करण्याचा शब्द दिला होता. त्यांनी तो शब्द पाळला असून, जप्ती टळली आहे.

कारखान्याच्या मागील जुन्या संचालक मंडळाच्या काळातील थकीत कर्जाच्या वसुली कामी सरफेसी कायद्यांतर्गत जप्तीची नोटीस बजावण्यात आली होती. या जप्तीच्या विरोधात कारखान्याच्या विद्यमान संचालक मंडळाने पुण्यातील डीआरटी न्यायालयात अर्ज दाखल केला होता. न्यायालयात या अर्जावर सुनावणी होऊन जप्तीला न्यायालयाने तूर्तास स्थगिती दिली. मात्र न्यायालयातून स्थगिती मिळाल्याने कारखान्यावर अवलंबून असलेल्या प्रत्येक कुटुंबाला दिलासा मिळाला आहे.




पंढरपूर तालुक्यातील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची मागणी जुन्या संचालक मंडळाच्या कार्यकाळातील ४४२ कोटी रूपयांच्या थकित कर्ज प्रकरणी साखर कारखान्याची तीन गोदामे सील केली होती. त्यामध्ये सुमारे १४ हजार क्विंटल साखर गोदामात अडकून पडली होती. ही कारवाई बेकायदा आणि लहरीपणाची असल्याची टिप्पणी करत कारखान्याची गोदामे सीलमुक्त करून पाच मेपर्यंत त्यांचा ताबा पुन्हा कारखान्याकडे देण्याचे आदेश पुण्याच्या कर्ज वसुली लवादाने दिला आहे. त्यामुळे सभासद शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त केले जात आहे तर संचालक मंडळाने राज्य शासन व राज्य बँकेने सकारात्मक प्रतिसाद दिल्याने आभार मानले आहेत.



कारखान्याच्या जुन्या संचालक मंडळाने कर्ज थकवले होते. २०२१ पासून कारवाई सुरु होती. शासनाने आम्हाला मदत केल्यामुळे बँकेने कोर्टात सकारात्मक भूमिका घेतली. त्यामुळे न्यायालयाने गोडाऊनला लावलेले कुलूप उघडण्याचे आदेश दिले आहे. राजकीय वर्तुळातील चर्चेचा हा विषय नाही. २०२१ पासून ही कारवाई सुरु होती. सरकारला विनंती केल्यानंतर त्यांनी मला दिलासा दिला. साखर कारखाना सुरु राहिला पाहिजे हा महत्त्वाचा विषय होता. टीकाटिप्पण्या होत राहतील पण सहकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर कारखाना महत्त्वाचा आहे हे ठरवण्यात आलं. न्याय देवतेने न्याय दिला असून गोडाऊन खुली झाल्याने शेतकऱ्यांना पैसे देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य सरकारच्या सुचनेनुसार शिखर बँकेने सहकार्य केले आहे.

**-अभिजीत पाटील, अध्यक्ष, श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना**

### कारखाना वाचत असेल तर मी कुठेही जायला तयार

कारखान्याचं सील काढून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, असे मी देवेंद्र फडणवीस यांना सांगितले. साहजिकच या मोबदल्यात त्यांचीही काहीतरी अपेक्षा असेल. ते आपल्याला आऊट ऑफ द वे जाऊन मदत करत आहेत. मग आम्हीही त्यांना मदत करणे, ही स्वाभाविक अपेक्षा आहे. आज मी त्यांना शेतकरी सभासदांसाठी जे करायची गरज आहे, ते करायची तयारी आहे. भाजपाला पाठिंब्याचा निर्णय जाहीर करताना मी माझी स्वत:ची राजकीय महत्वकांक्षा बाजूला ठेवून विठ्ठल कारखान्याच्या सभासदांच्या हिताचा निर्णय घेतला आहे असे मत अभिजित पाटील यांनी व्यक्त केले.



## अर्चनाताई पाटील यांच्या प्रचारार्थ आमदार राऊत यांची संकल्प सभा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ३ मे-**

धाराशिव लोकसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई पाटील यांच्या प्रचारार्थ पांगरी येथे आ. राजेंद्र राऊत यांच्या उपस्थितीत विजयी संकल्प सभा झाली.

भूलथापा देऊन मतदारांना भुलविण्याचे काम आजपर्यंत त्या खासदाराने केले आहे. जनतेला विकास पाहिजे आहे. आपल्याला केंद्रात आपल्या हक्काचा खासदार पाहिजे, असे आ. राऊत यांनी सांगितले. यावेळी माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, कुंडलिक गायकवाड, सुधीर बारबोले, संजय पाटील, विक्रम सावळे, केशव घोगरे, प्रकाश पाटील, विजय गरड, ॲड. अनिल पाटील, विलास लाडे, रामभाऊ लाडे, युवराज खबाले, बाबासाहेब मोरे उपस्थित होते.

## परिचारक कारखान्याकडून २,८०० रुपयांप्रमाणे
# ऊस बिल बँक खात्यात जमा : डॉ. कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर,दि.३ मे-**

श्रीपूर येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने गळीत हंगाम २०२३-२४ मध्ये गाळपास आलेल्या संपूर्ण उसाची बिले व तोडणी वाहतूक बिलाची रक्कम बँकेत जमा केली आहे.



कारखानाचे संस्थापक कै. सुधाकरपंत परिचारक यांचे तत्वानुसार प्रथम शेतकरी न्यायाने कारखान्याचे चेअरमन प्रशांत परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आतापर्यंत प्रति मे. टन रक्कम २८०० रु. प्रमाणे ऊस बिल अदा केली असल्याची माहिती कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी दिली.

ते म्हणाले की, गळीत हंगाम २०२३-२४ मध्ये ऊसाची कमतरता जाणवेल असे जाणवेल असा संपूर्ण महाराष्ट्राचा अंदाज होता. परंतु योग्य वेळी झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या ऊसाच्या एकरी टनेजमध्ये वाढ होवून कारखान्यास या हंगामात १० लाख ७१ हजार १०० मे.टन ऊसाचे गाळप करणे शक्य झाले. त्याचप्रमाणे कारखान्याकडे ऊस गाळप करण्यासाठी ऊस उत्पादकांनी कारखान्यावर दाखविलेली विश्वास ही तितकाच महत्त्वाचा ठरला. तोडणी वाहतूक ठेकेदारांनी उन्हाची तीव्रता वाढत असतानाही शेवटपर्यंत ऊसतोड करून कारखान्यास सहकार्य केले. या हंगामात कारखान्याने ११.१५ टक्के सरासरी साखर उताऱ्याने ११ लाख ५२ हजार ६१० क्विं. साखर पोती उत्पादित केली आहेत.

कारखान्याच्या को-जनरेशन प्रकल्पानेही या हंगामात ६.३१ कोटी युनिट विज निर्माण करून २.७५ कोटी युनिट महावितरणला एक्स्पोर्ट केली आहे. त्याचबरोबर आसवनी प्रकल्पातूनही १.०२ कोटी इतके उत्पादन घेतले असून अद्यापही असावनी प्रकल्प अद्याप चालू आहे. कारखान्याने नव्याने ९.७ मेगावॅट उभारलेला को-जनरेशन प्रकल्पही सुरळीत चालू असून तोही आणखी महिनाभर चालेल असा अंदाज आहे. गळीत हंगाम २०२४-२५ साठी ऊस तोडणी वाहतूक ठेकेदारांचे करार करण्यास सुरुवात केली आहे. गळीत हंगाम २०२४-२५ यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कारखान्यांमध्ये आवश्यक असणारी ऑफ सीझन मधील सर्व कामे सुरू असून ती लवकरच पूर्ण केली जातील, असेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## क्रेडाई पंढरपूरच्या वतीने कामगार नोंदणी, आरोग्य तपासणी मेळावा

### ६०० बांधकाम कामगारांची नोंदणी; महिला कामगारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर,दि.३ मे-**

१ मे महाराष्ट्र दिन तथा जागतिक कामगार दिन निमित्ताने बुधवारी (ता. १ मे) बांधकाम व्यावसायिकांची सर्वोच्च संस्था क्रेडाई पंढरपूर व स्वयंसेवी संस्था दिशा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ६०० बांधकाम कामगाराची नोंदणी करून घेण्यात आली. या मेळाव्यात महिला वर्गाचाही खूप उत्स्फूर्तपणे प्रतिसाद होता.

या कार्यक्रमात कामगार नोंदणीचे महत्त्व व त्यातील विविध सरकारी योजना, तसेच फायदे यांची माहिती सहसचिव सुतार यांनी सर्व कामगारांना दिली. डॉ. लीना घाडगे, डॉ. अरुण मेनकुदळे यांनी तपासणी केली. याप्रसंगी जेके सिमेंटचे पंकज साखरकर, विवेक हजारे, रेवण पाटील व प्रायोजक मोहक इंटरप्राईजेसचे मोहक गांधी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अमित शिरगावकर, मिलिंद देशपांडे, आशिष शहा, संतोष कचरे, शशिकांत सुतार, विवेक परदेशी व क्रेडाई पंढरपूरचे सदस्य, क्रेडाई वुमन्सविंग सदस्य व क्रेडाई युथविंग सदस्य यांनी परिश्रम घेतले.

### नाव नोंदणीसाठी संपर्काचे आवाहन

ज्या कामगारांचे कागदपत्र अपुरी राहिले आहेत किंवा अद्याप नोंद केली नाही त्यांना ७ मे पर्यंत कागदपत्र जमा करण्यास सांगण्यात आली. जरी कोणाचे रजिस्ट्रेशन राहिले असेल तर या आठवड्याभरात ७ मे पर्यंत लेबर रजिस्ट्रेशन चालू आहे. यांच्यासाठी प्रणव मस्के (मो.७०२०८९६७२३) व अंकित फत्तेपूरकर (मो.९४२२६५३६८५) यांच्याशी संपर्क करावा असे सांगण्यात आले.

## पाणी टंचाई काळात नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे

### सांगोला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३ मे-**

पाणी म्हणजे जीवन आहे हे लक्षात घेऊन नागरिकांनी पाण्याचे नळ वाहते सोडू नयेत.तसेच पाणी जपून वापरले पाहिजे.यावर्षी उन्हाची दाहकता व कडक उन्हाळा लक्षात घेता तसेच पाण्याची गरज व मागणी विचारात घेता उपलब्ध असलेल्या पाण्याचा काटकसरीने वापर करून पाणीटंचाई काळात नागरिकांनी नगरपरिषदेस सहकार्य करावे, असे आवाहन सांगोला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ.सुधीर गवळी यांनी केले आहे.

सांगोला नगरपरिषद हद्दिचे क्षेत्रफळ ६८.८२ चौ.कि.मी इतके असून यामध्ये सांगोला शहर व शहराबाहेरील १३ वाड्यावस्त्याच्या समावेश आहे. सांगोला शहराची लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार ३४ हजार ३२१ इतकी असून सध्याची लोकसंख्या सुमारे ३८ हजार इतकी आहे.दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत असून वाढीव लोकसंख्येचा विचार करता मागणीनुसार व गरजेनुसार पाणीपुरवठा करणे गरजेचे आहे.गतवर्षी अत्यल्प पाऊस पडल्याने सध्या आपल्याकडे पुरेशा प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध नाही. त्यामुळे शहरात सध्या एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे.

### नगरपरिषद हद्दीत १९६ विंधन विहिरी

सांगोला नगरपरिषद हद्दीत एकुण कार्यरत १९६ विंधन विहीरी आहेत.आगामी काळात पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी शहरातील मुबलक पाणीसाठा असलेल्या विहिरींचा शोध घेऊन शहरात आवश्यकतेनुसार टँकरव्दारे पाणीपुरवठा करणेचे नियोजित आहे,अशी माहिती मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी दिली.

नगरपालिका हद्दीतील लोकसंख्येला पुरेसा व सुरळीत पाणीपुरवठा करण्यासाठी इसबावी सुधारीत पाणीपुरवठा योजना सन २०१३ मध्ये कार्यान्वित झालेली आहे.उजनी धरणाखाली भिमानदी बंधारा(पंढरपूर) येथून पाणी उपसा केला जातो.सदर ठिकाणी पाणी उपसा करण्यासाठी २७० एच.पी.च्या २ मोटारी,१२५ एच.पी.ची मोटर असून पंढरपूर सांगोला पाईपलाईन ४०० मि.मी.व्यासाची असून त्याची लांबी ३४ कि. मी. इतकी आहे.सांगोला शहराला पिण्यासाठी इसवावी येथील भीमा नदीवरील पंढरपुर को. प.बंधा-यातुन प्रति दिन सरासरी ५० लाख लिटर्स पाणी उपसा करून पाणीपुरवठा केला जातो.पंढरपूर येथून मोटारीच्या माध्यमातून उचललेले पाणी सांगोला नगरपरिषद हद्दीत एकुण ११ पाण्याच्या उंच टाक्यामध्ये साठवणूक केले जाते.साठवणूक करण्यात येणारा पाणीसाठा क्षमता ३०.२५ लक्ष लिटर्स इतका आहे.

# पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सलग ३२ वर्षे संघर्ष

## आ. शहाजीबापू पाटील : माढा लोकसभा मतदारसंघ महायुतीच्या उमेदवाराची प्रचारसभा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३ मे-**

१९९३ पासून पाण्याचा लढा सुरू असून राजकारणातील ३२ वर्षे पाण्यासाठी संघर्ष केला आहे.शेतीला पाणी असेल तर जीवन समृध्द होते. सांगोला तालुक्यात तीव्र दुष्काळ पडल्याने माण नदीत पाणी सोडण्याची मागणी केली होती.खासदारांनी दौरा अर्धवट सोडून फडणवीसांच्या भेटीला गेले आणि थेट कोयना धरणातील पाणी टेंभू योजनेतून माण नदीत सोडले.ऐन उन्हाळ्यात कृष्णा-कोयनेचे पाणी तालुक्याला मिळाल्याने माणसांची,जनावरांची तहान भागली. नीरा उजवा कालव्याच्या पाण्यासाठी मोहिते पाटलांनी कधीही सहकार्य केले नाही.तालुक्याचा दुष्काळ कायमचा हटविण्यासाठी आणि सर्व सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मतदारांनी सहकार्य करावे आणि महायुतीचे उमेदवार खा. रणजीतसिंह निंबाळकर यांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन आ.शहाजीबापू पाटील यांनी केले.

माढा लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारार्थ आ. शहाजीबापू पाटील व माजी आ.दीपकआबा साळुंखे- पाटील यांच्या नेतृत्वाखाली सांगोला तालुक्यात गावभेट दौरा संपन्न झाला. पारे, नराळे, मानेगांव, डिकसळ, हणमंतगांव, हंगिरगे, निजामपूर, कडलास, वासूद, वाणीचिंचाळे, लोणविरे या गावात गावभेट दौरा करून मतदारांशी संवाद साधला. यावेळी संग्रामसिंह जाधवराव, भाऊसाहेब रूपनर, दुर्योधन हिप्परकर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### खा.निंबाळकर यांनी तालुक्याचा पाणी प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले : दीपकआबा साळुंखे-पाटील

आम्ही कष्टाने आणलेल्या पाण्याचे श्रेय घेण्याचे विरोधकांचे काम सुरू आहे. खा.रणजितसिंह निंबाळकर यांनी तालुक्याचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. शहाजीबापूंनी आमदार झाल्यानंतर पाण्याचा प्रश्न सोडवला आणि खऱ्या अर्थाने तालुक्यात हरितक्रांतीला सुरुवात झाली.आता आपल्याला हक्काचे पाणी मिळत असल्याने पाणी आणणाऱ्याला खासदार म्हणून निवडून द्यायचे आहे. उजनीच्या दोन टीएमसी पाणी योजनेचे दोनदा भूमिपूजन झाले,मात्र काम सुरू झाले नाही.त्यासाठी खा.निंबाळकर आणि आ.पाटील यांनी सातत्याने प्रयत्न केल्याने सुमारे ९०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे.गेल्या ५५ वर्षात जेवढा निधी आला नाही तेवढा निधी गेल्या पाच वर्षात खा.निंबाळकर आणि आ.पाटील यांनी तालुक्यासाठी आणला असल्याचे माजी आ.दीपकआबा साळुंखे पाटील यांनी सांगितले.

## तलाठी सोमशेखर शेड्याळ यांच्यावर कारवाई करण्याची मागणी

### छावा संघटनेची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ३ मे-**

नांदणी व बरूर हद्दीतील शिवानंद पाटील व प्रथमेश पाटील यांचा अनधिकृतपणे सुरू असलेला स्टोन क्रशर प्लांट महसूल विभागाकडून सील करण्यात आला आहे. परंतु सील केलेला क्रशर प्लांट तलाठी सोमशेखर शेड्याळ यांच्या आशिर्वादाने सुरू आहे म्हणून शासनाचे कोट्यवधी रूपयांची महसूल बुडवून क्रशर प्लांट मालकास सहकार्य करणाऱ्या तलाठी शेड्याळ यांच्यावर कारवाई करण्याची मागणी छावा संघटनेनी केली आहे.

संबंधित खडी क्रशर प्लांटचे चालक व मालक हे तलाठी सोमशेखर शेड्याळ यांचे नातेवाईक असून तलाठी शेड्याळ हे बेकायदेशीरपणे आपल्या नातेवाईकांना खडी क्रशर प्लांट चालवण्यासाठी सहकार्य करत आहेत. सदरील स्टोन क्रशर प्लांट चालकास २०२१ मध्ये तत्कालीन तहसीलदार उज्ज्वला सोरटे यांनी लाखो रूपयांचा दंड केला होता. २०२१ पासून ते आजतागायत संबंधित स्टोन क्रशरला महसूल विभागाकडून व पर्यावरण विभागाकडून कोणतीही रितसर परवानगी नसताना व संबंधित चालकाने कोणत्याही प्रकारची रॉयल्टी महसूल विभागास भरलेली नाही. नांदणी व बरूर कार्यक्षेत्रात चालणाऱ्या अनधिकृत स्टोन क्रशर संदर्भात माहिती असूनदेखील ते संबंधित व्यक्तीवर व स्टोन क्रशर प्लांट मालकांवर कोणतीही कारवाई करत नाहीत. वरिष्ठ अधिकाऱ्यांना अनाधिकृत या गोष्टी निदर्शनास आणून देत नाहीत. अनधिकृत स्टोन क्रशर प्लांट चालकांना ते सहकार्य व मदत करून शासनाचे कोट्यवधी रूपयांचे नुकसान करत आहेत.

## संक्षिप्त वृत्त...




### लढून मिळविलेले कामगारांचे कायदे होत आहेत उद्ध्वस्त : प्रा. तानाजी ठोंबर

**बार्शी, दि. ३ मे-**

कामगार कष्टकरी वर्गाने आजपर्यंत लढून जे कामगारांचे कायदे निर्माण केले त्याला उद्ध्वस्त करणाऱ्या भाजपाला हटवण्याचे आवाहन आयटक सोलापूर जिल्हाध्यक्ष प्रा. तानाजी ठोंबरे यांनी कामगार केंद्र बार्शी येथे १ मे कामगार दिनाच्या सभेला संबोधित करीत असताना केले.पुढे ते म्हणाले, श्रमिकांनी आपले रक्त सांडून कित्येक वर्षांचा संघर्ष करुन आपला इतिहास निर्माण केला. त्याची आठवण ठेवणे, कष्टकरी वर्गाच्या लालबावट्याच्या विचारांना लक्षात घेऊन, आजची परिस्थिती बदलली पाहिजे, देशात महागाई, बेरोजगारी, रेशनचा, शिक्षणाचा, आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. भ्रष्टाचार व जातीय धर्मांधतेने देश पोखरुन निघाला आहे. कामगारांचे कायदे मोडून कंत्राटीकरण करणे, शेतकरी आत्महत्या, दलित अत्याचार वाढले आहेत. भारत सरकारऐवजी मोदी सरकार असा उल्लेख करुन संविधानावर हल्ला केला जात आहे. त्यामुळे भाजपला हटवणे आवश्यक आहे. या निवडणुकीत भाजपाला हटवण्याची नामी संधी आली आहे. श्रमिक वर्गाला उद्ध्वस्त करणाऱ्याला मतदान करु नका, मशाल, तुतारी, हाताचा पंजा या पुरोगामी पक्षांच्या चिन्हाला मतदान करा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी कॉम्रेड अनिरुद्ध नखाते यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रविण मस्तुद यांनी केले. यावेळी भारत भोसले भारती मस्तुद, ए. बी. कुलकर्णी, लहू आगलावे आदी उपस्थित होते.

### प्रज्ञाशोध परीक्षेत पानमंगरुळ जिल्हा परिषद शाळेचे यश; आर्यन हिप्परगी गुणवत्ता यादीत

**पानमंगरुळ, दि. ३ मे-**

राज्यस्तरीय एटीएस प्रज्ञाशोध परीक्षेत पानमंगरुळ जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. आर्यन राहुल हिप्परगी १४६ गुण प्राप्त करुन केंद्रात ११ वा जिल्ह्यात, २१ वा, राज्यात २८ वा, नीलकंठ बसवराज कंदगुळे १३२ गुण, अनुष्का बाबुराव पवार १०८ गुण, कृतिका राजेंद्र बळुरगी १०२ गुण, चंद्रकांत गुंडप्पा बळुरगी ९८ गुण, अंजली इरण्णा बळुरगी ९४ गुण, रुद्र किरण सुरवसे २१६ गुण केंद्रात ७ वा, जिल्ह्यात ३० वा, राज्यात ३७वा, ऋषिकेश मल्लिकार्जुन पाटील १९२ गुण, सम्राट चंद्रकांत बनसोडे १७८ गुण, शिवम्मा गुरुनिंगप्पा बनसोडे १६६ गुण, ओंकार पांडुरंग सुर्डी १५६ गुण, नुराहीन बाबुलाल मुजावर १३६ गुण, नयन गंगाधर बनसोडे १३२ गुण, अनुष्का चिदानंद मुडगी १२८ गुण, प्रणिती पिरप्पा सुणगार १२४ गुण, सुकन्या संजय कटकधोंड १७४ गुण प्राप्त करुन केंद्रात १२ वा, जिल्ह्यात ५१वा, राज्यात ५८ वा., अक्षरा बाबुराव हिप्परगी १७० गुण, आरोही सोमनाथ हिप्परगी १६८ गुण, सृष्टी संजय होटकर १६८ गुण, वैभवी मल्लिकार्जुन हचडे १४२ गुण, राखी महेश सुर्डी १३८ गुण, मानसी सागर सुरवसे १२८ गुण, अब्दुलरजाक हुजूर तंबाखे १२८ गुण, गुलाब अमीर विजापुरे १२८ गुण. या विद्यार्थ्यांना गायत्री काळे-सुर्डीकर, महादेव पाटील, सिद्दाराम वमने, लता कांबळे, अश्विनी यादव, ममता पटेद, कोरबू यांनी मार्गदर्शन केले.



### अकलूजमधील द ग्रीन फिंगर्स स्कूलमध्ये विद्यार्थी प्रतिनिधी पदग्रहण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ मे-**

शंकरनगर, अकलूज येथील ग्रीन फिंगर्स स्कूलमध्ये सन २०२४-२५ या वर्षीचा विद्यार्थी प्रतिनिधी पदग्रहण सोहळा व शपथविधी समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास प्राचार्य उमाकांत बराल, प्रशासकीय अधिकारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. स्कूल कॅप्टन या पदासाठी लोकशाही पद्धतीने निवडणूक घेण्यात आली. या निवडणुकीत तिसरी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपला अनमोल मतदानाचा हक्क बजावला. निवडणूक कशा पद्धतीने पार पडतात याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनी अनुभवला. स्कूल कॅप्टन पदासाठी झालेल्या निवडणुकीत कार्तिकी देविदास जाधव सर्वाधिक मते मिळवित मोठ्या फरकाने विजय संपादन करीत स्कूल कॅप्टनपदी निवड झाली. अस्टर हाऊस प्रतिनिधी आर्या सरडे, उपप्रतिनिधी अर्जुन धुमाळ, ब्ल्यू बेल्स श्रेयस कुलकर्णी, समर दिवाणे, क्रीसंथेमम् हाऊस अनुष्का जवाहिरे, प्रतिक पाटील, डफोडिल्स हाऊस ईश्वर धमुरे, इंद्रनील क्षीरसागर, अकॅडमिक प्रतिनिधी मल्हार कुदळे, नरेंद्र पिनाटे, क्रीडा प्रतिनिधी गुलाब सय्यद, संकेत घोडके, ग्रीन हिरो आदित्य वाघमोडे रंजन चौधरी यांची निवड झाली. प्राचार्य उमाकांत बराल यांनी स्वयंशिस्तीचे पालन करून शिस्त टिकवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

# माझ्याप्रमाणेच निंबाळकरांनाही खासदार करा

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले : खा. नाईक-निंबाळकरांच्या प्रचारार्थ कुर्डूवाडीत महायुतीची सभा

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. ३ मे-**

शरद पवारांचा मला आदर आहे. सन १९९० साली त्यांच्यामुळेच मला दोनवेळा माढा लोकसभा मतदारसंघाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. हे विसरून चालणार नाही. मात्र रिपब्लिकनच्या साथीमुळे पवारांना सत्ता मिळाली. मलाही दहा वर्षे या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व मिळाले. परंतु आत्ता परिस्थिती वेगळी असून माझ्यासारखेच प्रेम आपण निंबाळकरांवर करायचे आहे आणि त्यांना निवडून द्यायचे आहे, असे आवाहन केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले.



कुर्डुवाडी येथील महायुतीचे उमेदवार खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारसभेच्या निमित्ताने ते बोलत होते. यावेळी खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर, आ. प्रसाद लाड, आ. संजयमामा शिंदे, प्रा. शिवाजीराव सावंत, बापूसाहेब जगताप यासह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते. पुढे बोलताना आठवले म्हणाले की माझे मोहिते-पाटील कुटुंबाचे अत्यंत चांगले संबंध राहिले आहेत. येथील महाघाडीचे उमेदवार त्यांचे नाव धैर्यशील असले तरी त्यांचे धैर्य थोडे कमी आहे. वास्तविक पाहाता विजयदादांनी हा निर्णय घ्यायला नको होता. या निवडणुकीत ४० पेक्षा जास्त जागा या महायुतीला मिळणार असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. आ. प्रसाद लाड यांनी काँग्रेसचे राहुल गांधी आणि शिवसेनेचे उद्धव ठाकरे यांचे नाव घेत हे संविधान बदलणार अशी दोन पप्पू लोकांची रट लागली आहे असे टीकास्त्र सोडले. माळशिरस, अकलूजमधील दहशत आपल्याला संपवायची आहे.

आ. शिंदे म्हणाले की, मागील लोकसभेची निवडणूक खा. रणजितसिंह निंबाळकर आणि मी समोरासमोर लढलो. मात्र आम्ही पहिल्यापासून एकाविचाराचे होतो. सोलापूरच्या प्रस्थापितांच्या विरोधात तिसरी आघाडी म्हणून आम्ही लढलो. या प्रस्थापितांना पुन्हा संधी मिळू नये यासाठी आम्ही लढलो. मोहिते-पाटील यांचे नाव न घेता ते म्हणाले की २००९ पासून यांना कोण तिकिट देत नव्हते, अशी टीका त्यांनी केली. यावेळी रिपाइंचे प्रदेश उपाध्यक्ष बापूसाहबे जगताप, प्रा. शिवाजी सावंत, रवींद्र ननवरे, भाजप महिला तालुकाध्यक्ष प्रतीक्षा गोफणे, प्रा. अवघडे यांनी मनोगत व्यक्त केले.

### देशाला बळकट करण्यासाठी विजयी करा

यावेळी खा. रणजितसिंह निंबाळकर यांनी कुर्डुवाडीच्या रेल्वे कारखान्यासाठी ४० कोटी आणि ६० कोटी असा दोनवेळा निधी दिला. उड्डाणपुलाचे कामही मंजूर झाले आहे. त्याचे लवकरच भूमीपूजन मी आणि आ. संजयमामा शिंदे निवडणुका झाल्यावर करणार आहे. नीरा नदीचे पाणी उजनी धरणामध्ये आणून सोडण्याचे काम येत्या काही दिवसात पूर्ण होणार आहे. तरी देश सशक्त आणि बलवान करण्यासाठी मोदींचे हात बळकट करण्यासाठी आपण माझ्या रुपाने मोदींना मतदान करावे असे आवाहन त्यांनी केले.

## राज्य, देशात परिवर्तनाची लाट : जानकर

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ मे-**

गेल्या ४० वर्षांत मोहिते-पाटील व तालुक्यातील विरोधकांमुळे संघर्ष टोकाला गेला. त्याचा फायदा भाजपाने घेतला. खासदारकी व आमदारकी लादली. त्यामुळे गेल्या पाच वर्षांत तालुक्याचा विकास खुंटला. आता मागील सर्व मतभेद विसरुन आपण एकत्र आलो आहोत. देशात सध्या मोदी विरोधात जोरदार परिवर्तनाची लाट आहे. राज्यात व देशात सत्ता परिवर्तन होणार आहे. त्यासाठी सर्वांनी एकजुटीने महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांना जास्तीत जास्त मताधिक्य देऊन विजयी करावे, असे आवाहन उत्तमराव जानकर यांनी केले.



माढा लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रचारार्थ वेळापूर येथील श्री अर्धनारी नटेश्वर मंदिरात श्रीफळ अर्पण करण्यात आले. यावेळी आयोजित कॉर्नर बैठकीत जानकर बोलत होते. प्रारंभी चेअरमन अमरसिंह माने-देशमुख यांनी स्वागतपर भाषणात धैर्यशील मोहिते-पाटील यांची माहिती दिली. दि. ७ रोजी जास्तीत जास्त मतदान करण्याचे आवाहन केले. स्वरुपाराणी मोहिते-पाटील म्हणाल्या, आपली लढत ही प्रवाहाच्या विरोधातील आहे. भाजपा नेत्यांनी चुकीचे आरोप करुन दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. परंतु आम्ही भिणाऱ्यापैकी नाही. माढा लोकसभा मतदारसंघातील शेतकरी, शेतमजूर, कामगार, व्यापारी, उद्योजक व युवकांच्या विकासासाठी आमचा लढा आहे. मोदी सरकारने गेल्या दहा वर्षात केवळ आश्वासने दिली. गॅस, डिझेल, पेट्रोल ,जीवनावश्यक वस्तू महाग केल्या. शेतीमालाला दर नाही. जीएसटीमुळे व्यापारी, उद्योजक हैराण झाला आहे. या सरकारला आता धडा शिकविण्याची गरज आहे. यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख, सभापती सतीशराव माने-देशमुख, माजी जि. प. सदस्य बाळासाहेब धाईंजे, ओंकार माने-देशमुख, माणिकराव चव्हाण, सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासाहेब मुंगूसकर, हनुमंतराव साळुंख उपस्थित होते.

## शरद पवार हेच मराठा आरक्षणाचे मारेकरी : नरेंद्र पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३ मे-**

मराठा आरक्षण हा प्रश्न संपूर्ण समाजासाठी अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले आरक्षण शरद पवार यांच्या विचारांचे असलेल्या महाविकास आघाडी सरकारला न्यायालयात टिकवता आले नाही. त्यामुळे शरद पवार हेच खऱ्या अर्थाने मराठा आरक्षणाचे मारेकरी असल्याचा गंभीर आरोप अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केला.



माढा लोकसभा मतदारसंघाचे खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारार्थ सांगोला तालुका दौऱ्यात खवासपूर, महुद, वाकी शिवणी, वाढेगाव, एखतपूर आणि आलेगाव या गावांना भेट देऊन येथील नागरिकांशी संवाद साधला, यावेळी ते बोलत होते. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत, तालुकाध्यक्ष अतुल पवार उपस्थित होते.

पुढे बोलताना नरेंद्र पाटील म्हणाले, सारथीचा माध्यमातून स्पर्धा परीक्षा देणाऱ्या असंख्य मराठा विद्यार्थ्यांना महायुती सरकारने आर्थिक मदत केली आहे. यापुढेही स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या मराठा समाजातील विद्यार्थ्यांना परिस्थिती नसल्याने आपला अभ्यास अर्धवट सोडावा लागणार नाही याची आम्ही काळजी घेणार आहोत. मराठा समाजातील तरुणांना उद्योजक बनवण्यासाठी अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या माध्यमातून हजारो मराठा तरुणांना बिनव्याजी कर्जपुरवठा केला आहे. या योजनेंतर्गत पूर्वी दहा लाख रुपयांची कर्ज मर्यादा होती. लवकरच ही मर्यादा वाढवून ५० लाख रुपये करणार असल्याचे नरेंद्र पाटील यांनी स्पष्ट केले.

## कोळी महासंघ म्हणजे कोळी समाज नव्हे

### अरविंद नाईकवाडी यांचा संतप्त सवाल

**मंगळवेढा, दि. ३ मे-**

कोळी महासंघ म्हणजे सोलापूर जिल्ह्यातला कोळी समाज नव्हे. जिल्ह्यातल्या कोणत्याही समाज बांधवाना विश्वासात न घेता लोकसभा निवडणुकीत भाजपाला पाठिंबा देणारे रमेश पाटील कोण? त्यांनी जिल्ह्यातल्या कोळी जमातीसाठी काय केले? ते सोलापूर जिल्ह्यातल्या कोळी समाजाचे मालक नाहीत, अशी संतप्त प्रतिक्रिया वाल्मिकी संघाचे अध्यक्ष अरविंद नाईकवाडी यांनी व्यक्त केली आहे.

कोळी महासंघाचे अध्यक्ष आ. रमेश पाटील यांनी भाजपाच्या उमेदवारास लोकसभा निवडणुकीसाठी पाठिंबा जाहीर केला आहे. आ. रमेश पाटील हे समुद्र किनारपट्टीवर राहणारे सोनकोळी ग्रुपमधील एसबीसी प्रवर्गातले आहेत. त्यांचा आणि सोलापूर जिल्ह्यातल्या महादेव कोळी समाजाचा काहीही संबंध नाही. त्यांनी कोळी समाजाला जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणत्राचा प्रश्न सोडवतो म्हणून भाजपाकडून आमदारकी पदरात पाडून घेतली आहे. त्यांच्या मुलगा चेतन पाटील यांनी समाज विरोधी न्या. हरिदास कमिटीच्या अहवालावर सही करुन समाजाला अडचणीत आणले आहे. आमदार होऊनही रमेश पाटील यांनी प्रश्न मात्र सोडवला नसल्यामुळे समाजाची फसगत झालेली आहे. त्यांना समाज नेता मानत नाही. तसेच जिल्ह्यातल्या समाजाच्या प्रश्नाचे आ. रमेश पाटील यांना ज्ञान नाही. त्यांनी महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यांमध्ये पैसे देऊन कार्यकर्ते ठेवलेले आहेत. सोलापूर जिल्ह्यातही एक पेड कार्यकर्ता हे २०१९ च्या लोकसभा निवडणुकीततही भाजपाचे उमेदवार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी यांना असाच लक्ष्मी प्राप्तीसाठी पाठींबा दिला होता. त्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून निवडणुका आल्या की महाराष्ट्रभर फिरून पाठिंबा दिल्याचे पक्षाला दाखवतात. त्यांच्या भाषणामध्ये फक्त मोदींसाठी भाजपाला मतदान द्या असे म्हणत आहेत. समाजाच्या प्रश्नाविषयी त्यांनी वाच्यताही केलेली नाही. जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र कोळी जमातीच्या



अस्मितेचा व भवितव्याचा विषय आहे. अशा संवेदनशील प्रश्नावर त्यांनी वाच्यताही केलेली नाही. २०१४ व २०१९ ला राज्याच्या ३१ जिल्ह्यातील ४५ लाख कोळी बांधवांनी भारतीय जनता पार्टीला मत देऊन सत्तेत आणले होते तरी गेल्या १० वर्षांमध्ये कोळी समाजाच्या संवेदनशील प्रश्नावर चर्चा करण्यासाठी देवेंद्र फडवणीस यांनी एक तासाची वेळ दिलेली नाही. कार्तिकी एकादशीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पंढरपूरला आले असता सर्व संघटनांच्या प्रतिनिधीना भेटण्यासाठी वेळ दिली नाही.

## भीमा परिवारामध्ये उभी फूट

### महाविकास आघाडीच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांना पाठिंबा

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ३ मे-**

भीमा साखर साखर कारखान्याचे उपाध्यक्ष सतीश जगताप यांच्या फार्म हाऊसवर भीमा परिवार व जगताप प्रेमींची एक बैठक आ. प्रणिती शिंदे यांच्या उपस्थितीत आयोजित केली होती. त्यामध्ये आ. शिंदे यांना पाठिंबा व्यक्त करण्यात आला. यामुळे भीमा परिवारामध्ये उभी फूट पडली आहे.

सतीश जगताप यांनी आम्ही १५ वर्षे मुन्ना महाडिक यांच्या नेतृत्वाखाली काम करत होतो. परंतु या वेळेस मात्र आम्ही नेत्याचा आदेश डावलून वेगळा विचार करण्याचा निर्णय घेतला असून सर्वसामान्य जनता भाजपाच्या विरोधात असल्याने आम्ही हा निर्णय घेतला आहे. आमच्या भीमा परिवारामध्ये सर्व पक्षाचे नेते आहेत म्हणून तुम्ही खासदार होणार आहात. त्यावेळी आमचा पक्ष न बघता कामे करावीत असे आवाहन सतीश जगताप यांनी केले. सूत्रसंचालन पांडुरंग ताठे यांनी केले तर आभार चव्हाण यांनी मानले. यावेळी माणिक बाबर, उत्तम बाबर, शैलेश गरड, संतोष चव्हाण, संजय कुटे, दादा शिंदे, गणपत पुदे आदींसह कारखान्याचे माजी संचालक, सतीश जगताप प्रेमी आणि शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## उजनी बॅकवॉटरचा विद्युत पुरवठा खंडीत

### चालू करा; अन्यथा आंदोलन

### संजय पाटील-भीमानगरकर यांनी दिला इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ३ मे-**

टेंभुर्णी महावितरण कार्यालय येथे भीमानगरसह बॅकवॉटरवर असलेल्या गावांतील शेतकऱ्यांनी माजी कृषी सभापती संजय पाटील-भीमानगरकर यांच्या नेतृत्वाखाली टेंभुर्णी महावितरण कंपनी विरोधात श्रीफेज लाईट एैन उन्हाळ्यात बंद केलेली त्वरित चालू करा या संदर्भात शेतकऱ्यासह संजय पाटील यांनी अचानक मोर्चा काढला.



यावेळी शेतकऱ्यांनी वीज मंडळाच्या विरोधात प्रतिक्रिया दिल्या. संजय पाटील-भीमानगरकर म्हणाले की आमच्या बॅकवॉटर भागात लाईट वारंवार कपात केली जात आहे. दुष्काळासारखी परिस्थिती निर्माण झालेली असताना उजनी धरण उशाला, कोरड घशाला अशी परिस्थिती असताना जिल्हाधिकारी वीज कपातीचे आदेश मागे घ्यावेत. सध्या दुष्काळाच्या झळा जाणवत असताना जाणून बुजून याकडे दुर्लक्ष करीत आहेत. ऐन उन्हाळ्यामध्ये हातातोंडाशी आलेला घास शेतकऱ्यांना सोडून देण्याची वेळ महावितरणमुळे येत आहे. जनावराच्या चाऱ्याचा प्रश्न, पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर होत चाललेला आहे. महावितरणने वेळीच निर्णय न घेतल्यास त्यांच्या विरोधात उजनी बॅक वॉटरवरील सर्व शेतकरी घेऊन आम्ही मोठे जनआंदोलन उभे करू असा इशारा संजय पाटील-भीमानगरकर यांनी दिला आहे.

पाटील म्हणाले की, सध्या महाराष्ट्रामध्ये तापमानाचा पारा दिवसेंदिवस खूप वाढत आहे. पारा ४४ पार गेला असताना उभी पिके जळताना दिसत आहेत. त्यामुळे महावितरण जाणून बुजून लाईट कपात करत आहे. सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांनी वीज कपातीचा आदेश मागे घेऊन उजनी बॅक वॉटरवर असलेली गावे भीमानगर, रांजणी, उजनी, सुर्ली, फटजवळगाव, अकोले खु, आलेगाव, रुई, आढेगाव, वडोली, चांदज, टाकळी, गारअकोले, शेवरे, मिटकलवाडी, आलेगावतील शेतकरी टेंभुर्णीच्या वीज कंपनी कार्यालयावर आंदोलन करतील, असा इशारा दिला आहे. यावेळी गोटू पाटील, दीपक पाटील, आप्पा पाटील, काका टेळे, नाना केळे, रमेश नाना पाटील, समाधान पाटील, शेतकरी उपस्थित होते.

### सिंगल फेज वीजपुरवठा सुरु करा

तातडीने सिंगल फेज वीजपुरवठा त्वरित चालू करावा. सहा तासावरून तीन तासावर आणलेला श्री फिज वीजपुरवठा चालू करावा अशा मागण्या वीज मंडळाचे अधिकारी जाधव यांच्याकडे केल्या आहेत.